# शब्द रुची

जानेवारी २०२१
मूल्य १० रुपये
पृष्ठे ७२




storytel
सावधान !
storytel original
सह : मुक्ता बर्वे
ViRUS-पुणे
भावानुवाद : निरंजन मेढेकर
14:00
16:00
18:00
00:16:00
-04:39:08
1.0x
जर असा एखादा Virus
असेलकी ज्यात फक्त
१% लोकच जगतात
तर काय होईल ?
ऐका फक्त स्टोरीटेल वर...!
आजच डाऊनलोड करा!
सर्वोत्तम मराठी ऑडिओबुक्स
दरमहा रू.99/- पासून
QR code स्कॅन करा किंवा
www.storytel.com या
वेबसाईटला भेट द्या.
App Store
Google Play
Recurring: All Credit Cards and Select Debit Cards. Non recurring: All payment options available including UPI, Netbanking, Cards and Wallets. *T&C apply.

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**जानेवारी २०२१, वर्ष आठवे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर, अरुण जोशी**
अभ्यागत संपादक : **प्रल्हाद जाधव**
मुखपृष्ठ : **निलेश जाधव**
आतील मांडणी : **प्रदीप म्हापसेकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, सहकारी – सुमेधा कुवळेकर**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthali02@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४५

## अनुक्रम

- आठवणींच्या जुन्या पुलावरून... / ६
  **अंजली कीर्तने**
- लढवय्या पत्रकार-कार्यकर्ता / १२
  **मिहीर महाजन**
- प्रामाणिकपणा आणि निर्विवाद तळमळ! / १६
  **डॉ. अनिल काकोडकर / शब्दांकन : शिल्पा खेर**
- कुमार केतकर आणि मी / १८ ते २९
  **सुधीर पटवर्धन, संदीप वासलेकर, गणेश देवी, रावसाहेब कसबे, दत्तप्रसाद दाभोलकर, सुनील देशमुख, सुबोध केरकर, अच्युत गोडबोले, कलापिनी कोमकली, आकार पटेल, विक्रम राजाध्यक्ष, सॅम पित्रोदा, राकेश मारिया, वप्पाला बालचंद्रन / शब्दांकन : राधिका कुंटे**
- आमचे अफाट केके... / ३०
  **श्रीकांत बोजेवार**
- **ग्रंथाली वाचकदिन वृत्तांत** / ३४
- सहज नीटू जाला... / ३९
  **चिन्मय बोरकर**
- मला कळलेले अद्वितीय व्यक्तिमत्त्व / ४३
  **वीरेंद्र सुळे**
- प्रज्ञावान संपादकांची परंपरा,
  ज्ञानमय प्रबोधनाचा प्रेरक वारसा / ४५
  **प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे**
- व्रतस्थ ते तटस्थ... व्हाया त्रयस्थ / ४९
  **शैलेश पांडे**
- केतकरांचे 'ते विधान' व महाराष्ट्राचे वर्तमान धर्मकारण / ५३
  **हेमंत प्रकाश राजोपाध्ये**
- कुमार केतकर आणि इंटलेक्च्युअल ॲक्टिव्हिझम / ५६
  **धनंजय गांगल**
- महाराष्ट्रातील डाव्या राजकारणाचा जमाखर्च / ६०
  **श्रीरंजन आवटे**
- कलेतील माझे गाळीव समाधान / ६४
  **विजयराज बोधनकर**
- **ग्रंथाली ग्रंथपाने / ६७**

संपादकीय...

# पंचाहत्तरीच्या वळणावर...

**कुमार** केतकर यांच्यावरील विशेषांकासाठी संपादक म्हणून काही नावे सुचवावी असा निरोप ग्रंथालीतून आला. मी लगेच पाच-सहा नावे कळवली. इतरांकडूनही अशीच नावे आली असणार. सर्वांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्याची पद्धत 'ग्रंथाली'त आहे. दोन-तीन दिवसांनी थेट दिनकर गांगल यांचा फोन आला. ते म्हणाले, 'प्रल्हाद, हे काम तू कर.' ते सिरियसली बोलत होते. त्यांची आणि सुदेशची काही चर्चा होऊन त्यांनी हे काम बाहेरच्या संपादकाकडून करून घेण्याऐवजी 'ग्रंथाली-टीम'कडेच सोपविण्याचा आणि त्याचे 'समन्वयन' माझ्याकडून करून घेण्याचा निर्णय घेतला होता. ग्रंथालीशी असणारे माझे संबंध, 'लोकराज्य'च्या निमित्ताने माझा अशा प्रकारच्या कामाशी आलेला संबंध, 'शब्द रुची'चा मी काढलेला मराठी भाषा विशेषांक, आणि माझी काम करण्याची पद्धत याचा त्यांनी प्राधान्याने विचार केला असावा. मी बराच वेळ का कू करीत होतो पण गांगल म्हणाले, 'तू पुढे हो, ग्रंथाली तुझ्या मागे आहे.' ही जबाबदारी स्वीकारताना आपल्याला फक्त 'समन्वयक' म्हणून काम करायचे आहे आणि ग्रंथाली खरोखरच आपल्या पाठीशी उभी आहे हे तोवर माझ्या लक्षात आले होते. ग्रंथाली- गांगल-केतकर यांच्याविषयी असणारा आदर आणि प्रेमापोटी हे (समन्वयनाचे) काम मी आनंदाने स्वीकारले. या निमित्ताने गांगलांकडून आपल्याला बरेच काही शिकायला मिळेल आणि विविध क्षेत्रांतील नामवंतांशी आपला स्नेह जुळून येईल हा सुप्त हेतूही मनात होताच. 'अभ्यागत संपादक' ही बिरुदावली मागे लावून घेताना वाचकांचा कोणताही गैरसमज नको म्हणून ही भूमिका आधीच स्पष्ट करत आहे.

हाताशी जेमतेम महिनाभराचा वेळ होता. युद्धपातळीवर काम करावे लागणार होते. असे काम करण्याचा मंत्रालयातील कामाचा मोठा अनुभव माझ्या गाठीशी होताच. पहिल्या चार-पाच दिवसांत आम्ही सर्वांनी मिळून एक कच्चा आराखडा तयार केला आणि कामाला सुरुवात केली. आधी ब्रेन स्टॉर्मिंगसाठी काही नावे पुढे आली. त्यांच्याशी चर्चा करून कोणाकडून कोणत्या विषयावर लिहून घ्यायचे हे ठरत होते. अनेक नावे समोर येत होती.

'केतकरांची पंचाहत्तरी आणि त्या निमित्ताने महाराष्ट्राची सुमारे पन्नास वर्षांची विविध क्षेत्रांतील वाटचाल' अशी भूमिका प्रारंभी साऱ्यांच्या मनात होती. तशी पत्रेही लेखकांना पाठवण्यात आली. मात्र ही भूमिका पुढे लवचीक वळणे घेत गेली, हे मान्य करायला हवे.

नव्या पिढीला केतकरांविषयी काय वाटते हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे, यावर साऱ्यांचे एकमत होते. पण निवडलेले लेखक उपलब्ध असणे आणि अत्यल्प कालावधीत त्यांच्याकडून लेख लिहवून घेणे हे समीकरण जुळत नव्हते. केतकर या नावाभोवतीचे वलय लक्षात घेता आपण काय लिहिणार अशी एक जोखीमवजा धास्तीही अनेकांच्या मनात दिसली. 'कुमार केतकर' या नावाला खरोखरच इतके पैलू आहेत की तो विषय एखाद्या विशिष्ट चौकटीत बसवणे दुरापास्त होते. असे विचारमंथन सुरू असताना, केतकरांना जवळून पाहणाऱ्या त्यांच्या मित्रांकडून त्यांच्या काही आठवणी किंवा त्यांच्यातील महत्त्वपूर्ण संभाषण शब्दांकनाच्या स्वरूपात मिळवावे अशी एक कल्पना पुढे आली आणि तिने चांगले मूळ धरले.

अंकातील जवळपास सर्व लेखकांशी आणि ब्रेन स्टॉर्मिंगच्या निमित्ताने पडद्यामागील अनेक नामवंतांशी मी बोललो. अनेक कल्पना पुढे आल्या, मागेही पडल्या. पत्रे, फोन, लघु संदेश, रिमाइंडर असे सगळे मार्ग अवलंबत पाठपुरावा करावा लागला. कोरोनाच्या संभ्रमित आणि काहीशा झाकोळलेल्या पार्श्वभूमीवर यातील बहुतेक काम घरातून आणि हातातील मोबाइलद्वारे झाले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या पार्श्वभूमीवर आमच्या नियोजनातील काही मोजके लेखच वाचकांपर्यंत पोहोचू शकत आहेत, काही कल्पनांची वाफ झाली, काही मध्येच लुप्त होऊन गेल्या तर काही मुद्यांपर्यंत आम्ही पोचू शकलो नाही याची आम्हाला जाणीव आहे. अंकात काय आहे याबाबत काही भाष्य करून द्विरुक्ती करण्याची गरज नाही. मात्र केतकर यांच्या पंचाहत्तरीच्या वळणावर एक छान डॉक्युमेंट तयार करू शकलो याचे समाधान ग्रंथालीला नक्कीच आहे.

ऐंशीच्या दशकात मुंबई विद्यापीठात एम.ए. करत असताना मी 'नवशक्ति'त अधुनमधून पुस्तक परीक्षणे लिहिण्याचे काम करत असे. एक दिवस भाऊ जोशींनी मला संपादक पु.रा. बेहेरे यांच्यासमोर उभे केले. आणि दुसऱ्या दिवसापासून मी तेथे उपसंपादक म्हणून रुजू झालो. भाऊंनी मला रविवार पुरवणीसाठी मदतनीस म्हणून घेतले. हे सांगण्याचे कारण असे, की केतकरांचे आदराचे स्थान असणारे भाऊ फाटक नेहमी

'नवशक्ति'च्या ऑफिसात येत असत. कधी कधी त्यांचा एखादा लेख किंवा स्टोरी 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये जाऊन केतकरांना देण्याची कामगिरी मी आणि नारायण बांदेकर आनंदाने पार पाडायचो. बांदेकर 'इकॉनॉमिक टाइम्स'मधली नोकरी सांभाळून फावल्या वेळात 'नवशक्ति'साठी काम करीत असत. तेव्हापासून म्हणजे 'इकॉनॉमिक टाइम्स'पासून 'दिव्य मराठी'पर्यंत केतकर यांच्या प्रत्येक कार्यालयात काही ना काही कारणाने मी त्यांना अनेकदा जाऊन भेटलो आहे. मंत्रालयात 'माहिती व जनसंपर्क महासंचालनालया'त काम करताना त्यांना भेटायला जाण्यासाठी मी मुद्दाम काही ना काही निमित्त शोधून काढत असे. केतकरांना माहिती अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रालयात आणि सह्याद्री गेस्ट हाऊसवर अनेकदा घेऊन गेल्याचे आजही आठवते. नवीन रुजू होणाऱ्या महासंचालकांना त्यांच्या भेटीसाठी मी आवर्जून घेऊन जात असे. मुख्यमंत्र्यांची 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात मुलाखत घेणे असो की शासनाचा लोकमान्य टिळक पुरस्कार स्वीकारण्यासाठी विनंती करणे असो, अशा वेळी मी पळत त्यांच्याकडे जायचो. केतकरांनी कधी आम्हाला निराश करून परत पाठवल्याचे आठवत नाही. 'लोकराज्य'च्या एका साहित्य संमेलन विशेषांकासाठी 'पिपात मेले ओल्या उंदीर' या मथळ्याखाली, आधुनिक मराठी कविता आणि एकूणच साहित्यावर मार्मिक भाष्य करणारा एक अप्रतिम लेख त्यांनी मला लिहून दिला होता. मंत्रालयात सनदी अधिकाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवणारी आयआयपीए नावाची एक यंत्रणा आहे. तेथे एकदा 'सोविएत युनियन' या विषयावर सुमारे दीड तास ते अस्खलित इंग्रजीतून बोलले होते. त्यांची ती बहारदार 'डिलिव्हरी' अजून माझ्या मनासमोरून हलत नाही.

सरकारी यंत्रणा मीडियापासून चार हात दूर राहणे पसंत करते पण केतकर सरकारमध्येही सर्वत्र प्रिय असल्याचे मी पाहिले आहे. मुख्यमंत्री, मंत्री, सचिव, जिल्हाधिकारी, सीईओ अशा साऱ्यांशी त्यांचे सदैव आपुलकीचे संबंध असतात, असे माझे निरीक्षण आहे. महाराष्ट्राचा राज्यशकट संकटसमयी सुरळीतपणे हाकला जावा किंवा एखाद्या पेचप्रसंगातून त्याला सुखरूपपणे बाहेर काढता यावे यासाठी त्यांनी पडद्यामागून केलेल्या कामाची माहिती फक्त वरिष्ठ सनदी अधिकारीच देऊ शकतील आणि ती फार मोलाची असेल, असे मला वाटते.

केतकर हे 'ग्रंथाली'चे प्रमुख आधारस्तंभ, त्यांच्या पंचाहत्तरीनिमित्त हा अंक प्रसिद्ध करताना त्याला कृतज्ञतेची एक झालरही आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रज्ञा, प्रतिभा आणि प्रगल्भतेचे मूर्तिमंत उदाहरण असणाऱ्या केतकरांचे ऋण व्यक्त करण्याची संधी येथेच घ्यायला हवी असे मला आवर्जून वाटते. **आणि म्हणूनच ह्या अंकासोबत केतकरांच्या निवडक लेखनाचे संकलन असणारे 'व्यासंग आणि विचार' हे 'ग्रंथाली'चे पुस्तकही आजच प्रसिद्ध होत असून ते सर्वत्र उपलब्ध करून दिले जात आहे.**

अंकाचे काम सुरू असताना अनेकांनी मला छोटीमोठी मदत करत, प्रोत्साहन देत, सांभाळून घेतले. नियोजनाच्या पातळीवर सुदेश, धनंजय गांगल, पद्मभूषण देशपांडे, अरुण जोशी, धनश्री धारप, शब्दांकनाच्या पार्श्वभूमीवर विकास नाईक, राधिका कुंटे, शिल्पा खेर, अक्षरजुळणीच्या अनुषंगाने योगिता मोरे आणि ग्रंथालीतील अन्य सहकाऱ्यांनी मला मोलाचे सहकार्य दिले. निलेश जाधव यांनी अतिशय अर्थपूर्ण असे मुखपृष्ठ तर प्रदीप म्हापसेकर यांनी बोलकी मांडणी करून दिली. वेळात वेळ काढून विविध विषयांवर लेख लिहून देणारे आमचे सगळे लेखक, आपल्या सहजसुंदर लेखाबरोबरच केतकरांची निवडक विचार-सूत्रे संकलित करून देणाऱ्या अंजली कीर्तने आणि शब्दांकनासाठी सहकार्य देणारे सर्व मान्यवर यांचे मानू तेवढे आभार कमीच होतील. शब्दांकन विभागातील मान्यवरांच्या नावावर एक नजर टाकली तरी किती दिग्गजांना आपण या अंकाशी जोडू शकलो याचे अपरिमित समाधान ग्रंथालीला लाभले आहे.

अंकाचे खरे सूत्रधार दिनकर गांगल यांच्यासोबत जवळपास महिनाभर सतत संपर्कात होतो. त्यांचे एकूणच काम लक्षात घेता त्यांनी कधी आपला मुद्दा सोडला किंवा ते कधी उताराच्या दिशेने वाहत गेले असे आढळून आले नाही. त्यांच्या 'सखोल संपादन-शिस्तीचा' पीळही कधी सुटलेला दिसला नाही. हे काम करताना मी जेथे जेथे पोचायचो तेथे तेथे ते माझ्या आधी जाऊन पोचलेले असत; हा माझ्यासाठी एक आनंदाचा आणि आश्चर्याचा धक्का असायचा. एखादे फूल जसे आतून फुलत जाते तसे संपादनाचे कामही बाहेरील छेडछाडीपेक्षा आतल्या अंगाने फुलून आले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष दिसला. कळत-नकळत झालेल्या या प्रशिक्षणाने मला मिळालेली समृद्धी यापुढे कायम माझ्यासोबत राहणार आहे. माझ्या वृत्तपत्रीय लेखनाचा श्रीगणेशा सुमारे चाळीस वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र टाइम्स'मधून गांगलांचे बोट धरून झाला आणि आज त्यांनीच मला विश्वासाने 'संपादकपदा'च्या खुर्चीत बसवले, यापेक्षा दुसरा आनंद तो काय असू शकतो? या संपादकीय मनोगताच्या निमित्ताने केतकर-गांगल-ग्रंथालीला त्रिवार अभिवादन!

**– प्रल्हाद जाधव**
भ्रमणध्वनी : ९९२००७७६२६
pralhadjadhav.one@gmail.com

# आठवणींच्या जुन्या पुलावरून...



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**अंजली कीर्तने**

*वैचारिक दृष्ट्या आपण दोन ध्रुवांवर होतो. तरीही तू सातत्यानं आमचे लेख छापत होतास. विरुद्ध विचारांना प्रकट व्हायला वाव देत होतास. तुझी ती वैचारिक सहिष्णुता आणि औदार्य मला आजही फार मोलाचं वाटतं. संपादक बनण्यासाठी जे अष्टपैलू, बहुआयामी, बहुश्रुत, दक्ष आणि प्रज्ञावंत व्यक्तिमत्त्व आवश्यक असतं ते तुझ्याकडे आहेच; परंतु त्यापलीकडची एक विलोभनीय गोष्ट तुझ्यापाशी आहे. ती म्हणजे माणसांच्यातला तुझा उत्कट रस.*

प्रिय कुमार,

आज तुझा वाढदिवस. पंचाहत्तरीनिमित्त तुला हार्दिक शुभेच्छा. कॉ. अहिल्या रांगणेकर पंचाहत्तरीच्या झाल्या, तेव्हा परळच्या दामोदर सभागृहात त्यांचा सत्कार झाला होता. तेव्हा त्यांना ७५ लाल गुलाब दिले गेले. मला ती कल्पना खूप आवडली. 'हार्दिक शुभेच्छा' या सांकेतिक शब्दांत ७५ लाल गुलाब बहरले आहेत, हे तू लक्षात घे. तुझ्या पंचाहत्तरीच्या निमित्तानं तुला पत्र लिहायला बसले आहे. खरं तर, हे पत्र मी मनातल्या मनात अनेक वर्षं लिहिते आहे. आज त्या पत्राला मनाच्या तळातून पृष्ठभागावर यायची संधी मिळाली इतकंच. एखाद्या व्यक्तीबद्दल आपल्याला काय वाटतं ते आपण बोलून दाखवतोच असं नाही. ते सारं मनातल्या मनात पडून असतं. आज ते तुला सांगावंसं वाटतं आहे.

मी कॉलेजात असल्यापासून तुला दुरून ओळखत होते, की हा 'ग्रंथाली'चा कुमार केतकर. दिनकर गांगल, अरुण साधू यांचा जानी दोस्त. रुइया कॉलेजात 'ग्रंथाली'ची पहिली बैठक झाली होती तेव्हा आणि 'कऱ्हाड साहित्य संमेलना'त तुला पाहिल्याचं आठवतं. दादरला 'ग्रंथाली'च्या गच्चीत बैठका भरायच्या. तिथेही तू असायचास. तू इंग्रजीत पत्रकारिता करतोस, असं ऐकलं होतं. पण 'ग्रंथाली'च्याच संदर्भचौकटीत मी तुला ओळखत होते. त्या पलीकडचा तू मला ठाऊक नव्हतास. केव्हातरी विनता लागूनं सांगितलं की कुमार केतकर म्हणजे शारदा साठेचा नवरा. तेवढीच ज्ञानात भर पडली. तुझा आणि माझा परिचय झाला तो तू 'महाराष्ट्र टाइम्स'चा संपादक झाल्यानंतर. तोसुद्धा माझ्या नवऱ्याच्या, सतीशच्या प्रेरणेनं. आम्ही तुझे अग्रलेख वाचायचो. त्यावर चर्चा करायचो. त्यातला ताजेपणा, चिंतनशीलता आणि खास तुझी अशी बहुढंगी लेखनशैली आम्हाला आवडत होती. तुझ्या अग्रलेखांनी अनेकांचं लक्ष वेधून घेतलं होतं. आमच्याकडे एकदा बडोद्याचे निशिगंध देशपांडे आले होते. ते म्हणाले, ''तुमचे ते कुमार केतकर कम्युनिस्ट आहेत ना? पण ते हळूहळू टोपी फिरवताहेत.'' आम्ही म्हटलं, ''चांगलं आहे ना मग. वाईट काय त्यात?''


'भांडवलशाहीचा वेध' हा अग्रलेख वाचून सतीश मला म्हणाला, ''अंजू, तुमचा अग्रलेख आवडला म्हणून केतकरांना कळवू या का?'' मी उत्साहानं म्हटलं, ''हो, जरूर. आता फोन लाव. केतकर आपल्याला थोडंसं ओळखत असतील. मुंबई विद्यापीठातल्या एका चर्चासत्रात आपली भेट झाली होती.'' सतीशनं फोन लावला आणि त्याला अग्रलेखातलं काय आवडलं ते त्यानं तुला सांगितलं. तुझा प्रतिसाद उत्साहवर्धक होता. तू म्हणालास,आपण एकदा भेटायला हवं. एकदा कशाला, परवा काय करताय? 'महाराष्ट्र टाइम्स'सारख्या विख्यात दैनिकाचा संपादक इतक्या साधेपणी फोनवर बोलतो आणि भेटीचं आमंत्रण देतो! तेही लगेच! नवलच होतं. ठरलेल्या दिवशी आपण एकत्र जेवायला गेलो. म्युझियमजवळच्या 'गोल्डन गेट'मध्ये रोज दुपारी सॅलेड बुफे असायचा. गप्पा मारायला जागा निवांत आणि प्रसन्न. आम्ही 'टाइम्स'च्या कार्यालयात आलो आणि तेथून आपण एकत्र गेलो. त्या दिवशी आपल्या ओळखीला सुरुवात झाली. तू इंग्रजी पत्रकारिता सोडून मराठीत आला होतास. आम्हाला तुझ्याबद्दल कुतूहल होतं. इंग्रजीतला तुझा अनुभव, तुझं म.टा.मधलं आगमन, आणीबाणीचा काळ, तुझा आणीबाणीला असलेला पाठिंबा; त्यामागची कारणं यांविषयी तू मोकळेपणी बोललास. गंमत म्हणजे तू आणीबाणीचा समर्थक असूनही तू स्वातंत्र्यवादी होतास. व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य मानवी जीवनात महत्त्वाचं मानत होतास. सतीश आणि मी आईन रँड या अमेरिकन तत्त्वज्ञ लेखिकेचे आणि तिच्या 'ऑब्जेक्टिव्हिझम' या तत्त्वज्ञानाचे खंदे समर्थक. भांडवलशाहीचे पुरस्कर्ते. त्यावरही बोलणं झालं. तुला त्याची थोडीशी कल्पना होती, असं वाटतं. ''पूर्वी मी केवळ साम्यवादीच नव्हे तर पक्का स्टॅलिनिस्ट होतो'' असं तू म्हणालास, पण तरीही तुला आईन रँडबद्दलही उत्सुकता होती. तूही आमची भूमिका जाणून घेऊ इच्छित होतास.

मला सगळ्यात काय आवडलं सांगू? तू लांब चेहरा करून, अतिगंभीरपणे बोलणारा विचारवंत नव्हतास. बोलताना तू आम्हा पामरांसारखाच खळखळून हसत होतास, विनोद करत होतास. तुझ्यात एक खट्याळ आणि उत्साही मूल होतं. त्यामुळे परकेपणा विरून गेला. मी तुला विचारलं, 'ऑब्जेक्टिव्हिझम'च्या संदर्भात वर्तमान घटनांवर आम्ही दोघांनी मिळून म.टा.त काही लिहिलं तर चालेल का?'' तू म्हणालात, ''लिहा ना. जरूर लिहा.'' मी म. टा.चीच लेखिका होते. ललित लेखन करत होते. पुस्तक परीक्षणं लिहीत होते. परंतु आता वाटत होतं, की सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर वैचारिक लेखन करावं. परंतु वृत्तपत्रीय क्षेत्रात समाजवादाचा दबदबा इतका होता की भांडवलशाहीचा पुरस्कार करणारं लेखन कोणी छापेल का, याविषयी आम्ही साशंक होतो. पहिल्याच भेटीत हिरवा बावटा दाखवून तू तो प्रश्न सोडवून टाकलास. मी आणि सतीश त्वरित कामाला लागलो. आम्ही पहिला लेख लिहिला, तो मुक्त अर्थव्यवस्थेवर. तो तुला देण्यासाठी आम्ही म. टा.च्या कार्यालयात चारपाच दिवसांनी आलो. तू झर्रकन लेखावरून नजर फिरवलीस. आमच्याकडे रोखून पाहात तू विचारलंस, ''मुक्त की खुली?''

सतीश म्हणाला, ''नाही नाही, खुली नाही. मुक्तच!''

''अर्थात माझी काही हरकत नाही.''

'मुक्त की खुली?' असा प्रश्न तू का विचारलास. असा प्रश्न आम्हाला पडला. त्याचं उत्तर तुझा परिचय वाढल्यावर मिळालं, की



**डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या चरित्राचे प्रकाशन. मध्यभागी न्या. सत्यरंजन साठे.**

तू नेहरूंनी भारतात रुजवलेल्या खुल्या अथवा मिश्र अर्थव्यवस्थेचा समर्थक होतास. तिचं स्थान संपूर्ण खाजगीकरण आणि संपूर्ण सरकारी नियंत्रण यांच्या मधोमध होतं. लेख दिल्यानंतर अवघ्या चार दिवसांत तू लेख छापलास. मुख्य म्हणजे आमच्या कोणत्याही मुद्यांना धक्का लागला नव्हता. 'मुक्त अर्थव्यवस्था : एक चिंतन' या आमच्या साध्यासुध्या शीर्षकाला तू आकर्षक रूप दिलंस: 'मुक्त अर्थव्यवस्थेतच फुलणारी सर्जनशीलता.' लेख, अग्रलेख,पत्रं, सदरं यांना चपखल शीर्षकं देण्याची खास संपादकीय नजर तुझ्यापाशी होती, हे नंतरही अनेकदा जाणवलं. त्यानंतर लगेचच, म्हणजे २६ जानेवारी १९९७ रोजी प्रजासत्ताकदिनाच्या खास पुरवणीत आमचा 'सरकार कशासाठी, कोणासाठी?' हाही लेख तू छापलास. आम्ही तुझे आभार मानले तेव्हा तू आवर्जून सांगितलंस, ''Keep writing.'' हे अद्भुतच घडत होतं.

'Keep writing.' हे तुझं वाक्य आमच्या दृष्टीनं प्रेरक होतं. तू तुझा शब्द पाळलास. वाहतूकदारांचा संप, स्पर्धाकायदा, सेवाकर, चलनफुगवटा, खाजगीकरण, उद्योजकांच्या समस्या, यांसारख्या विषयांवरील आमच्या लेखांना तू म.टा.च्या 'अर्थव्यवहारा'च्या मातब्बर पानावर स्थान दिलंस. 'बदलती नाती' हे सदर तर मला इतकं आवडलं, की मी त्यात तीन लेख लिहिले 'शतकाचे शिल्पकार' या सदरात तू माझा आईन रँडवरचा प्रदीर्घ लेख छापलास. एखादा लेख लगेच टाकणं शक्य नसेल, तर तू तो पत्र म्हणून छापायचास. त्या काळी इमेलवरून लेख पाठवायची प्रथा नव्हती. लेख देण्यासाठी आम्ही तुझ्या कार्यालयात यायचो. त्यानिमित्त तुझ्याशी विचारांची देवाणघेवाण व्हायची. वैचारिक दृष्ट्या आपण दोन ध्रुवांवर होतो. तरीही तू सातत्यानं आमचे लेख छापत होतास. विरुद्ध विचारांना प्रकट व्हायला वाव देत होतास. तुझी ती वैचारिक सहिष्णुता आणि औदार्य मला आजही फार मोलाचं वाटतं. ती ज्याच्याकडे असते तो जातिवंत संपादक म्हणून ओळखावा.

तू आमच्या लेखनाला वाव देत असल्यामुळे आम्ही अधिक सजग बनलो. जाणीवपूर्वक लेखन करू लागलो. तुझा प्रतिसादही तितकाच तत्पर असायचा. ''लगेच आणून दे. उद्याच.'' त्यामुळे आम्हाला जास्त वेळ दळण न दळता, आपले विचार थोडक्यात पण मुद्देसूदपणे मांडायची वृत्तपत्रीय सवय लागली. सामाजिक प्रश्नांव्यतिरिक्त मला साहित्यिक आणि सांस्कृतिक विषयांवर लिहायचीही ओढ होती. मी आणि सतीश युरोपच्या दौऱ्यावर जाणार होतो. जर्मनीतील अनुगा शहरी 'इंटरनॅशनल फूड फेस्टिव्हल' होणार होतं. मी पत्रकार म्हणून जर तिथे गेले असते तर तिथलं प्रेस मटिरियल मला मिळालं असतं. तू मला म.टा.ची प्रतिनिधी असल्याचं पत्र दिलंस. परतल्यावर मी त्या महोत्सवावर दोन प्रदीर्घ लेख लिहिले. तू ते रंगीबेरंगी फोटो टाकून मोठ्या कौतुकानं छापलेस. तू 'महाराष्ट्र टाइम्स'मधून 'लोकसत्ता'त गेलास तेव्हा आम्हीही 'लोकसत्ता'त लिहू लागलो.

तू आमची विचारसरणी मान्य नसतानाही आमचे इतके लेख छापलेस, यामागचं कारण मला २०१८ साली तुझ्याच तोंडून ऐकायला मिळालं आणि आनंद झाला. 'बहुरूपिणी दुर्गा भागवत' या माझ्या पुस्तकाचं प्रकाशन पुण्यात तुझ्या हस्ते झालं. तेव्हा तू तुझ्या भाषणात म्हणालास, ''मी कम्युनिस्ट. अंजली आणि सतीश कॅपिटॅलिस्ट. आमच्या विचारधारा अगदी भिन्न असूनही मी इथं आलो, कारण ही माणसं प्रामाणिक आहेत. त्यांचे विचार सच्चेपणी मांडतात. आजवर अंजलीच्या कोणत्याही कार्यक्रमाला मी कधी नाही म्हटलेलं नाही.'' हे अगदी खरं आहे. कार्यक्रम कोणताही असो, प्रा. म.वा. धोंड यांची नव्वदी असो, विंदा करंदीकरांच्या सत्काराचा कार्यक्रम असो, पुस्तकप्रकाशन असो वा माझ्या लघुपटाच्या निधिसंकलनासाठी आयोजित केलेला कार्यक्रम असो, मला पहिली आठवण तुझी यायची.आजही येते. तुझं प्रवाही आणि दिलखुलास भाषण ऐकायची ती संधी असते. बोलता बोलता, मी खूप पुढच्या काळात पोहोचले. मी तुला सांगणार होते एक वेगळीच आठवण.

तुला आईन रँडविषयी औत्सुक्य असल्यानं आमच्या ग्रुपमध्ये तुला घेऊन जावं असं आम्हाला वाटत होतं. आपली ओळख झाल्यानंतर लवकरच ती संधी आली. १९९७च्या फेब्रुवारीचा सुमार. आमचा दिल्लीतला मित्र बरुण मित्र यानं देवळालीच्या 'लेस्ली सॉवनी सेंटर'मध्ये दोन दिवसांचं चर्चासत्र आयोजित केलं होतं. बरुण आमच्यासारखाच आईन रँडच्या 'ऑब्जेक्टिव्हिझम'चा एक पुरस्कर्ता. त्याला मी आणि सतीश आयोजनात मदत करत होतो. त्या चर्चासत्रात त्यानं तुला बोलावावं असं आम्ही त्याला सुचवलं. तो म्हणाला, ''काहीच हरकत नाही. तुम्ही त्यांना विचारा.'' त्यांना कोणता विषय आवडेल तेही विचारा. तू आनंदानं तयार झालास. तू विषय निवडलास, 'राजकारणाचं उदारीकरण' (Liberalisation of Politics) तुला मुंबईहून आणण्याची जबाबदारी बरुणनं आमच्यावर सोपवली. गाडीतून देवळालीला जाताना आपल्या निवांत गप्पा झाल्या. त्या वेळी जाणवलं की, कॉ. डांगे, एम.एन. रॉय, जे. कृष्णमूर्ती यांसारख्या अनेक विचारवंतांचा प्रभाव तुझ्यावर आहे. ते सर्व प्रभाव पचवूनही तुझा तू स्वतंत्र आहेस. 'रंगूनि रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!' इतकंच नव्हे, तर कोणत्याही कंपूत जाऊन त्यांच्या विरुद्ध मतं मांडण्याचं धाडसही तुझ्यापाशी आहे. वेगवेगळे विचारप्रवाह जाणून घ्यायच्या प्रक्रियेचाच एक भाग म्हणजे तुझं आईन रँडबद्दलचं औत्सुक्य. त्यामुळेच तू त्या व्यासपीठावर येऊन बोलायला तयार झालास. नंतर केव्हातरी आईन रँडची 'अॅटलस श्रग्ड' ही जाडजूड कादंबरी तुला आम्ही वाचायला दिली आणि तू तुझ्या एवढ्या व्यापांच्या धबडग्यातही ती वाचून पूर्ण केलीस.

देवळालीला सकाळच्या चर्चासत्रात तुझ्याबरोबर शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशीही बोलणार होते. त्यांचा विषय ठाऊक नव्हता. बरुण हसत हसत म्हणाला, ''आम्हाला जोशींनी केतकरांचा विषय विचारला. तो सांगताच ते म्हणाले, 'आय सी! मग मी उदारीकरणाचं राजकारण (Politics of Liberalisation) या विषयावर बोलेन.' आता चर्चा चांगलीच रंगणार आहे.'' झालंही तसंच. तुम्ही दोघं उत्तम वक्ते. दोघांचंही

इंग्रजीवर प्रभुत्व. मिस्किलपणे प्रतिस्पर्ध्याला कोपरखळ्या मारण्यात दोघं वाकबगार. राजकारण, अर्थकारण, आर्थिक सुधारणांचे नवे वारे, भारतीय उद्योगजगत, समाजव्यवस्थेतील बदल इत्यादी मुद्यांवर तू आणि जोशी हिरीरीनं बोललात. तू तुझ्या भाषणातून नेहरूप्रणीत मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केलास. तू बोलताना सतत 'Quote-Unquote; Quote-Unquote' म्हणत होतास आणि हातांनी अवतरणचिन्हांची खूणही करत होतास. जोशी यांनी ही लकब नेमकी हेरली. तीच शैली स्वीकारून त्यांनी मुक्त अर्थव्यवस्थेची बाजू मांडली. जाता जाता, तुझ्या नेहरूप्रेमावरूनही त्यांनी तुला बरेच रेशमी चिमटे काढले.

ते दोन दिवस छान गेले. पहाटे आपण जवळच्या टेकडीवर फिरायला गेलो. मुंबईला परतताना गाडीतही पुन्हा गप्पा झाल्या. मी तुला म्हटलंसुद्धा, केतकर, तुमच्याशी पोटभर बोलायचं असेल तर अधूनमधून तुम्हाला असं 'किडनॅप' करायला हवं. तुझ्याशी जुळलेल्या नात्यामुळे आमच्या जीवनाचं रूपांतर 'सुहाना सफर'मध्ये झालं. परिचयाच्या अगदी प्रारंभीच तू स्वत:हून तुझ्या घरचा फोन नंबर आम्हाला दिलास आणि सांगितलंस, ''कधीही फोन करा. मी फोन घेतो. एखाद्या वाचकानं सकाळी सातला फोन केला तरी मी घेतो. त्यानं बिचाऱ्यानं कुठूनतरी माझा नंबर शोधून काढलेला असतो. त्याला बोलायची उत्सुकता असते. माझे लेख कसे पोहोचतात हे मलाही त्यातून कळतं.'' तुला एक गंमत सांगते. एका पत्रकारानं (बहुधा प्रवीण टोकेकर) मला एकदा सांगितलं, ''केतकर सदैव जागे असतात. रात्री दोन वाजता जरी फोन केला तरी लगेच फोन उचलतात. तुम्ही करून बघा.'' मी म्हटलं, ''करून काय बघा! रात्री दोन वाजता फोन करून मी बोलू काय?'' पण त्यातून मला जाणवली ती तुझी अखंड जागरूकता, चैतन्य आणि कार्यनिष्ठा.

संपादक म्हणून मला जाणवलेली तुझी किती वैशिष्ट्यं सांगू! तू सदरांसाठी कल्पकपणे विषय निवडायचास. आमच्याप्रमाणेच अनेकांना तू लिहितं केलंस आणि 'एडिटर्स चॉईस,' 'बदलत्या विश्वाचे अंतरंग,' 'त्रिकालवेध' यांसारख्या सदरांतून स्वत:ही भरघोस लेखन केलंस. संपादकपदाची व्यवधानं सांभाळून, गंभीर तात्त्विक विषयांची तयारी करायला तुला वेळ कसा मिळायचा, हे कोडं मला उलगडलेलं नाही. असली आव्हानं स्वीकारण्यात तुला प्रचंड बौद्धिक आनंद मिळत असावा. यालाच मी संपादकाची सर्जनशीलता म्हणेन. म.वा. धोंडांचा शब्द वापरायचा तर तू 'विपुलपर्णी संपादक' होतास. तुला एकाच वेळी अनेकविध गोष्टींविषयी कुतूहल असतं. दांडग्या स्मरणशक्तीचं वरदान असल्यानं सनावळ्यांसकट सारे तपशील तुझ्या मस्तकात योग्य त्या जागी चपखल बसलेले असतात. हव्या त्या प्रसंगी ते तुझ्या मन:पटलावर सहज प्रकाशमान होतात. मानसशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, विज्ञान, समाजशास्त्र यांसारख्या 'अवजड' विषयांत तुला कमालीचा रस आहे. त्यावरचं तुझं वाचनही जबरदस्त आणि अद्ययावत. स्नेही म्हणून आम्हाला तुझा अभिमान वाटतो.

संपादक बनण्यासाठी जे अष्टपैलू, बहुआयामी, बहुश्रुत, दक्ष आणि प्रज्ञावंत व्यक्तिमत्त्व आवश्यक असतं ते तुझ्याकडे आहेच;




म. वा. धोंड यांच्या नव्वदीनिमित्त सत्कार करताना कुमार केतकर

परंतु त्यापलीकडची एक विलोभनीय गोष्ट तुझ्यापाशी आहे; ती म्हणजे माणसांच्यातला तुझा उत्कट रस. तुझी लोकाभिमुखता. तू हस्तिदंती मनोऱ्यावर राहून जीवनचिंतन करणारा 'विजनवासी विचारवंत' नव्हेस. सामान्य माणसांनाही मनाच्या नकाशात स्थान देण्याचा साधेपणा तुझ्यापाशी आहे. संपादकपदाचे व्यापताप आणि ताणतणाव पेलत असतानाही, तू वेगवेगळ्या क्षेत्रांतील माणसांसाठी वेळ द्यायचास. सामाजिक, सांस्कृतिक चळवळींत सहभागी व्हायचास. माणसांच्या भेटींतून तुला ऊर्जा आणि समाधान मिळत असावं. बुद्धिमान माणसांचं तर तुला प्रचंड आकर्षण वाटतं. एक आठवण सांगते.

परमिटराज कमी करून डॉ. मनमोहनसिंग यांनी आर्थिक सुधारणांचा पाया घातला, त्याला काही वर्षं झाली होती. हे परिवर्तन भारतात कितपत रुजलं, सद्यपरिस्थितीबाबत अर्थतज्ज्ञ, राजकारणी, पत्रकार, उद्योजक यांना काय वाटतं हे जाणून घेण्यासाठी १९९८च्या सुमारास मी आणि सतीशनं 'बदलतं जग बदलती मनं' नावाची मुलाखतमाला आयोजित केली होती. पुण्याच्या 'युनिक फीचर्स'नं ती महाराष्ट्रातल्या विविध वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली होती. टाटांचे आर्थिक सल्लागार द.रा. पेंडसे, सुवर्णतज्ज्ञ मधुसूदन डागा, 'ईस्ट इंडिया शिपिंग कार्पोरेशन'चे मालक सुधीर मुळजी, उद्योजक वीरेन शहा, इंग्रजी पत्रकार स्वामिनाथन अंकलेसरीया अय्यर, जागतिक बँकेचे अधिकारी दीना खटखटे यांसारख्या दिग्गजांच्या मुलाखती आम्ही घेतल्या होत्या. एकदा बोलता बोलता आम्ही तुला सांगितलं, ''दीना खटखटे मुंबईत आले असता त्यांनी आम्हाला 'बॉम्बे जिमखान्या'त जेवायला बोलावलं होतं. मुलाखतीत त्यांनी मुक्त अर्थव्यवस्थेचं महत्त्व जागतिक संदर्भ देऊन फार सुंदर मांडलं.'' तू आश्चर्यानं म्हणालास, ''अरे व्वा ! दीना खटखटेंना तुम्ही भेटलात? अत्यंत बुद्धिमान माणूस आहे तो. मला त्यांच्याबद्दल फार

आदर आहे. परत ते आले, तर मला सांगा. मला त्यांना भेटायला आवडेल.'' त्यानंतर काही महिन्यांनी ते अमेरिकेहून आले आणि आपण त्यांना भेटायला 'बॉम्बे जिमखान्या'त गेलो. जेवणाच्या टेबलावर जागतिक अर्थकारण-राजकारण रंगलं. त्यांची तिखट जीभ, संदर्भसमृद्धता आणि मूलभूत विचार यांमुळे त्यांच्या बोलण्याला न्यारीच लज्जत होती. गप्पा मारताना ते सहजच त्यांच्या काही लेखांविषयी बोलले. तू तत्परतेनं म्हणालास, तुमचे लेख म.टा.त छापायला मला आवडतील. खटखटे मला म्हणाले, तुम्ही कराल का त्यांचं मराठीत भाषांतर? मी म्हटलं, हो, आनंदानं. त्यानंतर त्यांचे चारपाच लेख मी भाषांतरित केले. इंग्रजी अर्थशास्त्रीय लेखांचं भाषांतर करताना लेखणीला वेगळा रियाज झाला.

'बदलतं जग बदलती मनं' या मुलाखतमालेत आम्ही तुझीही मुलाखत घेतली होती. तुझं म.टा.तलं काम आटोपल्यावर संध्याकाळी आम्ही तुला आमच्या घरी जेवायला बोलावलं होतं. बदलत्या जगात तूही बदलला होतास. त्याचा वेध घेण्यास आम्ही उत्सुक होतो. मुलाखतीतला एक प्रश्न असा होता, ''एके काळी तुम्ही स्टॅलिनिस्ट होता. परंतु आज तुम्ही साम्यवादाचा त्याग केलेला दिसतो. हा बदल तुमच्यात कशामुळे झाला?'' तू उत्तरलास, ''आज मी स्टॅलिनिस्ट उरलेलो नाही, हे तर खरंच आहे. रशियातील वा अन्य देशांतील साम्यवाद ढासळण्यापूर्वी मी रशियात गेलो होतो. तेथील समाजाची दुरवस्था, माणसांचं दबलेपण, तुटवड्याचं-तुटपुंजेपणाचं अर्थकारण, व्यक्तिस्वातंत्र्य नाकारल्यानं निर्माण झालेल्या समस्या, उद्योगधंद्यांची परिस्थिती हे सर्व प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहताना माझा भ्रमनिरास झाला. बाजारपेठ हा घटक पूर्णत दुर्लक्षिला गेला तर एखाद्या देशाचा आर्थिक पाया किती ढासळू शकतो हे रशियातील परिस्थितीवरून स्पष्ट झालं होतं.''

त्या दिवशी तुझ्याबद्दल काही गोष्टी नव्यानं कळल्या.तुझे शाळकरी दिवस; तरुण वयात वडिलांनी तुला दिलेला '"Earn and learn'चा संदेश; तू पोटापाण्यासाठी केलेलं रेडिओ दुरुस्तीचं काम; इत्यादी. तुला आठवतं का, त्या दिवशी आणखी एक गंमत घडली होती. तुला 'चिंतामणराव देशमुख पुरस्कार' मिळाल्यानिमित्त, 'वृत्तमानस'मध्ये 'विनम्र बालक' या टोपणनावानं तुझ्यावर एक मजेदार लेख आला होता. बालकानं तुझ्या मित्रांच्या यादीत माझा आणि सतीशचा उल्लेख केलेला पाहून तू म्हणालास, या बालकानं सॉलिड संशोधन केलेलं दिसतं आहे! लेखातली काही भन्नाट वाक्यं ऐक, 'पत्रकारितेच्या व्यवसायाला न शोभणारा असा, स्वखर्चानं पुस्तकं घेऊन वाचण्याचा वाईट नाद आपणांस आहे....आपण...अद्यापही पूर्वीप्रमाणे चळवळीतल्या गरीब दोस्तांबरोबर मुंबई...ते ठाणे असा (फर्स्ट क्लासचा पास खिशात असूनही) सेकंड क्लासचा लोकल प्रवास करता....म.टा. च्या कार्यालयात निवांतपणे संपादकपदी विराजमान न राहता... सारखे इकडून तिकडे फिरत असता. मध्येच विनोद करता. मध्येच तंब्या देता. हे दृश्यही वैभवशाली तळवलकरी परंपरेला छेद देणारं आहे.' हे वाचताना आपण तिघं मनमुराद हसत होतो. एकंदरच, ती संध्याकाळ मोठ्या मजेत गेली. शारदाचा फोन आला, तेव्हा तू घड्याळाकडे बघितलंस आणि पटकन् उठलास. ''अरे बापरे, किती वाजलेत कल्पना आहे का सतीश? बारा वाजले बारा! आता मला पळायलाच हवं.''

मुलाखत लिहून काढताना लक्षात आलं, की काही मुद्यांची उत्तरं मिळालेली नाहीत. त्यासाठी परत भेटायला हवं. सतीशनं तुला फोनवरून सांगितलं, ''अंजूला काही शंका आहेत. तिला परत भेटायचंय.'' वाटलं, तू आता वैतागणार. (वैतागलाही असशील!) एका मुलाखतीसाठी किती वेळ घालवायचा! पण तरीही तू वेळ दिलास. संध्याकाळी तू मला म.टा.च्या कार्यालयात बोलावलंस. मात्र तू म्हणालास, ''गाडीतून घरी जाताना मी बोलीन. कुठेतरी थांबून बोलण्याइतका वेळ नाही. पाहिजे तर गाडी लांबून लांबून नेऊ.''

त्या दिवशी मला तुझं आगळंवेगळं रूप बघायला मिळालं. नेहरूंच्या संदर्भात कोणीतरी केलेलं एक विधान मी उच्चारलं की नेहरूंनी शेतीची वाट लावली. तू रागानं लालेलाल झालास. कसंबसं स्वत:वर नियंत्रण ठेवत तू विचारलंस, ''तुला कोणी सांगितलं?'' मी सांगणाऱ्याचं नाव उच्चारताच तू संतापून म्हणालास, ''जा आणि त्याच्या दोन थोबाडीत देऊन ये.'' वैचारिक चर्चेत असं बोलताना मी तुला कधी पाहिलं नव्हतं. तुझं रौद्र रूप मला अपरिचित होतं. मात्र एखाद्या बेसावध क्षणी झालेल्या उद्रेकातूनच 'माणूस' दिसतो. त्यामुळे माणसाची भ्रामक प्रतिमा मनात जोपासली जाण्यापासून आपण बचावतो. तात्कालिक मुलाखतीपेक्षाही मला तुझं 'माणूसपण' अभ्यासणं जास्त रोचक वाटलं.

तुझ्या व्यक्तिमत्त्वाचा विचार अनेक अंगांनी करता येईल. तू उत्तम वक्ता आहेस. तू बाबूराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्यांपासून अर्थशास्त्रीय प्रश्नांपर्यंत कोणत्याही विषयावर सहजपणे बोलू

> 'अथकपणे शोध घेणे आणि
> कुतूहलातील आनंद
> टिकवून ठेवणे; विश्वाच्या गूढाने
> दिङ्मूढ होणे
> आणि निसर्गसौंदर्याने
> हरखून जाणे, जीवनाचे गाणे
> सर्वच माणसांना आनंदाने गाता
> यावे म्हणून प्रयत्नशील राहणे
> आणि आपल्या अल्पायुष्याला
> अर्थपूर्ण बनविणे इतके मात्र
> आपल्या हाती असते. मी फक्त
> तितकेच केले आहे.'
> (मनोगत - 'विश्वामित्राचे जग')

शकतोस. तू परदेशी विद्यापीठांत जाऊन व्याख्यानं देतोस. तुला साहित्य, अभिजात संगीत, समाजशास्त्र, राजकारण, अर्थकारण, विज्ञान अशा अनेक विषयांत उत्कट रस आहे. तुझ्या अनुभवांचं क्षितिज पत्रकार म्हणून जगभर भ्रमंती केल्यानं व्यापक आहे. तू वेगवेगळ्या संस्थांशी संबंधित आहेस. आता तर तू राजकीय क्षेत्रात कार्यरत झाला आहेस. मात्र तुझा आणि आमचा स्नेह जुळला तो संपादक-लेखक नात्यातून. त्यामुळे तुझ्या अनेक प्रतिमांपैकी तीच प्रतिमा माझ्या मनात झळाळत आहे.

पत्र संपवण्यापूर्वी तुला एक प्रश्न विचारावासा वाटत आहे. तू वृत्तपत्राचा संपादक होतास तेव्हा तू कम्युनिस्टांपासून काँग्रेस पक्षापर्यंत कोणावरही तुझ्या अग्रलेखातून मोकळेपणी टीका करायचास. तू मनानं तेव्हाही काँग्रेसचा असलास, तरी त्या पक्षाच्या मतांचं वा भूमिकेचं समर्थन करायचं बंधन तुझ्यावर नव्हतं. तू आता काँग्रेसचा खासदार झाला आहेस. माणसानं एखाद्या पक्षाची बांधिलकी स्वीकारली की त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर, अभिव्यक्तीवर मर्यादा येतात. तो पक्षाविरुद्ध जाहीर भूमिका घेऊ शकत नाही. पक्षाला मान्य असेल, तीच भूमिका त्याला धारण करावी लागते. मग ती स्वत:ला पटो वा न पटो. उलट्या अर्थी, तुझा बेकेट झाला आहे. बेकेट राजाचा मित्र होता. तो राजाच्याच आग्रहानं धर्माध्यक्ष झाला. तो राजाला सांगत होता, 'मी जर धर्माध्यक्ष झालो तर तुमचा मित्र राहू शकणार नाही. ईश्वराची आणि तुमची, दोघांची सेवा करणं मला शक्य नाही.' त्यानं धर्माध्यक्ष झाल्यामुळे देवाशी बांधिलकी स्वीकारून आपला 'धर्म' पाळला. वेळप्रसंगी राजाशीही वैर पत्करलं. तुझ्याबाबतीत नेमकं उलटं झालं. तू तुझा धर्म संपादक म्हणून पाळतच होतास. तुझी निष्ठा तुझ्या विचारांशी होती. तू त्याबाबत तडजोड केली नाहीस. तू तशीच वेळ आली तेव्हा संपादकपदांचा राजीनामा देऊन मोकळा झालास आणि आत्मनिष्ठा जपलीस. तुझी निष्ठा आता एका राजकीय पक्षाशी बांधलेली आहे. तुला संपादक म्हणून असलेलं स्वातंत्र्य आता नाही. तुझ्यासारख्या स्वातंत्र्यप्रेमी माणसाला हे बंधन स्वीकारावंसं का वाटलं? एक चिंतनशील, संवेदनाक्षम माणूस म्हणून तुला याचा त्रास होतो का? या बंधनाचा जाच वाटतो का? बेकेटचंच एक वाक्य आठवतं आहे. राजा जाणून घेऊ इच्छित होता की बेकेटला काय करायचं आहे; त्याच्या मनात काय आहे. तेव्हा बेकेट राजाला सांगतो, 'मला फक्त तुम्हाला नाही म्हणायचं आहे.' पंचाहत्तरीच्या टप्प्यावर तुला असं वाटतं का, की हे बंधन झुगारून द्यावं आणि नव्यानं जगायला प्रारंभ करावा?

**– अंजली कीर्तने**
भ्रमणध्वनी : ९३२२९३६७८०
anjalikirtane@gmail.com

**ग्रंथाली**


## २५ डिसेंबर - वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके




**टपालकी**
सॅबी परेरा

**नितळ आणि निखळ भाषेतील टपाल**

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**




**नाटक – एक मुक्त चिंतन**
रवीन्द्र दामोदर लाखे

**नाटक संहिताविषयक**

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# लढवय्या पत्रकार–कार्यकर्ता



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**मिहीर महाजन**

बिनरेघांच्या सुट्या पांढऱ्या कागदांचे नोटपॅड. हाती लागेल ते पेन. नाकावर थोडा खालीच ठेवलेला अर्धा चष्मा. खुर्ची किंवा सोफ्याला रेलून हातात पॅड धरून झरझर फिरणारे पेन. मोठे आणि ठाशीव अक्षर. मधेच आलेल्या फोनवर संभाषण, किंवा खोलीतल्या इतरांच्या प्रश्नाला उत्तर. कुठलाही आविर्भाव नसलेली लिखाणाची ही पद्धत! क्वचित थोडीशी खाडाखोड. कुठल्याही संदर्भाशिवाय ऐतिहासिक घटनांचे, पुस्तकांचे, भाषणांचे अचूक उल्लेख. मध्येच कुठला व्यत्यय आल्यास तास-दोन तासांनी पुन्हा लिखाण सुरू. कधी कधी असे लिखाण ट्रेनप्रवासात, गाडीत, किंवा इतर ठिकाणी... मी कुमारकाकाला गेली तीसएक वर्षे असेच पाहिले आहे, चष्मा फक्त नवीन आणि गेल्या काही वर्षांत हाती आलेले कागदाच्या पॅडऐवजी आयपॅड.

*तो विरोधकांच्या अड्ड्यात जाऊन आपले मुद्दे मांडायला घाबरलेला नाही. त्याने अप्रिय सत्ये मांडणे, मग त्यातून कितीही टीका झाली तरी चालेल हे वारंवार केले आहे. त्याच्या घरावर दगडफेक झालेली असो किंवा सभेत अपमान अथवा धमक्या, त्याने त्याला भीक घातलेली नाही. तो त्याच्या जिवाला धोका असतानाही त्याची मते मांडत राहिलाय.*

पत्रकार, संपादक, वक्ता, लेखक, कार्यकर्ता अशा अनेक ओळखी असलेले कुमार केतकर जगासाठी. माझ्यासाठी मात्र तो कुमारकाकाच. अगदी लहानपणापासून नेहमी भेटणारे जे मोजके लोक, त्यातला एक. ऐंशीच्या दशकात 'ग्रंथाली'च्या ऐनभरात पुस्तकांचे गठ्ठे उचलणारा, 'बालझुंबड'सारखी धमाल आयडिया काढणारा, 'ग्रंथमोहोळ'च्या काळात महाराष्ट्रभर फिरून वाचक चळवळ पुढे नेण्यात भाग घेणारा एक कार्यकर्ता. मित्रमंडळींच्या सहवासात, सिगारेटच्या धुरात, आणि सामिष जेवणाऱ्यांच्यात नेहेमी व्हेज खात आपला मुद्दा आवेशाने मांडताना समोरच्यांचेही ऐकून घेणारा माणूस. त्या गटात कधी पत्रकार, कधी वैज्ञानिक, लेखक, चित्रकार, स्त्री-चळवळीतील कार्यकर्त्या, डाव्या विचारांचे लोक, पुस्तकवेडे... असे अनेक. मला लहानपणी असे कधी जाणवलेच नाही की आपण काही मोठ्या लोकांच्या सहवासात आहोत. उलट त्यांच्या सहज मोकळेपणाने असे वाटले की आपण ह्या गटाचा भाग आहोत. म्हणूनच मग बारावीत असतानाच 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी मराठी कम्पुटर आणि इंटरनेटचा एक डेमो पाच-सहाशे माणसांसमोर माझ्या मित्रांनी आणि मी सहज दिला.

त्याच्या घरी गेलो की भिंत असेल तेथे पुस्तकाचे कपाट दिसते आणि इतरत्रही पुस्तके. सकाळची सहा-सात वेगवेगळी वर्तमानपत्रे. वन बी-एच-केच्या छोट्याशा घरात



शारदामावशी आणि तो जवळजवळ पन्नास-पंचावन्न वर्षे तरी राहत आहेत. घरात इतर सामान जेमतेमच. एखादा विषय आवडतो म्हटल्यावर तो चटकन पुस्तक काढून देतो. आणि 'अमुक पुस्तक तू वाचले नाहीस? हे ताबडतोब वाच' अशी सूचनाही. कपाटात पुस्तकांची रचना त्याच्या मनाचा एक आरसा आहे. राजकारण, समाजकारण, इतिहास अशा विषयांबरोबरच तत्त्वज्ञान, विज्ञान, चरित्रे, अशी पुस्तके - इंग्रजी आणि मराठीत. आणि हेरकथा! प्रत्येक पुस्तकामागे एक गोष्ट. बरीचशी पुस्तक मुंबईचे फूटपाथ, परदेशातली जुन्या पुस्तकांची दुकाने, लायब्ररींचे सेल अशा ठिकाणी घेतलेली, आणि काही मोजक्या लेखकांकडून त्यांच्या स्वाक्षरीसह प्रत्यक्ष घेतलेली पुस्तके. त्याच्या अमेरिकेतल्या सहवासात त्याचे पुस्तकवेड किती खोल आहे ते दिसले. ९/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या वेळेस तो शिकागोला विमानतळावर जायला निघाला होता. तेव्हा मिशिगन विद्यापीठात शिकणारे आम्ही- तपन (खोपकर) आणि मी - त्याला निर्मनुष्य रस्त्यांवरून आठ तास प्रवास करून घरी घेऊन आलो. तेव्हा आठवडाभर बातम्या पाहणे आणि चर्चा ह्याबरोबरच आम्ही फॅक्सच्या दुकानात तासन्तास वाट पाहिली - त्याचा लेख वेळेवर पोचावा म्हणून. त्याची आणि शारदामावशीची आमची वर्ष-दोन वर्षांतून एकदा तरी अमेरिकेत भेट होत असे. डॉन ट्रेडरच्या पुस्तकाच्या दुकानात दिवस दिवस घालवून, त्या मालकाशी मैत्री जुळवून मोजक्याच रकमेत त्याने ढीगच्या ढीग पुस्तके घेतली. घरी आल्यावर पहिल्यांदाच लक्षात आले की ती विमानाने नेणे शक्य नाही. शारदामावशी आणि त्याचा ह्या पुस्तकवेडावरून होणारा संवाद भलताच मनोरंजक.

त्याच्या कारकिर्दीकडे पाहिले तर लक्षात येते की त्याचे कुतूहल, जिज्ञासा हा ड्रायविंग फोर्स आहे. म्हणूनच इंग्रजी बिझनेस वर्तमानपत्रांपासून सर्व मोठ्या मराठी वृत्तपत्रांमध्ये तो होता आणि अजूनही ऑनलाईन मीडियात आहे. त्याने विज्ञानापासून अध्यात्मापर्यंत ललित लिखाण आणि महाराष्ट्रातल्या छोट्या गावापासून अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीपर्यंत वार्तांकन असे सर्व काही केले आहे. त्याने लिखाणाच्या स्टाईलवर, दक्षिण मुंबईत राहून संपादकीयातून लोकांना धडे देण्यापेक्षा जगभर फिरून, सर्व प्रकारची माणसे जोडून प्रत्येकाकडून काहीतरी शिकून ते वाचकांपर्यंत पोचवणे त्याने केले. त्याअर्थाने तो नेहमीच वेगळा राहिला आहे. त्याचा मित्रवर्ग प्रचंड मोठा आहे, कारण भेटणाऱ्या प्रत्येकाशी माणूस म्हणून नाते जोडणे, त्यांचे गुण हेरणे, हे त्याला सहज जमलेय. म्हणूनच 'तहरीर स्क्वेअर'ची मराठीत आंखोदेखी फक्त त्याच्याच कडे येते. इतर भाषांतील अनेक गाजलेले लेख किंवा पुस्तके मराठीत आणणे हे त्याला जमते. नेहमी न लिहिणाऱ्या एक्स्पर्टना लिहिण्यास उद्युक्त करणे, नवीन पत्रकारांना मोठ्या जबाबदाऱ्या देऊन त्या निभावण्यास मदत करणे हे सर्व तो करू शकला आहे.


'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये आल्यावर त्याने मराठीत पहिल्यांदाच रंगीत पान छापायला सुरुवात केली. त्याबरोबरच छायाचित्रे वाढवली. ब्रोमाइडवर होणारा पेपरचा लेआऊट त्याच्याच काळात कम्प्युटरवर आला. अशा गोष्टींबरोबरच मराठी पेपरला वैश्विक दृष्टिकोन देण्याचे काम त्याच्याच काळात झाले. त्याबरोबरच त्याने

त्याचे अफाट वाचन आणि दांडगा लोकसंपर्क कामात आणला. त्याने ए.सी.त (जो तेव्हा नव्हताच) बसून संपादकीय लिहिण्यापेक्षा मराठी वाचकांसमोर नवनवे विषय मांडणे आणि उदारीकरणानंतर होत असलेल्या बदलांची उकल करणे त्यासाठी नवनवे लेखक शोधणे असे जाणीवपूर्वक केले.

अशा वेळी तो अधिकाधिक प्रसिद्धीच्या झोतात येऊ लागला. मला आठवतो तो मात्र ९४ साली त्याच्याबरोबर केलेला सहज लोकलप्रवास. मुंबई सी.एस.टी.हून सुटणारी, मानाच्या डेक्कन क्वीनआधी सुटणारी लोकल फक्त दादरला थांबून ठाण्याला एक नंबरच्या प्लॅटफॉर्मवर येते हे त्यानेच सांगितले! टी.व्ही. सर्वत्र पसरण्याआधीच्या दशकांत तो लोकलमध्ये लोकांना ओळखू येत नसावा. आणि कुणी ओळखलेच तर त्यांच्याशी सहज गप्पा जुळवायचा. आजही रस्त्याने चालताना, मुंबई–ठाण्याच्याच नाही तर बंगलोरलाही त्याला ओळखून लोक त्याच्याशी बोलायला येतात तेव्हा त्याचा तोच सहज स्वभाव जाणवतो.

कुमारकाकाला अनेक जण कम्युनिस्ट मानतात. अनेक कम्युनिस्टांच्या मते, तो भांडवलशाहीच्या बाजूने झुकलाय (किंवा अगदी अमेरिकन बाजूने आहे). तो हिंदुत्वाच्या पूर्ण विरोधात असला तरी शिवसेनेबद्दल त्याला सॉफ्ट कॉर्नर आहे (सध्या नव्हे, तर शिवसेनेच्या स्थापनेपासून) असेही अनेकांना वाटते. अनेकांनी त्याला काँग्रेसचा (किंवा अगदी सोनिया/राहुल) चमचा असेही म्हटलेय, खासदारकीसाठी केतकरांनी असे काँग्रेसमध्ये जायला नको होते असे म्हणणारे त्यातल्या त्यात मवाळ. त्याला असे (किंवा अजून खालच्या दर्जाची टीका अथवा आरोप करणारे) अनेक लोक आहेत हे माहीत आहे, किंबहुना त्यातले काही त्याच्या मित्रवर्गातलेच आहेत.

माझ्या मते ह्यातले बहुतांश गट थोडे बरोबर आणि बरेचसे चुकलेत, आणि काँग्रेसचा चमचा हा आरोप बिनबुडाचा आहे. मुळात माणसांची मित्र आणि शत्रू अशी वर्गवारी करणे हेच कुमारकाकाला मान्य नाही. वेगवेगळया विचारसरणी समजून घेऊन त्यातले पटेल ते घ्यावे, बाकीला विरोध करावा असा एक उदार, मॉडर्न दृष्टिकोन त्याचा असावा, त्या बाबतीत तो पाहिल्यापासूनच त्याच्या समवयस्क लोकांपासून वेगळा आहे. मार्क्सवादातली वर्गचिकित्सा आणि मांडणी त्याला पटत असावी बहुधा – पण हुकूमशाही धर्तीचा कम्युनिझम त्याला पटलेला नाही. किंबहुना सोव्हिएत रशियाला जाऊन आल्यानंतर मुंबईच्या किंवा भारतातल्याच डाव्या मंडळींसमोर सोव्हिएत प्रयोगाचे अपयश स्पष्ट मांडून त्यांची नाराजी पत्करणे त्याला जास्त पटले – झापडबंद होऊन बसलेल्यांसमोर आंखो देखा हाल मांडणे, मग ते जवळचे असोत किंवा वाचक, कुमारकाकाचा पिंड वार्ताहराचा आहे.

> ‘नेहरूंना न्यायाची संकल्पना,
> विकासाची प्रक्रिया, धर्माबद्दचा
> आदर, तत्त्वज्ञानाबद्दलची बौद्धिक
> निष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टी यांत
> परस्परविरोध
> आहे, असे कधी वाटले नाही.
> म्हणूनच ते कवीही होते
> आणि आधुनिक भारताचे
> विज्ञाननिष्ठ शिल्पकारही.
> त्याचप्रमाणे उदात्त भारतीय
> परंपरेचे अभिमानी आणि
> पाश्चिमात्य संस्कृतीवर
> प्रेम करणारे रसिक व बुद्धिवादी.’
> (मनोगत – ‘विश्वामित्राचे जग’)
>
> 

मुळात पाहिले तर कुमारकाकाला सर्वसामान्य माणसांबद्दल प्रेम आणि त्यांच्या भल्याची काळजी आहे. म्हणूनच अमेरिकन आणि युद्धखोर भांडवलशाहीचा, साम्राज्यवादाचा कट्टर विरोधक असूनही सर्वसामान्य अमेरिकन माणसाला समाजात दैनंदिन आयुष्यात जी बरोबरीची वागणूक मिळते ती त्याला भावते. त्याबरोबरच तो मोठे अमेरिकन विचारवंत, प्राध्यापक आणि अर्थातच पत्रकार ह्यांच्या सखोल अभ्यास आणि संशोधक वृत्तीचा चाहता आहे. न्यू यॉर्कर, न्यू यॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स, ग्रांटा अशा नियतकालिकांचा दर्जा, पाश्चात्त्य विद्यापीठांत होणारे संशोधनकाम, सखोल सामाजिक/राजकीय चर्चा ह्या त्याच्या आवडत्या गोष्टी. त्यामुळेच अशा गोष्टी जेथे घडतात त्या समाजव्यवस्थेकडे शोषक भांडवलशाही अशा संकुचित दृष्टीने बघणे त्याला जमत नाही. अर्थातच, ह्याची मुळे वसाहतवाद, गुलामांचा व्यापार, निसर्गाची भरून न निघणारी हानी आणि इतर देशांत ढवळाढवळ ह्यांतही आहेत ह्याकडे तो दुर्लक्ष करून शकत नाही. डेव्हिड रेम्निकचा चाहता कुमारकाका अमेरिकन सरकारवर सडकून टीकाही करतो – ह्यात समाजव्यवस्था गुंतागुंतीच्या असतात आणि एकाच सिद्धांतात बांधता येत नाहीत हा विचार असावा.

त्याच्या सर्व कामांत समाजाच्या भल्यासाठी एक धडपड आहे. त्याने वृत्तपत्रांतून जागल्याची भूमिका तर निभावली आहेच, शिवाय विशेषतः गेल्या दोन–तीन दशकांत वक्ता म्हणून तो मिळेल त्या व्यासपीठावर गेला आहे तो विरोधकांच्या अड्ड्यात जाऊन आपले मुद्दे मांडायला घाबरलेला नाही. त्याने अप्रिय सत्ये मांडणे, मग त्यातून कितीही टीका झाली तरी चालेल, हे वारंवार केले आहे. त्याच्या घरावर दगडफेक झालेली असो किंवा सभेत अपमान अथवा धमक्या, त्याने त्याला भीक घातलेली नाही. तो त्याच्या जिवाला धोका असतानाही त्याचे मते मांडत राहिलाय.

धर्माधारित राजकारण करणाऱ्या, उद्दाम वर्तणुकीच्या, भारतातील सर्वसमावेशक संसदीय लोकशाहीची मुळेच

उखडू पाहणाऱ्या शक्ती गेल्या धर्माधारित वर्षांत पुढे येताहेत. राजरोस गुन्हे करून त्यातून राजकीय फायदा मिळवणाऱ्या ह्या प्रवृत्तींना साथ आहे देशांतर्गत आणि बाहेरच्या मुजोर भांडवलशहांची. स्वातंत्र्यानंतर एकता, समता आणि बंधुता ह्यांच्या पायावर उभारलेली, दलित-स्त्रिया-उपेक्षितांना बरोबरीचे स्थान देणारी राज्यघटना उलटून टाकण्याचे मनसुबे स्पष्ट दिसून येत आहेत. तिच्या जागी धर्म-जात-वर्ण-वंश-लिंग असे अनेक फरक मूलभूत मानणारी आणि गतकाळातल्या विषमतेला पुन्हा जवळ करणारी समाजव्यवस्था लादणे हा विघातक हेतू स्पष्ट दिसत आहे.

उदारमतवादी विचारांच्या लोकांसाठी ही वेळ कुंपणावर बसण्याची नाही, तर आपले लढवय्येपण सिद्ध करण्याची आहे. नुसत्या लिखाणाने हा होऊ घातलेला बदल रोखता येणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष चळवळीत, राजकारणात उतरण्याची गरज आहे. वयाच्या पंचाहत्तरीत प्रवेश करताना विशीच्या तरुणाचा उत्साह आणि आशावाद असलेला कुमारकाका असा लढवय्या आहे. राज्यसभेत जाण्याचा कुमारकाकाचा निर्णय हा चमचेगिरी किंवा त्याचा स्वार्थ नसून, त्याच्या ह्या जाणिवेचा निदर्शक आहे. काँग्रेस किंवा इतर मध्यममार्गीय अथवा डाव्या पक्षांच्या हरण्याच्या काळात बुडती बोट सोडणारे आणि जिंकणाऱ्या पक्षाच्या कृपेने सत्ता गाजवू पाहणारे अनेक आहेत. अशा वेळी संसदेत आणि संसदीय समित्यांमध्ये स्पष्टवक्त्या, निर्भीड आणि अभ्यासू आवाजाची गरज कुमारकाका भागवतोय. तरुण सामाजिक कार्यकर्त्यांना, विचारवंतांना आणि पत्रकारांना एक अनुभवी आणि पक्का आधार मिळतोय.

**– मिहीर महाजन**
भ्रमणध्वनी : ९६८६७००१२७
mihir.mahajan@gmail.com

ग्रंथाली

## २५ डिसेंबर - वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके





**आस**

अपर्णा महाजन

**कथासंग्रह**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




**स्वरमंजूषा**

योजना शिवानंद

**संगीताचा खजिना**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# प्रामाणिकपणा आणि निर्विवाद तळमळ!






**डॉ. अनिल काकोडकर**

'आमची फार पूर्वीपासूनची ओळख आहे. ठाण्यामध्ये सुरुवातीच्या काळात आमच्याकडे श्री. दिलीप महाजन म्हणून इंजिनीयर होते. त्यांच्या पत्नी सुलक्षणा महाजन. त्या आर्किटेक्ट आहेत. ती दोघंही तेव्हा बीएआरसीमध्ये काम करीत होते. (आज दिलीप महाजन हयात नाहीत.) माझा संबंध त्या महाजन दाम्पत्यामुळे कुमार केतकर व ग्रंथाली यांच्याशी आला.

कुमार केतकर 'ग्रंथाली'च्या संस्थापकांपैकी एक आहेत. पण त्यांची स्वत:ची एक संपादक, पत्रकार, लेखक, विचारवंत अशी फार व्यापक प्रतिमा समाजात आहे. त्या वेळेला दिलीप महाजनांमुळे त्यांच्याशी भेट झाली आणि नंतर वेगवेगळ्या कारणांनी आमच्या भेटी होत राहिल्या. मला नेहमीच त्यांच्या कार्यपद्धतीविषयी कौतुक वाटलेलं आहे. आम्ही दोघं निरनिराळ्या क्षेत्रातले असलो तरीही एकमेकांशी आमचं हृदयस्पर्शी नातं राहिलेलं आहे.

केतकर यांची स्वत:ची अशी सामाजिक-राजकीय क्षेत्रामध्ये ठाम मतं आहेत. परंतु आपण त्यांना 'रिजिड' म्हणजे कोणत्याही विषयावर दुसऱ्यांची मतं ऐकून न घेणारा, स्वत:च्या विचारांमधे, मतांमधे तडजोड न करणारा, असं अजिबात म्हणू शकत नाही. त्यांचं संपादकीय, त्यांचे सामाजिक किंवा ऐतिहासिक लेख जर वाचले तर आपल्या लक्षात येतं, की त्यांची जी मतं आहेत ती हेकेखोरपणानं निर्माण झालेली नाहीत तर सखोल अभ्यास, उत्तम निरीक्षणक्षमता व प्रसंगानुसार, काळानुसार स्वत:ला विकसित करण्याचा (Evolve होण्याचा) जो त्यांचा स्वभाव आहे त्यामुळे तयार झालेली आहेत. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाविषयी माझं असं निरीक्षण आहे, की एक संपादक म्हणून, पत्रकार म्हणून, समाजकारणातील एक नेतृत्व म्हणून ते स्वत:शी, स्वत:च्या विचारांशी फार प्रामाणिक आहेत. He has been quite true to himself.

*त्यांच्या संपादक व पत्रकार म्हणून असलेल्या ताकदीचा उपयोग लोकांचे प्रश्न सोडवण्याकरता प्रामाणिकपणे केला असं मला वाटतं.*

जुन्या काळातील घटना आणि आताच्या काळात घडणाऱ्या घटना यांचा अन्वयार्थ कसा असू शकतो, त्याचा परिणाम काय होऊ शकतो यावर त्यांनी बरंच भाष्य केलेलं आहे. आणि नेहमीच ते आपले विचार प्रदर्शित करीत असतात. ते केवळ भावनेच्या आहारी जाऊन बोलत नाहीत. सखोल अभ्यासातून निर्माण झालेली त्यांची स्वत:ची ठाम मतं आहेत. त्यांची जी मतं आहेत ती सगळ्यांनाच पटतील असं नाही. पण त्यामधे विचारांची सुस्पष्टता आहे. ही गोष्ट मला फार भावते. वैचारिक गोंधळ त्यांच्या मतप्रदर्शनात नाही.

आम्ही वेगवेगळ्या फ्लॅटफॉर्मवर एकत्र बऱ्याच वेळेला आलेले आहोत. जैतापूरच्या न्युक्लिअर एनर्जी प्रकल्पाच्या वेळी जी आंदोलने झाली तेव्हा आमचं बरंच बोलणं व्हायचं. एक पत्रकार म्हणून तेथील नेमकी परिस्थिती काय आहे, न्युक्लिअर पॉवरचं महत्त्व काय आहे, तिथल्या रहिवाशांचे प्रश्न काय आहेत, अशा अनेक प्रश्नांवर तेव्हा आम्ही चर्चा केलेली आहे. कोणत्याही चर्चेमध्ये मनमोकळेपणा असेल, समोरच्याचं मत ऐकून घेण्याची तयारी असेल तर त्यामधून एक वेगळा दृष्टिकोन आपल्यासमोर येत असतो. त्या वेळेला आमची जी काही मतं होती, ती त्यांनी नेहमी शांतपणे ऐकून घेतली. पण त्याच वेळेला, लोकांच्या मनात जी काही भीती असते, त्यांच्या भागात काही बदल येणार म्हटल्यावर त्यांच्या जीवनमानात त्यामुळे फरक पडणार असतो व तो स्वीकारण्याची त्यांची कितपत मानसिकता असते, पुन्हा एखाद्या गोष्टीकडे बघण्याचा प्रत्येक मनुष्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो आणि एक पत्रकार म्हणून हे सर्व समजून घेणं त्यांना नेहमीच आवश्यक वाटलं. जनतेच्या प्रश्नाबाबतचा कुठलाही मुद्दा असला तर त्याबद्दल पूर्ण अभ्यास करून ते त्यांचं मत मांडायचे. त्यांनी त्यांच्या संपादक व पत्रकार म्हणून असलेल्या ताकदीचा उपयोग लोकांचे प्रश्न सोडवण्याकरता प्रामाणिकपणे केला असं मला वाटतं.



डॉ. अनिल काकोडकर

कोकणच्या औद्योगिक विकासासंदर्भातदेखील तेव्हा द.म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली अनेक लोक एकत्र आले होते. तेव्हा त्या बाबतीत केतकरांशी माझी अनेक वेळेला चर्चा झालेली आहे.

ते विचारवंत आहेत. त्या बरोबरीनं त्यांच्यामधे वैचारिक संतुलन आहे. आपल्यासमोर आलेल्या प्रश्नांमधील मर्म जाणण्याची प्रगल्भता आहे. आजच्या पिढीतील पत्रकारांनी किंवा तरुणांनी हे समजून घेणं आवश्यक आहे, की केवळ निरनिराळ्या विषयांवरची माहिती गोळा करून त्या विषयावर लिहीता येत नाही. त्यासाठी त्या विषयाचा सखोल अभ्यास करावा लागतो. त्यावर चिंतन करावं लागतं. काळाप्रमाणे स्वत:ला विकासित करावं लागतं. तेदेखील स्वत:च्या मूळ तत्त्वांना धक्का न लावता.

केतकर यांची जी मतं आहेत त्यातील मथितार्थ सगळ्यांनाच पटेल असं नव्हे. पण, ते त्यांच्या मतांशी प्रामाणिक आहेत हे निर्विवाद आहे. He is a hardcore rationalist. ते तर्कसंगत विचार करतात. एखादं तत्त्वज्ञान केवळ वर्षानुवर्षं चालत आलेलं आहे म्हणून ते त्याचा स्वीकार करणार नाहीत. प्रत्येक घटनेमागे, गोष्टीमागे त्यांचा तर्कसंगत विचार आहे. आणि एकदा का त्यांना एखादी गोष्ट पटली, की ते निर्भीडपणे बोलायला कमी पडणार नाहीत. त्यासाठी समाजाचा विरोधदेखील ते सहन करतील.

अध्यात्मापासून राजकीय घडामोडी,सामाजिक प्रश्न, इतिहास, राजकीय प्रश्न, रुढी-परंपरा अशा विषयांवर वेळोवेळी त्यांनी त्यांची अभ्यासपूर्ण मतं प्रकट केली आहेत. ती सर्वच मतं सर्वांना पटतील असं नव्हे, पण त्यांच्या व्यक्त करण्यामधील प्रामाणिकपणा, तळमळ निर्विवाद आहे.

मी त्यांनी संपादक म्हणून लिहिलेलं बरंच लिखाण वाचलेलं आहे. त्यांना जे पटलं ते नेहमी त्यांनी निर्भीडपणे मांडलेलं आहे. मला एक व्यक्ती म्हणून त्यांच्याविषयी स्नेह आणि आदर वाटतो, स्वत:ला विकसित करण्याचा त्यांचा सततचा प्रयत्न आणि त्यांचा स्वत:च्या तत्त्वांशी व विचारांशी असलेला प्रामाणिकपणा, यामुळे.

**शब्दांकन : शिल्पा खेर**

‘कला आनंद देतानाच वेदनाही देते. वास्तव दाखवितानाच ती अंतर्मुख करते. आशय मांडतानाच आकृतिबंधात प्रयोग करते. उदास करते आणि प्रेरणाही देते. परिसराचे भान देतानाच आपल्या मनाच्या आत असलेल्या विशाल परिसराची जाणीव करून देते. (लोकसत्ता, १० डिसेंबर २००५ ‘बदलते विश्व’, पृ. २९२)

आस्वादातून...मिळणारा सौंदर्यानुभव सर्व प्राणिमात्राला घेता येत असला, तरी माणसाने त्या अनुभवातूनच एक पर्यायी सांस्कृतिक विश्व उभे केले आहे. ते कलाविश्व हे मानवी समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.
(लोकसत्ता, १७ डिसेंबर २००५ – ‘बदलते विश्व’ पृ. २९६,२९७)

तत्त्वज्ञान आणि विज्ञान वगळून जर तंत्रज्ञान स्वीकारले, तर यांत्रिक प्रगती होईल, सुविधाही निर्माण होतील, पण माणसाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे शोध आणि सर्जनशीलता, ते मात्र लोप पावेल.’
(लोकसत्ता, १९ नोव्हेंबर २००५– ‘बदलते विश्व’ पृ.३०२)



# कुमार केतकर आणि मी

**शब्दांकन : राधिका कुंटे**



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

## विचारमंथन, कलाप्रेमी, भाषाप्रभू
## **सुधीर पटवर्धन**

कुमारना कायम सगळ्याच विषयांत इंटरेस्ट वाटतो आणि त्याचा फॉलोअप घेणे हे फार इन्सपायरिंग वाटते. विज्ञान, तत्त्वज्ञान, गणित, आर्किटेक्चर, तंत्रज्ञान असा कोणताही विषय असला तरी या प्रत्येक विषयातले त्याचे खास मित्र आहेत. ग्रूप आहेत. विज्ञान म्हटले तर हेमचंद्र प्रधान, सी. डी. देशमुख, गणित म्हटले तर दाणी असे विविध विषयांमध्ये मित्र होते, आहेत. तसाच कलेमध्येही त्यांना तितकाच रस आहे. आमची ओळख जवळपास १९७५ पासून आहे. ते माझ्या पहिल्या चित्रप्रदर्शनापासून जवळपास प्रत्येक प्रदर्शनाला येतात. प्रदर्शन पाहिल्यावर भेटणे आणि चर्चा करणे या ठरलेल्या गोष्टी. ते त्यांच्याकरता फार महत्त्वाचे असायचे. एखादे नवीन पुस्तक आले, ते त्याबद्दल वाचले, नवीन चित्रपट आला तर त्याविषयी सगळ्यांना वाचायला-बघायला सांगणे आणि मग सगळ्यांनी भेटणे, त्यावर सगळ्यांनी चर्चा करणे हे व्हायचेच. आम्ही ठाण्यात असल्यामुळे या भेटी-चर्चा खूप वेळा व्हायच्या. वेगवेगळ्या लोकांकडून त्यांचे विचार समजून घेणे, त्यांना थोडे इन्स्टिगेट करणे हे सगळे ते फार सफाईने करायचे. या ग्रूपमध्ये सुलक्षणा महाजन, वीरेंद्र सुळे वगैरे सात-आठजण होते. प्रा. सी.डी. देशमुख पूर्वी असायचा. हेमू प्रधान कधी कधी यायचे. यातला कुणी एक कुठेतरी जाऊन आला तर उदाहरणार्थ- महाजन दाम्पत्य जाऊन आले होते माचू-पिचूला- ते जाऊन आल्यावर त्यांच्या फिरस्तीविषयीची गप्पांची मैफल आमच्या घरी रंगली होती. एकेक स्लाइड दाखवून त्यावर ते बोलले होते. त्या त्या सहलीचा तपशील, इतिहास यावर चर्चा होई. हे सगळे कुमार घडवून आणायचे. कुमार युज्ड टु बी अ काइंड ऑफ फोकस्ड. त्या चर्चेनंतर जेवणखाण वगैरे असायचेच. फार छान होते ते दिवस. आता ते दिल्लीला गेल्यापासून आम्ही हे सगळे मिस करत आहोत. तितके भेटणे आता होत नाही.

साधारण १९८० वगैरेच्या सुमाराची गोष्ट असेल अंदाजे. 'ग्रंथाली' दीनानाथ मनोहरांचे पुस्तक काढत होती- 'रोबो'; त्यांनी मला कव्हर करायला सांगितले. मग आमच्या भेटीगाठी झाल्या. मग त्यांनी म्हटले की 'तू मॉडर्न आर्टवर आम्हांला एक लेक्चर दे.' मग



**कुमार केतकर आणि सुधीर पटवर्धन**

एक २०-२५ लोक घरी जमली आणि मी मॉडर्न आर्टवर लेक्चर दिले. तेव्हा गांगलही होते. कुमार असायचा. अरुण साधू यायचे. हे सगळे लोक यायची आणि बाकीचे बरीचसे लोक होती. ते त्यांना खूप आवडले. ते माझ्या जवळजवळ दोन वर्षं मागे लागले होते की ‘ग्रंथाली’साठी पुस्तक लिही. पण ते शेवटी माझ्याकडून काही झाले नाही. मी काही लेखक नाही, प्रयत्न करूनही माझ्याकडून ते झाले नाही. पण त्याकरता त्यांनी खूप प्रयत्न केले. परत परत मला भेटले. ‘तू असे कर, तू रेकॉर्ड कर, आम्ही लिहून काढू’ वगैरे सांगून पाहिले. माझीही खूप इच्छा होती असे काहीतरी लिहावे म्हणून. पण ते राहून गेले. म्हणजे कोणतीही गोष्ट एकदा करायची म्हटली की ते एवढा फोकस करायचे.

आणखी एक मजेशीर आठवण. माझी आई असायची घरी. बऱ्याच वेळेला कोण कोण वेगवेगळे लोक यायचे. ती आपली आत असायची. मी आणि शांता बाहेर गप्पा मारायचो. एकदा कुमार आणि साधू आले होते. कुमार बोलत होते. आई कधी बाहेर यायची नाही. त्या दिवशी ती बाहेर आली. तिने डोकावून बघितले. म्हणाली, ‘इतके सुंदर मराठी कोण बोलत आहे, म्हणून बघायला आले.’ त्यावर कुमार नुसते हसले. खरे तर, त्यांचे एकेक व्याख्यान तेही कोणत्याही विषयावरचे व्याख्यान ऐकणे म्हणजे पर्वणी. इतके त्यांचे भाषेवर प्रभुत्व आहे. राजकारणाचा तर प्रश्नच नाही. पण कोणताही विषय असो, उदाहरणार्थ- ठाण्यात एका रुग्णालयाच्या उद्घाटनाला गेलो होतो, तिथे त्यांनी मेडिकल विषयावर केलेले भाषणही इतके सुंदर होते! कुमारबद्दल बोलाल तितके कमी आहे. मध्यंतरी एनजीएमएला माझ्या चित्रांचे प्रदर्शन झाले. त्या सुमारास ते खूप बिझी होते. दिल्लीत होते. पण दोन दिवस ते मुंबईत आले होते, तेव्हा वेळात वेळ काढून प्रदर्शनाला आले आणि जवळजवळ दोन तास प्रदर्शन पाहिले. त्याची दोन्ही अंग आहेत- आधी नीट बघणे, स्वतःहून बघणे, स्वतःसाठी ते आत्मसात करून घेणे आणि मग त्याच्यावर काही चर्चा असली तर ती करणे. त्या वेळी चर्चेला वेळ मिळाला नाही, तरी नंतर सविस्तर मेसेज मात्र अगदी आठवणीने केला.

*(प्रख्यात चित्रकार)*

## सौहार्द आणि ठामपणा
## **संदीप वासलेकर**



कुमार केतकर हे एक व्यासंगी पत्रकार, विचारवंत, लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला एक पैलू महाराष्ट्रातल्या किंवा भारतातल्या समाजाला जास्त माहिती नाही. तो म्हणजे त्यांना आंतरराष्ट्रीय शांतता आणि खास करून भारतीय उपखंडामध्ये शांतता आणि सौहार्द राहावे, याविषयी खूप तळमळ आहे. या विषयाच्या संदर्भात आम्हा दोघांच्या अनेकदा चर्चा झाल्या आहेत. त्या संदर्भातल्या एक-दोन आठवणी सांगतो.

एकदा आमच्या Strategic Foresight Group या संस्थेचा अहवाल आला होता. भारत-पाकिस्तान संघर्षाचे परिणाम काय होतील यासंबंधीचा तो विस्तृत वृत्तांतच होता. कुमार केतकर त्या वेळी ‘लोकसत्ता’चे संपादक होते. त्यांनी विषयात रस असल्यामुळे तो अहवाल वाचला. त्या अहवालाची बातमी दुसऱ्या दिवशी ताबडतोब ‘युद्धखोरांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन’ असे शीर्षक देऊन पहिल्या पानावर छापली. त्यानंतर कित्येक दिवस नाही तर महिने, वर्ष त्या विषयावर चर्चा घडत होती की या संघर्षामुळे सर्वसामान्य माणसांचे जे नुकसान होत आहे, त्यासंबंधी काय करता येईल, कसे करता येईल वगैरे. म्हणजे ते नुसते विचार व चर्चा करून थांबले नाहीत तर दक्षिण आशियाई संपादकांचा एक मंच निर्माण करण्यात आला होता, त्यामध्ये भारत, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, मालदीव अशा देशांतील इंग्रजी सोडून स्थानिक भाषांमधले जे संपादक आहेत, त्यांनी प्रथमच एकत्र येऊन एक मंच तयार केला होता, त्या कामात कुमार केतकर यांनी खूप हिरिरीने भाग घेतला होता. त्यांनी पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंकेत त्या मंचाच्या कामासाठी प्रवास केला. दक्षिण आशिया संपादक मंचासाठी खूप मेहनत घेतली आणि त्या मंचाला चांगले यश मिळाले होते. त्यांनी मंचाच्या कामानिमित्ताने केलेल्या प्रवासात अनेक माणसे जोडली. त्यांची खूप चांगली मैत्री पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश इथल्या संपादकांसोबत झाली होती. त्याचा खूप फायदा झाला. काही वेळा काही गैरसमज झालेले असतात, ते दूर झाले. त्यातल्या काही देशांशी वैर असले तरी ते त्या व्यक्तिगत पातळीवरच्या मैत्रीत आड आले नाही.

त्यानंतर २००८ मध्ये एक गमतीशीर प्रसंग घडला. आम्ही जागतिक शांतता आणि भविष्यासाठी आपले उत्तरदायित्व काय असावे, यावर विचारमंथन करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. त्या वेळी प्रतिभाताई पाटील भारताच्या राष्ट्रपती होत्या. त्या या परिषदेला येणार होत्या. कारण जवळपास पंचवीस देशांतून अडीचशे प्रतिनिधी येणार होते. मी, कुमार आणि आणखी एक सहकारी असे तिघेजण प्रतिभाताईंना भेटायला राष्ट्रपती भवनात गेलो. आम्ही संध्याकाळपर्यंत खूप चर्चा केली. प्रतिभाताई खूप खुश होत्या. त्या यायचे नक्की झाले होते. त्यानंतर आम्ही तिघे दिल्लीतील एका हॉटेलमध्ये गेलो. तिथे आम्ही रिलॅक्स मूडमध्ये बोलत होतो- 'चांगले झाले, राष्ट्रपती येणार,' वगैरे. जेवायला बसलो होतो, तेवढ्यात राष्ट्रपतीभवनातून फोन आला. त्यांनी सांगितले, की ''राष्ट्रपतींनी सांगितले की आज खूप चांगली चर्चा झाली. तुम्हाला उद्या न्याहारीला बोलावले आहे.'' पण दुसऱ्या दिवशी कुमार यांनी एका मित्रासोबत न्याहारीला जायचे आधीच ठरवले होते. त्यांनी राष्ट्रपतीभवनात सरळ सांगितले, की ''माझा उद्याच्या न्याहारीचा बेत दुसऱ्याबरोबर आधीच ठरलेला आहे. तो मी बदलणार नाही. त्यांना सांगा, आम्ही परवा येतो.'' त्याप्रमाणे ते दुसऱ्या दिवशी मित्रासोबत गेले आणि तिसऱ्या दिवशी राष्ट्रपतीभवनात आम्ही न्याहारी घेतली. तेव्हाही आमची राष्ट्रपतींसोबत चांगली चर्चा झाली. मित्राला दिलेली वेळ राष्ट्रपतींचे आमंत्रण आले म्हणून त्यांनी बदलली नाही. त्यांनी राष्ट्रपतींना विनंती करून दुसरी वेळ घेतली.

बाकी दिल्लीच्या दौऱ्यात आमचे वेगवेगळे कार्यक्रम होते. येताना विमानाने आम्ही एकत्र आलो एवढेच. त्याखेरीज आम्ही एकत्र खूपच प्रवास केलेला आहे. पण तो दौरा माझ्या कायम लक्षात राहिला आहे.

*(स्ट्रॅटॅजिक फोरसाईट ग्रुपचे प्रमुख)*

## बुद्धिमान आणि विचारवंत माणूस
## गणेश देवी



**गणेश देवी यांच्यासोबतचा एक दिलखुलास क्षण**

मी केतकर यांना पहिल्यांदा भेटलो त्याला जवळजवळ अकरा-बारा वर्षे झाली असतील. तेव्हा मी त्यांना तेजगढला आदिवासी अकादमी पाहण्यासाठी बोलावले होते. कुमार आणि शारदाताई आले होते. एवढा मोठा संपादक माणूस, शहरात राहिलेले, त्यामुळे त्यांना भेटायच्या आधी मला वाटले होते, की त्यांना आदिवासींच्या गावात, त्यांच्या जीवनात डोकावण्यात फारसा रस असणार नाही. पण त्यांनी अत्यंत बारकाईने सगळ्या गोष्टींचे निरीक्षण केले. सगळ्या गोष्टी आस्थेने बघितल्या. ते प्रचंड उत्साहाने प्रतिसाद देत होते. सूचना करत होते. मला नवल वाटले, की माणूस एखाद्या नव्या गोष्टीमध्ये इतक्या खोलवर इन्व्हॉल्व्ह होऊ शकतो आणि इतक्या चांगल्या त्याच्या इनसाईटस् शेअर करू शकतो. मी केतकर यांच्या एखाद्या कामात झोकून देण्याच्या या गुणामुळे प्रभावित झालो.

दुसरी गोष्ट म्हणजे ज्यांना काहीतरी नवीन करायचे आहे, वेगळे करायचे आहे, तशी कल्पना घेऊन आपण गेलो तर ते मदत फार करतात. मला 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र' हा महाराष्ट्रातील भाषांसंदर्भातला ग्रंथ राजभवनात प्रकाशित करायचा होता. मी केतकर यांना फोन केला या संदर्भात. ते दादरला येऊन थांबले. मला राज्यपालांकडे घेऊन गेले. आमची भेट घडवली. त्यांचा होकार मिळवला. राज्यपालांना विनंती करून तेथे पुरातत्त्वशास्त्राचे महत्त्व लक्षात घेऊन कोणत्या जागी प्रकाशन समारंभ करावा ते ठरवले. खरे तर, त्या वेळी माझी आणि त्यांची तितकी ओळख नव्हती. पण त्यांना एका वेगळ्या प्रकारे काही गोष्ट घडते आहे याचे महत्त्व होते. ही इज लव्हर ऑफ आयडियाज. माणसाची निष्ठा, कमिटमेंट, बांधिलकी यांपेक्षा अमूर्त कल्पना- अब्स्ट्रॅक्ट आयडियाज यांच्याकडे त्यांचा ओढा फार आहे.

त्यांची तिसरी गोष्ट मला आवडली, ती म्हणजे स्पष्टवक्तेपणा. ते विरोधी मत उत्कृष्ट रीत्या मांडू शकतात. 'दक्षिणायन'च्या चळवळीमध्ये बऱ्याच वेळा लेखक, विचारवंत एकत्र येतात. मी त्याचे नेतृत्व करत होतो, म्हणून मीही जायचो. धारवाड, पुणे अशा अनेक ठिकाणी एकत्र येण्यामध्ये कुमार असायचेच. त्या वेळेस चर्चा व्हायची. त्यापैकी विशेष लक्षात राहिली आहे ती एक चर्चा. कलबुर्गी यांच्या खुनाला एक वर्ष झाले तेव्हा जवळपास दहा हजार विद्यार्थ्यांचा एक मेळावा आयोजित केला होता. त्यानंतर भयंकर पाऊस येऊनही मोठी सभा झाली. लोक तीन-चार तास बसून राहिले होते. अनेक महत्त्वाचे लेखक त्या वेळी आले होते. त्या रात्री जेवणानंतर ते राहत होते तेथे मी गेलो आणि म्हणालो की 'आज दिवसभरात जे झाले त्याचे आपण थोडे ॲनालिसिस करूया.' अशा प्रसंगांच्या शेवटी ॲनालिसिस करताना बहुतेक जण प्रशंसा करतात किंवा भोळसट आशावाद दाखवतात. पण कुमारनी त्या दिवशी केलेले ॲनालिसिस हे फार वेगळे होते. मला ते आवडले. इतर सगळे लेखक गेल्यावरसुद्धा आम्ही बराच वेळ बोलत होतो.

त्यांच्या या तीन गोष्टी मला प्रचंड आवडतात. ते एखाद्या

नव्या गोष्टीत रस घेऊन, निरीक्षण करून त्यावर नेमकी प्रतिक्रिया देतात. कुणाला मदत करायची झाली तर कल्पना चांगली असेल तर ते मदतीस धावून जातात. तिसरे म्हणजे कितीही चर्चा सुरू असली तरी ते स्वतःचे जे मत असेल ते इतराच्या मतांचा त्यावर प्रभाव पडू न देता मांडतात. ही इज व्हेरी गुड इंटलेक्च्युअल. ही इज व्हेरी गुड थिंकर. ही इज व्हेरी गुड इंटलेक्च्युअल थिंकर. सगळे इंटलेक्च्युअल थिंकर नसतात. सगळे थिंकर्स इंटलेक्च्युअल नसतात. ही इज एक्सलेंट ह्युमन बिइंग.

*(आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भाषाभ्यासक)*

## सखोल स्पष्ट विचार आणि संघर्षाची तयारी
**रावसाहेब कसबे**



कुमार केतकर यांचे पहिले भाषण मी साधारण १९७७-१९७८ मध्ये ऐकले होते. तो काळ आणीबाणीच्या प्रचंड विरोधी असा काळ होता. जनता सरकारचे राज्य आले होते. पूर्ण देशामध्ये काँग्रेसचे पानिपत झालेले होते. इंदिरा गांधी यांना एक खलनायिका ठरवण्यात आले होते त्या काळामध्ये. त्या सगळ्या प्रचाराच्या लाटेवर आम्ही सगळे हुंदडत होतो. पण कुमार केतकरांचे एक भाषण मी ऐकले आणि ते आणीबाणीचे समर्थन करणारे होते. ते समर्थन करणारे भाषण त्यांनी ज्या पद्धतीने केले - पहिली गोष्ट त्यांनी आणीबाणी लादण्यापूर्वी कोणकोणत्या घटना जगात घडत होत्या, कोणकोणत्या घटना भारतात घडत होत्या याचा सगळा जो आढावा घेतला आणि त्या परिस्थितीमध्ये आणीबाणीशिवाय अन्य कोणतीही गोष्ट शक्य नव्हती घटनात्मदृष्ट्या, हे त्यांनी पटवून दिले आणि ते बऱ्याचशा प्रमाणामध्ये श्रोत्यांना पटायला लागले. तर आणीबाणीसारखा एक अत्यंत संवेदनशील विषय, ज्याच्याबद्दल सर्वसामान्यपणे भावनात्मक गोष्टी बोलल्या जात होत्या; परंतु त्यातील राजकीय वास्तव कुणी सांगत नव्हते. ते राजकीय वास्तव सांगण्याचे धाडस त्या वेळी त्यांनी केले. ते ऐकल्यानंतरच मी कुमार केतकर यांच्या प्रेमात पडलो.

एखादा विषय नीट समजावून द्यायचा असेल तर तो समजावून देताना पार्श्वभूमी म्हणून कोणकोणत्या गोष्टी समजावून द्याव्या लागतात; त्या सगळ्याचा तपशील जर तुमच्याकडे नसेल तर तुम्हाला वास्तवाचे आकलन होत नाही; ही जी त्यांची दृष्टी होती; ती दृष्टी अर्थात मार्क्सवादातून आलेली आहे; ही गोष्ट जरी खरी असली तरी ती सगळ्याच मार्क्सवाद्यांच्या जवळ आहे असेही नाही. ती कुमारजवळ होती आणि त्या भाषणानंतर त्यांचा पहिला प्रभाव माझ्यावर पडला.

माझे लाल निशाण पक्षात जाणे-येणे होते. कारण लाल निशाण पार्टीमध्ये माझा धाकटा भाऊ - तो फुलटायमर होता त्या वेळी, अजूनही आहे तो, मी तिथे जात असे. तिथे दत्ता देशमुख, एस.के. लिमये, भास्करराव जाधव, यशवंत चव्हाण ही सगळी मंडळी असत. पण एस.के. लिमये यांच्याबरोबर कुमार त्या वेळी अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करत असे. एखादा प्रश्न समजावून घ्यायचा असेल तर किती विद्वानांशी चर्चा करावी लागते ही गोष्ट माझ्या लक्षात आली. तेव्हा त्याच्या हातातली पुस्तके वगैरे बघून मी अतिशय अचंबित होत असे. मला वाटत असे, की हा माणूस किती वाचतो आहे, नुसता एकाच विषयाचा नाही तर विविध विषयांचा अभ्यास करतो आहे! हे मला एका अर्थाने त्या वेळी वाटलेले कुतूहल होते.

त्यानंतर आमची एकाच व्यासपीठावर भाषणे सुरू झाली. आमच्यात मैत्री झाली. मैत्री वाढली. जगामध्ये कोणकोणते लेखक महत्त्वाच्या प्रश्नांवर आज लिहीत आहेत हे त्यांच्याकडून कळत गेले. तेव्हापासून कुमार यांचे माझ्या जीवनामध्ये एक अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. ते स्थान यासाठी आहे, की एखाद्या प्रश्नाचा साधकबाधक विचार कसा करावा याचे एक सूत्र त्यांच्याकडून मी शिकलो. मला असे वाटते, ही फार महत्त्वाची गोष्ट होती!

दुसरी गोष्ट म्हणजे ज्या वेळेस भालचंद्र नेमाडे यांनी जातीचे समर्थन करणारे लेख लिहिले, भाषणे केली, मी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर, त्याच्याविरोधी आवाज उठवला. त्यावर एक पुस्तकच लिहिले- 'देशीवाद, समाज आणि साहित्य.' त्यातले काही लेख मी ज्या वेळी लिहिले ते कुमार यांना इतके आवडले की त्यांनी त्या लेखांच्या शेकडो प्रती काढून अनेकांना वाटल्या. खूप लोकांना ते लेख त्यांनी वाचायला लावले. ही सगळी बेगडी प्रसिद्धी नेमाडे यांना मिळाली होती, त्याचा पर्दाफाश झाला.

आठवणी अनेक आहेत, त्यांच्याबद्दल. विशेषतः ब्राह्मणांच्या अधिवेशनामध्ये - ब्राह्मण जातीच्या अधिवेशनामध्ये कुमार यांनी ब्राह्मणांना ज्या पद्धतीने त्यांचे खरे अस्तित्व काय आहे, हे दाखवून दिले. त्यामुळे तेथे जो गदारोळ झाला आणि जो विरोध झाला त्या विरोधाला तोंड देण्याची शक्ती जर एखाद्या विचारवंताकडे नसेल तर तो विचारवंत होऊ शकत नाही. आपल्याला जे वाटते, जे खरे आहे असे वाटते, आपण अनेक विचार करून जेव्हा आपला स्वतःचा विचार व्यक्त करतो त्या विचाराला जर कुणी दाबून टाकत असेल तर त्याच्याविरोधी संघर्ष करण्याचे जे धाडस लागते, ते धाडस लेखकाकडे नसेल तर तो लेखक खऱ्या अर्थाने स्वाभिमानी लेखक असू शकत नाही आणि तो लेखकच असू शकत नाही. कुमारमध्ये

हा अतिशय महत्त्वाचा गुण आहे. त्यांच्यावर हल्लेही झाले. अनेक लोकांनी हल्लेही केले. या सगळ्याचा प्रतिकार कोणतीही माघार न घेता करणे ही साधी गोष्ट नाही. म्हणून कुमार हे एक तशा अर्थाने आमच्या पिढीचा आदर्श आहेत. त्यांची सगळीच मते सगळ्यांनाच पटतील असे नाही. परंतु ज्या धैर्याने ते ती मते मांडतात आणि त्यांचे समर्थन करतात, ज्या तार्किक पद्धतीने करतात; त्यामुळे कुमार यांच्याबद्दल अंतःकरणात एक प्रेमाची भावना निर्माण होते.
*(ख्यातनाम विचारवंत)*

## कार्यकर्ता, विचारवंत आणि निर्भीड पत्रकार
## **दत्तप्रसाद दाभोलकर**




कुमार केतकर यांना मी एक अद्भुत चमत्कार समजतो. माझा चमत्कारावर अजिबात विश्वास नाही. मात्र कोणत्याही कोष्टकात न बसणारी गोष्ट, ज्या असामान्य प्रतिभेची आणि कर्तृत्वाची माणसे आपल्या समोर येतात आणि आपली जिद्द व हिंमत यांच्या जोरावर त्यांनी ते साध्य केलेले असते हे पाहिले की आपल्याला तो चमत्कार वाटतो. मागे दूरदर्शनवर एक मजेशीर आवाजातील एक मजेशीर कार्यक्रम होता – 'क्या ऐसा भी होता हैं' त्याची आपल्याला अशा वेळी आठवण येते.

केतकर शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल. त्यांनी बाहेरचा एक वर्षाचा रेडिओ दुरुस्तीचा अभ्यासक्रम पुरा केला आणि रेडिओ, ट्रान्झिस्टर दुरुस्त करून उदरनिर्वाह केला. त्यानंतर सकाळच्या कॉलेजात प्रवेश घेतला (त्या वेळी मुंबईला सकाळची कॉलेजे होती, अशा विद्यार्थ्यांसाठी) आणि शिक्षण पुरे केले. लग्नाच्या वेळी आपण आजन्म कार्यकर्ता म्हणून काम करणार आहोत, त्यामुळे त्या दोघांनीही आपल्याला मूल न होऊ देण्याचा निर्णय घेतला आणि पुढे कितीही चांगली परिस्थिती आली तरी आपल्या ठाण्याच्या भाड्याच्या छोट्या घरातच राहण्याचा निर्णय घेतला आणि तो त्यांनी आजन्म पाळला. स्वतःचे 'कार्यकर्तेपण' जपत वार्ताहर, उपसंपादक, संपादक हा त्यांचा प्रवास संघर्षमय आणि प्रेरणादायी आहे. त्यांनी संपादक झाल्यावर चर्चगेट भागात ऑफिस असताना, त्याच भागात सुसज्ज सदनिका मिळत असताना ठाण्याच्या आपल्या जुन्या भाड्याच्या छोट्या घरातच राहणे पसंत केले. त्यांनी संपादक झाल्यावर मराठी वृत्तपत्रसृष्टीची देदीप्यमान परंपरा समर्थपणे पुढे नेली. जे इष्ट असेल ते स्पष्टपणे सांगेन, त्याच्या परिणामांची मला काळजी नाही असे त्यांचे मत आणि त्यामुळे लोक ज्या वेळी 'मटा'ला 'सोटा' आणि कुमार केतकरांना 'सुमार केतकर' म्हणत होते त्या वेळीही त्यांनी आपली मते अजिबात बदलली नाहीत. आपल्या मनाला, आपल्या सद्सदविवेकबुद्धीला पटलेल्या विचारांची, परिणामांची फिकीर न करता ते आजन्म प्रामाणिक राहिले. त्यांना पद्मश्री मिळाली, राज्यसभेत खासदारपद मिळाले, मात्र त्यांनी या गोष्टी आयुष्यात कोणत्याही तडजोडी करून मिळवल्या नाहीत. कार्यकर्ता, विचारवंत आणि निर्भीड पत्रकार ही त्यांच्या आयुष्याची त्रिसूत्री आहे. 'कुमार'वयातील अदम्य उत्साह आणि अगम्य स्वप्ने पाहणे, हा कुमार केतकर यांच्या आयुष्यातला खास विशेष आहे.
*(ज्येष्ठ विचारवंत आणि लेखक)*

## प्रॅक्टिकल इंटलेक्च्युअल
## **सुनील देशमुख**

मी अमेरिकेत चाळीस–पंचेचाळीस वर्षे आहे. तो अमेरिकेत येतो, तेव्हा अनेकदा माझ्याकडे येतो. मग ते अमेरिकेतली अध्यक्षीय निवडणूक कव्हर करायला येणे असो किंवा अन्य काही निमित्ताने असो. अमेरिकन निवडणुका कव्हर करायचा तेव्हा त्या निमित्ताने तो फिरायचा वगैरे. परंतु ज्या दिवशी मतमोजणी असेल त्या दिवशी आमचे नेहमी ठरलेले होते, की आम्ही आमच्या घरी जमायचे. मग आम्ही दोघे एकत्र निकाल पाहायचो. आम्ही दोघे उदारमतवादी, लोकशाहीवादी असल्यामुळे डेमोक्रॅटिक पक्षाकडे अर्थातच आमचा जास्त कल होता. उदाहरणार्थ, ओबामा निवडून आले होते तेव्हा आम्ही थोडे सेलिब्रेट केले होते. त्यांनी या ज्या अमेरिकन अध्यक्षांच्या निवडणुका कव्हर केल्या, दर वेळेला त्यांचा निकाल जेव्हा मोजला जातो, तो आम्ही एकत्र बघायचो आणि एक आवर्जून सांगायची गोष्ट म्हणजे त्याआधीच तो त्याचे प्रेडिक्शन करायचा. आजपर्यंत त्याचे एकही प्रेडिक्शन चुकलेले नाही, असा हा एकमेव गृहस्थ मला माहीत आहे. तो अमेरिकेत यायचा तेव्हा माझ्याकडे मुक्काम असायचाच. भारतात माणसे खूप व्यग्र असतात, दैनंदिन जीवनात. पण अमेरिकेत आल्यावर कामातून थोडीशी का होईना सवड मिळते. त्यामुळे कुमारसोबत गप्पा मारायला, विचारमंथन करायला वेळ असायचा.

कुमारला मी प्रॅक्टिकल इंटलेक्च्युअल म्हणेन. जेथे पिकते तेथे विकत नाही असे म्हणतात ना, तशी कुमारची गोष्ट आहे. त्याला परदेशात कोणत्या कारणासाठी बोलावले आहे, हे लोकांना फार माहीत नाही आणि तो काही ते स्वतःहून सांगत नाही. दहा–पंधरा



**सुनील देशमुख यांच्यासमवेत एका क्षणी... (अमेरिका)**

वर्षांपूर्वी ग्लोबलायझेशन या विषयावर पदवी शिक्षण द्यायचे असे 'येल'सह काही विद्यापीठांत ठरत होते. अशा काही विद्यापीठांनी एकत्र येऊन काही अभ्यासक्रम तयार करायचा आणि चार वर्षांची ग्लोबलायझेशन विषयात पदवी देता येईल, असा विचार केला. तो अभ्यासक्रम काय असावा, हे ठरवण्यासाठी त्यांनी जगभरातल्या तज्ज्ञ माणसांना, इंटलेक्च्युअल माणसांना आणि व्हिजनरी माणसांना बोलावले. त्यांनी एक महिना एकत्र राहून ते काम केले. त्यात कुमार हा एकमेव भारतीय माणूस होता. त्याच्या 'इंटलेक्च्युअल ग्रोथ'ची दखल अमेरिकेत जास्त घेतली जाते. अमेरिकेतल्या इंटलेक्च्युअल सर्कलमध्ये, अकादमिक सर्कलमध्ये किंवा अशा जाणत्या लोकांच्या सर्कलमध्ये त्याला मान्यता मिळते, तेवढी भारतात आहे की नाही ते मला माहीत नाही.

भारतातील दूरचित्रवाणीवरील चर्चासत्रांमध्ये बऱ्याचदा आरडाओरडा, आक्रस्ताळेपणा वगैरे दिसतो. कुमारचे व्यक्तिमत्त्व असे आहे की तो शांतपणे आधी दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घेतो आणि त्याचा जो विचार आहे तो अत्यंत मुद्देसूद, शांतपणे आणि तार्किकदृष्ट्या सुसंगत मांडतो. कुमार म्हणजे माझ्या मते, वॉकिंग-टॉकिंग कम्प्युटर आहे. असंख्य तारखा, घटना, अनेकांचे बोलणे-मते आदी सगळ्या गोष्टी त्याच्या डोक्यात कायम फिट्ट असतात. तो चटकन एखाद्या गोष्टीचा दाखला देतो आणि त्याचा परिणाम होतो. कुमारची ती शैली आहे. ती मी अमेरिकेतही बघितली आहे. ती कुमारची शैली भारतात कुठेही बघायला मिळत नाही. तो येथे असताना अनेक जण त्याला भेटायला, त्याच्याशी बातचीत करायला आमच्या घरी यायचे. त्या वेळेला त्याची जी मांडणी आणि विचारशैली होती, ती ज्ञानाचा जणू महासागरच! सगळ्या गोष्टी त्याच्या डोक्यात आहेत. त्या काही बघायला लागत नाही. हेच त्याचे एक वैशिष्ट्य आहे आणि त्याची प्रचीती घ्यायचे भाग्य अमेरिकन आणि इथल्या भारतीय लोकांना लाभले आहे.

महाराष्ट्र फाऊंडेशनच्या आमच्या वार्षिक महोत्सवात प्रमुख पाहुणा म्हणून त्याला दोन वेळा आमंत्रित केले होते. त्याची भाषणे 'आय ओपनिंग' असायची. एका भाषणात त्याने सांगितले की, 'अरे, तुम्ही एनआरआय लोक. तुम्ही भटकेविमुक्त आहात. म्हणजे काय तर तुमच्याकडे काही स्थावर जंगम म्हणावे असे काही नाही. तुमचे कॅपिटल तुमच्या डोक्यात आहे. सगळे मोबाइल आहे. त्यामुळे जगभर वावरता येते, ते तुम्ही करता. म्हणजे तुम्ही भटकेविमुक्त आहात.' ही एकदम वेगळीच संकल्पना आहे. प्रत्येक गोष्टीकडे तो एका नवीन व वेगळ्या दृष्टिकोनाने बघतो. त्याची मांडणी करतो. ते ऐकल्यावर वाटते की अरे, हे आपल्याला कसे सुचले नाही. हे किती वेगळे आहे!

माणसे एकमेकांशी विविध प्रकारे बोलतात. त्यावरून किंवा एकूण निरीक्षणावरून माणसाची माणसाला पारख होणे, जोखणे यापेक्षाही प्राण्यांना आपल्या स्वभावाची फार अधिक जाणीव असते. आमच्याकडे एक मोठ्ठा अल्सेशियन कुत्रा होता. त्याच्याकडे बघून आमच्याकडे येणारे अनेक जण त्याला घाबरायचे. कुमार आला, त्याला येऊ द्या म्हणाला. तो त्याला भेटला. न घाबरता त्याने त्याला थोपटले, त्याच्याशी बोलला. एवढा अक्राळविक्राळ कुत्रा त्याचा क्षणार्धात मित्र झाला. प्राण्यांना माणसातल्या चांगुलपणाची, सहृदयतेची खरीच पारख असते. येथे असला तरी त्याचे भारतातले काम सुरू असायचे. अग्रलेख वगैरे फॅक्स करायला लागायचे. तो रात्री ते काम करत बसायचा आणि आमचा कुत्रा त्याला कायम सोबत करायचा.

कुमारच्या बोलण्यात कधी अभिनिवेश नसतो. समोरच्या माणसाला तुला काय कळते अशा अर्थाने बोलणे, कमी लेखणे ही गोष्ट कुमारच्या बाबतीत मी गेल्या ५० वर्षांत बघितलेली नाही. तो समोरच्या माणसाला नेहमीच आदरपूर्वक आणि बरोबरीचा समजून बातचीत, विचारविनिमय करतो. समोरच्या माणसाचे बोलणे त्याला पटत नसले तरी ते तो ऐकून घेतो आणि नंतर त्याच्या पद्धतीने ते खोडूनही काढतो. परंतु त्यात त्याचा अपमान करणे, काहीतरी कुत्सित बोलणे वगैरे ही गोष्ट गेल्या पन्नास वर्षांत मी एकदाही पाहिलेली नाही. म्हणून म्हणतो की हा प्रॅक्टिकल इंटलेक्च्युअल आहे. त्याला जगभर मान्यता आहे. इंटेलेक्चुअल लोक हे अकादमिक असतात, आपल्याच जगात वावरत असतात किंवा 'आम्ही कोण म्हणूनी...' अशी 'ग'ची बाधा त्यांना झालेली असते. पण कुमार यापेक्षा वेगळा आहे. तो वेलग्राऊंडेड आहे- त्याचे पाय कायम जमिनीवर आहेत. त्याचे जे काही इंटलेक्चुअल विचार असतील ते सगळे सद्यस्थिती काय आहे याच्याशी जोडल्याशिवाय तो बोलत नाही. त्याचे सगळे बोलणे हे वास्तवाला धरून असते, प्रॅक्टिकल असते आणि त्यातून काहीतरी खरोखर शिकण्यासारखे असते. आमच्यातल्या बौद्धिक चर्चा ही मला एक प्रकारे बौद्धिक मेजवानी वाटते. तो माझा मित्र आहे हे माझे भाग्य आहे. गेली पन्नास वर्षे आमची मैत्री अखंड आहे. त्याच्या संगतीत मैत्रीचा निखळ आनंद मिळतो.

कुमारसोबत शारदाही येते येथे. शारदा शांत असते. फारसे बोलत नाही. पण तिची निरीक्षणशक्ती, तिचे विचार हे कुमारच्याच

तोडीचे आहेत. ती कुमारला सहचारिणी म्हणून मिळाली हे कुमारचे भाग्यच आहे. शारदाचे काम, तिचे विचार, तिची ध्येयनिष्ठा, तिचे लिखाण हे सगळे बघता तीही अष्टपैलू आहे. त्या दोघांची संगत आम्हाला लाभणे यासारखा दुसरा ठेवा नाही.

*(महाराष्ट्र फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष)*

## ज्ञाननिधीशी मैत्री
## **सुबोध केरकर**



कुमार आणि माझा साधारणपणे गेली वीस-पंचवीस वर्षे संपर्क असेल. पहिल्यांदा आमची भेट झाली ती इन्स्टॉलेशन्सच्या निमित्ताने. मी समुद्रावर जी इन्स्टॉलेशन्स बनवतो ती त्यांनी पाहिली, ती त्यांना फार आवडली. पुष्कळ पत्रकार-लेखक कलाकारांची मुलाखत घेतात, पण मला एक गोष्ट जाणवली, की कुमार जेव्हा माझ्या कलेबद्दल बोलायला लागले, तेव्हा त्यांची कलेबद्दलची जी समज होती, ती सामान्यतः सगळ्याच पत्रकार किंवा लेखकांमध्ये नसते. भारतामध्ये स्थिती अशी आहे, की कॉन्टेम्परररी आर्ट देशभरातल्या लाखभर लोकांना समजत असेल, बाकीच्यांना त्याचा गंधही नसतो, कारण त्यांचे ते कनेक्शनच नसते. त्यामुळे मला असे जाणवले की मी जे काही करत होतो, त्यांना ते एकदम समजले आणि त्यांनी 'लोकसत्ता'च्या पुरवणीत पहिल्या पानावर एक लेख लिहून टाकला. त्या लेखाचे शीर्षक मला अजून आठवते आहे- 'अध्यात्माचा सामुद्रिक आविष्कार.' त्यामुळे मी इतका इम्प्रेस्ड झालो होतो, की माझ्या त्या इन्स्टॉलेशनसमध्ये त्यांना अध्यात्म जाणवले. ते शीर्षक मला फार आवडले.

गोव्यात ते येतात, तेव्हा माझ्याकडे राहतात. मीही दिल्लीला गेल्यावर त्यांच्याकडे जातो. माझे बहुतेक मित्र आहेत, ते माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत. मी पूर्वीपासून आर.के. लक्ष्मण, केतकर, एम.व्ही. कामत अशा लोकांच्या सान्निध्यात आलो. केतकरांच्या सान्निध्यात असल्यावर एका ज्ञाननिधीच्या सान्निध्यात असल्यासारखे वाटते. त्यांच्याकडून पुष्कळ शिकता येते. त्यांचे वाचन इतके दांडगे आहे की त्यांच्याशी बोलत बसल्यावर एखाद्या ऋषीच्या शेजारी बसल्यासारखे वाटते. सगळ्या कलांचे रसग्रहण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. मग ती चित्रकला असो, शिल्पकला असो किंवा नाटक, चित्रपट. मला त्यांच्याकडे बघितल्यावर वाटते, की कुमार वयामध्ये प्रत्येकाला सगळ्या गोष्टींबद्दल कुतूहल असते, जिज्ञासा असते, प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची उत्सुकता असते. पंचाहत्तराव्या वर्षातदेखील कुमार केतकर यांच्यामधला 'कुमार' अजून जिवंत आहे. त्यांना अजून ती उत्सुकता आहे, नवे शिकण्याची, नवे जाणून घेण्याची आणि ती कुमार वयातल्या मुलांना लाजवेल इतकी आहे. हे मला फार आवडते.

आमची मैत्री असण्याचे दुसरे कारण म्हणजे 'आयडिया ऑफ इंडिया' ही जी संकल्पना आहे, जी गांधी, नेहरू आणि बाकीच्या सगळ्या फाऊंडर्स ऑफ इंडियन रिपब्लिक यांच्या डोक्यात होती, त्या संकल्पनेपासून आपण सध्या फार दूर जात आहोत, विशेषतः मोदीसरकार. ही संकल्पना धोक्यामध्ये आहे. त्याबद्दल त्यांना जी तळमळ आहे, त्याबद्दल आम्ही अनेकदा बोलतो. आयडिया ऑफ इंडिया म्हणा किंवा सेक्युलारिझम म्हणा, ते वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी वाचलेच पाहिजे. त्यासाठीची त्यांची तळमळ, ते जे काही करतात, त्याने मी इम्प्रेस्ड झालो आहे.

रामचंद्र गुहा हे माझे आवडते लेखक आहेत. त्यांच्या 'गांधींनंतरचा भारत' या पुस्तकाचा अनुवाद शारदा यांनी केला आहे. गांधी या समान दुव्यामुळे आत्मीयता आणखी वाढली आहे. केतकर यांची कित्येक भाषणे मला आवडतात. ते गोव्याला आले की मी प्रत्येक भाषणाला आवर्जून उपस्थित राहतो. एखाद्या विषयाचा ते इतका सखोल अभ्यास करतात हे फार आवडते. एका भाषणात त्यांनी सांगितले होते- 'विलायत' या शब्दाबद्दल. आपण 'विलायतेला गेलो' असे म्हटले जाते. तर विलायत नावाचे कुठलेही शहर युरोपमध्ये नाही. मग हे विलायत कसे आले? तर तुर्कीमधून युरोपला जाताना तिकडे एक लहानसे गाव आहे, ते क्रॉस केले की विलायत - युरोप लागते. त्या गावाचे नाव 'विलायत' आहे. त्यामुळे 'विलायतेला गेलो' हा शब्दप्रयोग आला.

त्यांच्यामुळे बऱ्याच मान्यवरांच्या भेटीगाठींचा योग जुळून आला आहे. 'ग्लोबल व्हिलेज' ही कल्पना मांडणाऱ्या मार्शल मॅकलुहान यांच्या मुलीने- टेरी मॅकलुहान जवळपास २२ वर्षे संशोधन करून खान अब्दुल गफारखान - सरहद्द गांधी यांच्यावर 'फ्रंटियर गांधी : बादशहा खान - अ टॉर्च ऑफ पीस' ही फिल्म तयार केली होती. ती फिल्म 'गोवा फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सादर झाली तेव्हा ती गोव्याला आली होती. त्या वेळी तेव्हा केतकर तिला आमच्याकडे घेऊन आल्याने तिची भेट घडली.

*(जागतिक कीर्तीचे चित्रकार-शिल्पकार)*

# अफाट स्मरणशक्ती, अपार वाचनप्रेम
## अच्युत गोडबोले



मी कुमार केतकरला १९६७-१९६८ पासून ओळखतो, म्हणजे त्या ओळखीला आता पन्नाहून अधिक वर्षे झाली आहेत. मी आयआयटीत होतो, तेव्हा तो आयआयटीच्या कॉम्प्युटर डिपार्टमेंटमध्ये बहुधा साहाय्यक म्हणून होता. प्रचंड प्रगल्भ मेमरी, पॉलिटिक्समध्ये अचाट इंटरेस्ट, डाव्या विचारसरणीकडे झुकलेला... कॅण्टिनमध्ये सिगारेटची धुरकांडी उडत आहेत आणि आम्ही ते बघत असू! त्याला सगळ्या निवडणुकांचे सगळे निकाल तेव्हापासून पाठ असायचे, ते अजूनही आहेत. कोणाला कोणत्या साली किती मते पडली, कोणाची युती होती, कोणाचे काय झाले हे सगळे अचूक आकडेवारीसह त्याच्या डोक्यात फिट्ट असायचे. निवडणुका सुरू झाल्यापासून ते आतापर्यंतच्या प्रत्येक निवडणुकीत प्रत्येक पक्षाला किती मते मिळाली हे जवळपास त्याचे पाठ आहे. मला त्याच्या या अचाट बुद्धीचे आश्चर्य वाटते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याचा दिलखुलास स्वभाव. अनेकांशी त्याचे राजकीय मतभेद असतील; माझेही आहेत. पण ती मते मैत्रीच्या आड येत नाहीत. आपल्या मताशी वेगळी असणारी मते असतील तरी ती तो ऐकतो. लोकशाहीवर त्याचे प्रेम खऱ्या अर्थाने असले पाहिजे. मतभिन्नता असेल तरीसुद्धा चर्चा करायची, वादविवाद करायचा हे सगळे त्याला आवडते आणि तो ते अतिशय चांगल्या तऱ्हेने पाळतो. मी त्याच्या घरी अनेकदा गेलेलो आहे. त्याचा ग्रंथसंग्रह बघितलेला आहे. त्याने एवढी पुस्तके एवढ्याजणांना दिलेली आहेत, तरीसुद्धा प्रचंड पुस्तके त्याच्या ठाण्याच्या घरात उरलेली आहेत आणि शिवाय, त्याने केवळ पुस्तके ठेवण्याकरता टिटवाळ्यामध्ये घर घेतलेले आहे. मी कधी त्याला एखादे पुस्तक हवे आहे असे सांगितले की तो ते टिटवाळ्याहून आणावे लागेल, असे केव्हातरी सांगतो. त्याने माझ्या पुस्तकसंदर्भांकरता सढळपणे मदत केलेली आहे. 'तुझ्या कामासाठी तुला लागणारी पुस्तके घेऊन जा' हे म्हणाला आहे, तशी 'ती परत कर' हेही म्हणाला आहे. म्हणजे कोणी ज्ञानार्जन करत असेल तर तो त्याला मदत करतो. त्याच्याविषयी त्याला फार कळकळ वाटते.

त्याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे दुसऱ्याचा गुण ओळखणे. मी 'लोकसत्ता'मध्ये सदर लिहिले त्याचे श्रेय सुरुवातीला अरुण टिकेकर यांना आणि नंतर कुमार केतकर याला आहे. त्यातही कुमारला जास्त श्रेय जाते, असे म्हणावे लागेल. 'बोर्डरूम' लिहिले तेव्हा टिकेकर होते, नंतर 'नादवेध' लेखमाला लिहिली तेव्हा टिकेकर आणि कुमार, दोघेही होते. त्यानंतर मी 'किमयागार', 'अर्थात', 'झपूर्झा' ही सगळी सदरे कुमारच्या काळात लिहिली गेली. पुढे त्या सदरांची पुस्तके झाली, त्यांच्या अनेक प्रती संपल्या हे सगळे खरे असले तरी मुख्यत्वे लेखनाची ती सुरुवात सदरापासून झाली हे खरे. कुमार नेहमीच लिहायला प्रोत्साहन द्यायचा.

त्याच्यावर नेहमी एक आरोप केला जातो की तो सोनियावादी आहे. त्यात किंचितसे तथ्य मलाही वाटलेले आहे. पण, एक लक्षात घेतले पाहिजे की त्याने सोनियाच्या विरुद्ध असलेले लेख तेवढ्याच ताकदीने आणि योग्य ठिकाणी छापलेले आहेत. समोरच्याशी मते जुळली नाहीत तरी ती संपूर्ण लोकशाही पद्धतीने सगळ्यांसमोर आली पाहिजेत अशी चांगल्या तऱ्हेने मांडली. सगळ्यांना चांगल्या तऱ्हेने वाव दिला.

त्याच्या लिखाणात विषयांची विविधता केवढी आहे! त्याच्या काही पुस्तकांपैकी अर्थात काही राजकारणावरची आहेत. 'एडिटर्स चॉइस' या त्याच्या सदराचे पुढे पुस्तकात रूपांतर झाले. त्यात त्याला आवडलेली पुस्तके, त्याला आवडलेल्या गोष्टी, त्यात देश-परदेशातील व्यक्तिमत्त्वे, घटना आदींचा समावेश आहे. त्याच्या विषयांचा आवाका खूप मोठा आहे. त्याला विविध गोष्टींचे कौतुक आहे, जाण आहे.

तो पक्का विवेकवादी आहे. तो पक्का समतावादी आहे. तो ग्लोबलायझेशनने सगळेच चांगले झाले असे एके काळी मानणारा होता. तर मी ग्लोबलायझेशन संपूर्ण चुकलेले नाही पण त्यात बऱ्याच त्रुटी आहेत असे मानणारा आहे. गंमत अशी की मी 'अनर्थ' पुस्तक लिहिले. मी त्यात ग्लोबलायझेशननंतर विषमता कशी निर्माण झाली, पर्यावरणाचा ऱ्हास कसा झाला असे सगळे लिहिले होते. तरीसुद्धा त्याला ते पुस्तक खूप आवडले. त्याने ते ॲप्रिशिएट केले, त्याने त्या पुस्तकाची प्रशंसा करत अनेकांना ते वाचण्याची शिफारस केली. त्याच्याकडे समोरच्या गोष्टीकडे डोळसपणे बघण्याचा जो गुण आहे, तो खूप चांगला आहे. आमची गाठ पडायची तेव्हा तो सांगायचा, की मी अनेक ठिकाणी जातो. शहरात-खेड्यात माझी भाषणे होतात, तेव्हा दिसते की तुझे नाव प्रचंड आहे. तो स्वत:च एवढा मोठा दिग्गज माणूस! तो मला ही गोष्ट आवर्जून सांगायचा, याविषयी मला बरे वाटायचे. आमचे संबंध खूपच चांगले आहेत. राजकीय मतांमध्ये अर्थातच आमच्यात फरक आहे, तरीसुद्धा तो मला अतिशय जवळचा वाटतो, कारण तो आणि शारदा ही अचाट जोडी आहे. कारण त्यांना कोणत्याही विषयासंदर्भात केव्हाही विचारावे, ते मोकळे, प्रसन्न आणि ओपन माइंडेड असतात. ताबडतोब मदत करतात सगळ्यांना. 'सिंफनी' नावाचे माझे एक पुस्तक त्या दोघांना मी अर्पण केले आहे. 'झपूर्झा'च्या इंग्रजी साहित्यावरील तीन खंडांच्या प्रकाशनाला तो आला होता. तेव्हा

इंग्रजी साहित्याचा त्याचा गाढा अभ्यास दिसला होता. त्याचे वाचन भयंकर दांडगे आहे. तो विषयानुरूप पुस्तके पटापट सांगू शकतो. त्याला खूप गोष्टी माहीत असतात. मला वाटते, की महाराष्ट्रात जे अतिशय कमी, ज्यांना खऱ्या अर्थाने विचारवंत म्हणता येईल, अशा विचारी विचारवंतांपैकी तो एक म्हणता येईल.

*(आयटी तज्ज्ञ, विचारवंत, विपुल लेखन करणारे लोकप्रिय लेखक)*

## एक सच्चा माणूस
कलापिनी कोमकली




अमृतमहोत्सव हा काही छोटा टप्पा नाही आयुष्याचा. माझ्यापुरते म्हणायचे तर मागे वळून बघताना अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आठवते. अंदाजे २००३ किंवा २००४ ची गोष्ट असेल. अचानकपणे मला एक दिवस फोन आला. आमचे एक परिचित आहेत- संजीव खांडेकर म्हणून, त्यांचा. मला काही कल्पना नव्हती. त्यांनी फोन केला आणि म्हणाले, 'हे घ्या बोला.' मला काही कळेचना की ते मला कुणाशी बोला म्हणत आहेत. पलीकडच्या बाजूला कुमार केतकर होते. मी अर्थातच त्यांची वाचक होते त्या वेळेला. कारण तेव्हा माझ्याकडे रोज लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स यायचे. हल्लीच्या ऑनलाइनच्या काळात आता ते बंद झालेले आहे. मात्र गेली पन्नासहून अधिक वर्षे आमच्याकडे मुंबईची डाक-आवृत्ती त्या वेळेला निघायची, ती नेहमी यायची. तेव्हा मी केतकर यांचे अग्रलेख आणि इतर गोष्टी वाचत असे. त्यामुळे मी क्षणभर अचंबित झाले, पलीकडून थेट केतकर यांचा आवाज ऐकून. त्या वेळी आम्ही एका मोठ्या कार्यक्रमाची पूर्वतयारी करत होतो. त्या कार्यक्रमाचे नाव होते- 'गीतवर्षा.' माझ्या वडिलांनी - पंडित कुमारगंधर्व यांनी पंचवीस-तीस वर्षांपूर्वी त्या कार्यक्रमाला साकार स्वरूप दिले होते. त्यानंतर काही वर्षे माझी आई वसुंधरा आणि बाबा पंडित कुमारगंधर्व यांनी संयुक्तपणे खूप मोठ्या प्रमाणावर त्याचे सादरीकरण केले होते. कुमारजी गेल्यानंतर बरीच वर्षे आम्हाला ते करणे जमले नव्हते. दरम्यान, तीस वर्षे उलटली होती आणि आई नि मला तो कार्यक्रम पुन्हा सादर करावा असे अगदी मनापासून वाटत होते. आम्ही त्या संदर्भामध्ये काही योजना आखत होतो. केतकर यांचा आवाज ऐकून मला खूप छान वाटले. मी त्यांना म्हटले, की 'या कार्यक्रमाला तुम्हाला यायचे आहे.' ते म्हणाले, 'मी अवश्य येईन.' नंतर आमचे असेच जुजबी बोलणे होऊन संभाषण संपले. त्याच संदर्भातली आणखी एक गोष्ट आठवते आहे. पुण्याला हा मुख्य कार्यक्रम करायचा होता. तेव्हा आमचे एक परिचित स्नेही मुकुंद संगोराम आणि विलास गोडबोले यांनी त्या कार्यक्रमाच्या संदर्भामध्ये 'आपण केतकर यांची मदत घेऊया,' असे सांगितले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्याशी जास्त संपर्क येत गेला. तो कार्यक्रम पुण्याला झाला तेव्हा ते स्वतः हजर होते. कार्यक्रमानंतर मनमुक्त गप्पागोष्टी झाल्या. नंतर जवळपास महिन्याभराने तो कार्यक्रम मुंबईला करायचा बेत आखला गेला, तेव्हादेखील आम्हाला त्यांच्याकडून खूप साहाय्य मिळाले.

मी त्यांची वाचक होते आणि अजूनही त्यांची वाचक आहे. त्यांचे वेगवेगळे जे लेख येत असत ते मी आवर्जून वाचत असे. मला एक नेहमी वाटत आलेले आहे की हा खूप सच्चा माणूस आहे. जे त्यांना मनापासून वाटते, ते ते बरोबर व्यक्त करतात. मला ती खूप महत्त्वाची गोष्ट वाटते आज घडीला. कारण सगळीकडचे वातावरण बघता, हे करणे म्हणजे एका दृष्टीने फार धाडसाचे आहे. आता खरे म्हणजे हे धाडस असलेच पाहिजे, अशा मोठ्या व्यक्तींमध्ये ज्यांना आपण खूप मोठ्या पदावर बघतो. त्यांच्याकडून अर्थातच ही अपेक्षा असते की त्यांचे कार्य आहे, ते आम्हालाही मार्गदर्शक ठरावे. पण बऱ्याच वेळा आपली निराशादेखील होते. पण मला खूप अभिमान वाटतो हे सांगायला, की केतकर यांच्याबद्दल असे कधीही वाटले नाही आणि त्यांचा व्यासंग, त्यांचे वाचन इतके दांडगे आहे, त्यांची स्मरणशक्ती इतकी दांडगी आहे की, त्याबद्दल बोलावे तितके थोडेच! कारण ते माझ्या आवाक्याबाहेरचे आहे. ते जेवढे वाचतात, तेवढे आत्मसात करतात. त्यांचे विचार इतके परखड, भक्कम असतात आणि त्यावर ते कायम ठाम असतात. ते विचार ते उत्तम पद्धतीने व्यक्त करतात. मला हेही फार आवडते की शारदासारख्या अतिशय सच्च्या सहधर्मचारिणीची साथ त्यांना लाभलेली आहे. त्या दोघांचेही मला खूप मनापासून कौतुक वाटते. त्यांनी स्वतःला समाजकार्यासाठी इतके झोकून दिलेले आहे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. इतके साधे राहणीमान ठेवून, इतके चांगले विचार आत्मसात करणे ही खरोखर अतिशय मोठी गोष्ट आहे. मला त्यांचा खूप स्नेह लाभलेला आहे. त्यांचा हा स्नेह मला यापुढेही सतत मार्गदर्शक ठरो. हा स्नेहधागा असाच अतूट राहो. त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याची संधी मिळून मी समृद्ध होत राहो.
(ख्यातनाम गायिका, कुमार गंधर्व यांची सुपुत्री)

## Rarer Intellectual Journalist

**Aakar Patel**



Kumar Ketkar is the rare intellectual editor and even rarer intellectual journalist. This may seem an odd thing to say about a profession that concerns writing, but writing is only incidental to journalism, even print journalism. The number of women and men within it who are well read is few. Even fewer (actually I cannot think of more than three) are those who are both well read and can connect the different parts of their knowledge into a whole, coherent corpus. Kumar Ketkar is one of them, of course, as all who have met him or perhaps even read him know. He could easily be a part of any group of distinguished exerts anywhere in the world, as he actually also has been so many times.

I first met him 25 years ago when he was editor of Maharashtra Times. He was 50, I was 25 and had just become an editor myself. The event was at the press club and when someone pointed him out, I thought I would speak to him at the end of it and introduce myself. After he spoke, I did not do so because I was intimidated. He spoke, without notes and apparently without preparation, so knowledgeably and so fluently that it was a moment of self-realisation for me. It was shocking and frightening to know that I was in the same line of work as someone so vastly and manifestly superior. Another meeting this time organised outside India by a think tank that both of us were invited to, confirmed this thesis but by this time my shame had given a little way and I was comfortable with the fact that it was fine that I was not near Kumar Ketkar because very few could be and that was fine.

If there is one thing that I am thankful for it is that Kumar Ketkar has brought dignity and respect to our often tawdry profession merely by being a part of it. I met him when he had just come out of surgery, I think this was when he was 62, and wished him a long life. Not just for himself but also for the rest of us and for this country and its people, whom he loves so much and has given so much to.

*(Renowned Columnist, Editor and former Executive Director Amnesty International.)*

## Thank you for the memories

**Vikram Rajadhyaksha**




Happy Birthday to Kumar Ketkar, your 75th!
Time has just flown since I got to know you. I still remember you coming to our house in Powell, OHIO during the American presidential elections and following the activities of the electoral college knowing full well that Ohio was a swing state and you needed to carry Ohio to be in the White House. Even that has changed this year. I learned so much from you about American politics and about Indian politics. Thank you! The time I remember very vividly is the time you came and we invited all the members of the World Counsel and International Visitors Center to my house to listen to you about India's cashmere problem. How you had well over 100 people in my house mesmerized by your erudite and concise description of India's policy on cashmere that had been followed for over 60 years. I also remember you making a speech standing on the landing of our stairs so that you would be elevated above for the audience to see you clearly. Thank you for the memories and HAPPY BIRTHDAY!

*(Founder, Chairman and CEO DLZ Coporation, USA)*

## wealth of information and wisdom

**Sam Pitroda**

Dr. Kumar Ketkar, a well respected Indian journalist, newspaper editor, public speaker, fearless thinker and a member of the parliament has been a personal family friend for around four decades. We first connected in Rajiv Gandhi era while I was engaged in seeding the telecom and IT institutions and infrastructure, and working on technology missions. We both were young energetic and had a vision of India rooted in Democracy, Freedom, Diversity, Inclusion, Secularism, and many Gandhian values. We both were admirers of Nehru's initiatives



in science and technology and scientific thinking. We believed in Rajiv Gandhi's dream to take India in to 21st century with dignity and respect using technology as an entry point to bring about generational change. Based on this common commitment to basic values we both travelled together for four decades.

Dr. Kumar Ketkar is a very special person with deep interest in political land scape of India in every state and its impact on multiple aspect of social and economic developments. He is equally interested in international politics and global affairs.

Several years ago Kumar and his wife Sharda travelled to the US to study elections and spent a week with me at home in Chicago. During his visit I had an opportunity to discuss and learn a great deal from him on Indian history and independence movement. He is a wealth of information and wisdom on a variety of Indian affairs. His wife Sharda is equally engaged in the intellectual journey with Kumar. She is a well known author in Marathi and has translated many important books including my autobiography "Dreaming Big". They both make an ideal couple, deeply engaged in Indian values, wisdom and welfare.

I also had an opportunity to spend quality time with Kumar during last Indian elections while campaigning in Gujarat. Together we visited Ahmedabad, Baroda, Surat, Jamnagar and Rajkot and addressed many group meetings and learned a lot in the process. He continues to be actively engaged at present in public and personal conversations on current affairs. Like many of us he is equally concerned about what is happening in India during corona crisis and its impact on economy, employment, Farmers, migrant labors and people at large. Kumar continues to write and speak about many of these issues that define Indian challenges.

My wife Anu and I wish Dr. Kumar Ketkar a very happy birthday and very long, happy, healthy and prosperous journey forward. We recognize and respect his contribution to India and wish him all the positive energy to continue his efforts to spread his message for prosperous India.

*(An Indian telecom engineer, inventor and entrepreneur)*

## Perceptive political analyst

**Rakesh Maria**



Mr Kumar Ketkar is completing 75 years of age on the 7th of January 2021. Incidentally, it comes just a day after the 'Journalist Day' in Maharashtra, celebrated on the 6th of January every year to mark a fine journalistic tradition dating back to 1832. It was the day when the first Marathi newspaper 'Darpan' was published in Mumbai, simultaneously in Marathi and English, by Balshastri Jambhekar. Darpan concentrated on social reform but set a trend that caught the imagination of the rapidly growing Marathi intelligentsia who were hungry even for political reform. Reformers turned journalists and became politicians, laying down the foundation of our democracy. Mr Kumar Ketkar is part of a long list of greats who have carried forward this legacy. He has done it with a commitment that has made him a name to reckon with, not just in the regional Marathi Press but also in its counterpart in the English Press and electronic media in India, and that too with elan.

With extensive experience gathered over 45 long years spent with some of the most reputed and influential journals in the country, Mr Ketkar has emerged as a very perceptive political analyst whose opinion can be argued, but not ignored. Fearless expression of thoughts and that too without mincing words is what Marathi journalists are known for, and Mr Ketkar is no exception. At the same time, he also represents the solid foundation of scholarship and high standard of decorum that his forebearers have laid down.

After his long stint in journalism, Mr Ketkar chose to enter politics and his decision has attracted microscopic scrutiny from different quarters. However, one admires his courage to come to terms with his personal political choice and take the plunge despite the numerous challenges it was sure to draw. It is always said that sincere and good people must join politics. They could be from any walk of life, even journalists and we must welcome their decision to enter an arena which is not easy to withstand. In Mr

Ketkar's case, the loss to Indian journalism is sure to be compensated by the gain to Indian politics. A vibrant and well-informed 'Politician' like Mr.Ketkar is a must for a healthy democracy which India is and shall always remain. Therefore, even Mr Ketkar's opponents must be on their toes and happy, to have him pitted against them in the Upper House. I wish him a long and healthy life which will enable him to make a positive contribution to public life as a Member of Parliament. Wishing him all success in his endeavours and prayers for him to reach the pinnacle of whatever he strives for.

*(Former Commissioner of Police Mumbai.)*

## Global Affairs Expert

**Vappala Balachandran**



I find it an honour to be asked to write about Shri Kumar Ketkar. After my retirement from Central government in 1995 I used to meet him at various seminars at the Mumbai Nehru Centre. I was always impressed with his deep knowledge of global affairs with special focus on the Indian conditions in social, religious, political, economic or security areas. His analytical ability was admirable. He would always find a new viewpoint not mentioned by others.

In 2005 I had organized a two day international conference hosting the delegates of the Global Organization of People of Indian Origin(GOPIO) at the Taj Palace, Mumbai. GOPIO is a much older non-resident Indian (NRI) organization than the yearly Pravasi Bharatiya Diwas meetings organized by our Central Government from 2003. It was founded in New York in 1989 on the initiative of the National Federation of Indian American Associations(NFIA) and attended by about 3,000 delegates from all over the world from Australia and Fiji in the Pacific to Guyana and Surinam in the Atlantic.

The Mumbai Conference was inaugurated on January 6, 2005 by the then Maharashtra Governor Hon. Shri S.M.Krishna. Nearly 200 delegates had come from several countries. They included former Fiji Prime Prime Minister Mahendra Chaudhry, former Trinidad & Tobago PM Basdeo Panday, serving Surinam Vice-President Jules Rattankoemar Ajodhia, Malaysian Minister of Works Dato Seri Samy Vellu and Deputy Leader of the UK House of Lords Navnit Dholakia.

I had requested Shri Ketkar to address the "Media Conclave" of this privileged gathering. Let me quote the GOPIO official web site on his speech: "Kumar Ketkar, Editor of "Lok Satta' while delivering the key note address, decried the lopsided coverage of NRI/PIO issues by the Indian media based both in India and overseas, and filling their pages with only the glamour and the rich among them. This tended to obfuscate the real issues, which should engage the attention of the media in so far as it relates to the Diaspora". He went on giving his suggestions to overseas Indians, to make this Organization a rallying point for protecting the welfare and human rights of all Indians in advanced and underdeveloped foreign countries.

Shri Ketkar was kind enough to chair a discussion of my third book "Keeping India Safe: The Dilemma of Internal Security" at the annual Kala Ghoda festival in 2018. The book was based on my long research on how certain serious incongruities had crept into our internal security structure from the colonial 1935 Government of India Act to our Constitution and how it could be remedied so that we could prevent serious incidents like the 26/11 Mumbai terror attacks.

In his lucid opening remarks Shri Ketkar broke down the complex legal and procedural analysis I had made in my book to be able to be understood by the common man, which only an experienced journalist can do. I was very grateful to him for doing that.

I wish Shri Ketkar excellent health and long life on this memorable day to continue the great work he is doing.

*(Former Special Secretary, Cabinet Secretariat and member, 2 man High Level Committee appointed by Govt. of Maharashtra to enquire into the police performance in resisting the Mumbai 26/11 terror attacks.)*

●

# आमचे अफाट केके...



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**श्रीकांत बोजेवार**

कुमार केतकर तेव्हा 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक होते. त्यांच्याविषयी खूप ऐकून होतो, परंतु प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. ती झाली अमोल पालेकर दिग्दर्शित 'कैरी' या चित्रपटाच्या एका 'शो'च्या वेळी. वांद्रे येथे गेईटी-गॅलेक्सी-जेमिनी ही थिएटर-त्रयी होती, तेथे चित्रपट सुरू होण्यापूर्वी पाचपन्नास पत्रकार-पाहुणे जमले होते. केतकर एका घोळक्यात गप्पा मारत उभे होते. फुलाफुलांचा रंगीबेरंगी टी-शर्ट आणि जीन्स. तोवर पाहिलेल्या संपादकीय पेहरावाला माझ्या मनात पहिला सुखद धक्का बसला. जीन्स घालणारा संपादक मी तोवर पाहिलेला नव्हता. हा माणूस दोन वर्षांनी आपला संपादक होणार आहे हे तेव्हा कुठे माहीत होते?

केतकर 'लोकसत्ता'मध्ये २००२ च्या नोव्हेंबर महिन्यात रुजू झाले. मी स्वत:ची ओळख करून देताच त्यांनी शेकहँडसाठी हात पुढे केला आणि म्हणाले, 'मी तुला श्रीकांत बोजेवार म्हणून नाही, तंबी दुराई म्हणून ओळखतो. तंबीचा मी जबरदस्त फॅन आहे.' २०१०च्या अखेरीस ते 'लोकसत्ता' सोडून 'दिव्य मराठी'मध्ये गेले आणि मी २०११ मध्ये 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये रुजू झालो. 'लोकसत्ता'तील त्या आठ वर्षांत केतकरांशी चांगली मैत्री झाली. मैत्री हा शब्द त्यांच्या संदर्भात सहज वापरता येतो, कारण वय, विद्वत्ता, लोकप्रियता, अनुभव यांचे ओझे ते अजिबात बाळगत नाहीत आणि बाळगूही देत नाहीत. त्यांच्याशी मतभेद होऊ शकतात, टोकाचे वाद होऊ शकतात, ते त्यांची मते कधीही सोडत नाहीत, ते कोणत्याही बाजूने - अगदी विरुद्ध बाजूनेदेखील बिनतोड युक्तिवाद करू शकतात. पत्रकाराने समतोल असावे, कुणाची बाजू घेऊ नये हा विचार त्यांना बावळटपणाचा वाटतो आणि समोर कट्टर शत्रू आला तरी त्याला कोणत्याही थराला जाऊन मदत करायला ते तत्पर असतात.

त्यांच्या स्वभावातील खूप वेगवेगळे पैलू गेल्या अठरा वर्षांत मला पाहायला मिळाले आहेत. विद्वान पत्रकार, विश्लेषक, अभ्यासक, टीकाकार ही त्यांची रूपे सर्वांनाच पाहायला मिळतात, त्यांच्या लेखनातूनही ती प्रकटतात. त्यांची विद्वत्ता आणि स्मृती आपल्याला स्तिमित करते. खेळकर, खोडकर, नर्मविनोदी कुमार केतकर मात्र कदाचित त्यांच्या

*त्यांच्या व्यासंगाचा आवाका एवढा जबरदस्त आहे की आपण एखाद्याला ज्या विषयातले तज्ज्ञ समजतो, त्याच्याहूनही त्या विषयाची अधिक माहिती केतकरांना असते. याचा प्रत्यय आम्हाला अनेकदा आला आहे.*

अवतीभवती प्रत्यक्ष वावरलेल्यांनाच माहीत असतील. त्यांची भटकंती अखंड सुरू असते. अशोक नायगावकर आणि केतकर यांच्यात महाराष्ट्र उभा-आडवा पिंजून काढण्याबाबत स्पर्धा आहे असे मी त्यांना म्हणायचो. त्यांच्या या स्वभावामुळे भाषणांची-कार्यक्रमांची आमंत्रणे त्यांना सतत येत असतात. गप्पांच्या मैफिली रंगवण्याचे कसब त्यांच्यात असल्याने 'आम्ही चार जण भेटतोय, तर तुम्ही याल का गप्पा मारायला' अशी गळ त्यांना घाळणारेही असंख्य आहेत. भिडस्त स्वभावामुळे 'नाही' म्हणणे त्यांना अवघड जाते आणि ते स्वतःवर नवनवी संकटे ओढवून घेतात. आपण कोणा-कोणाला आणि कशा-कशा कशासाठी होकार दिला होता, याचाही त्यांना अनेकदा विसर पडतो आणि मग त्यातून सुटण्यासाठी ते काय करतात?

'लोकसत्ता'चे कार्यालय एक्स्प्रेस टॉवरमध्ये असताना, मी एका संध्याकाळी काही कामानिमित्त त्यांच्या केबिनमध्ये गेलो. ते फोनवर बोलत होते, मला खुणेनेच 'बस' असे म्हणाले. फोनवर ते कुणाला तरी सांगत होते. 'अहो, मी आता सांगलीत आहे. पुण्यात पोचणार होतो आज, पण इथला कार्यक्रम लांबलाय खूप.'

तिकडून बहुधा 'आणखी किती वेळ लागेल संपायला' अशी विचारणा झाली असावी. 'एक मिनीट, मी विचारतो आयोजकांना', असे फोनवर सांगून त्यांनी मलाच विचारले, 'आणखी दोनेक तास तरी लागतील ना संपायला?' आणि लगेचच तसे सांगूनही टाकले. त्यावर बहुधा पुढील व्यक्तीने सांगलीत कुणाच्या तरी ओळखीचा संदर्भ देत, 'सकाळी ब्रेकफास्टला त्यांच्या घरी जा' अशी विनंती केली असावी. कारण केतकरांचे पुढचे वाक्य होते,' मी पहाटे ४ वाजताच निघणार आहे इथून, नाही तर मला आवडलं असतं त्यांच्याकडे जायला.'

गंमत म्हणजे, सुटकेचा मार्ग म्हणून अशी सारवसारव करत असताना ते आपण ऑफिसच्या लँडलाइनवर बोलत आहोत हे विसरून गेले होते. हे त्यांच्या बाबतीत अनेकदा घडलेले आहे, परंतु लोक याचा राग धरत नाहीत, मनात ठेवत नाहीत, कारण संधी मिळताच केतकर त्याची सव्याज भरपाई करून देतात. त्यांचे एखादे भाषण ऐकले, त्यांच्याशी थोडा वेळ गप्पा झाल्या की आपल्या आकलनात भर पडलेली असते. आकलन आणि अभ्यास या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत याचे भान आपल्याला केतकरांचे एखादे भाषण ऐकल्यावर येते. आज गूगलच्या युगात माहितीचे महत्त्व कमी झाले आहे, कारण एका टिचकीसरशी संदर्भ तुमच्या स्क्रीनवर प्रकट होतात. त्या संदर्भाचे विश्लेषण हे केवळ आकलनातूनच येऊ शकते. केतकर हे अशा आकलनाचा धो धो वाहणारा धबधबा आहे. त्यांच्या सहवासात या धबधब्याचे उडत राहणारे तुषार पत्रकार म्हणून एखाद्यासाठी मोठी मिळकत असतात.

लोकरंग या पुरवणीचे संपादन करत असताना मी आणि शुभदा चौकर आम्ही दर आठवड्याला प्लॅनिंग करत असू. ते प्लॅनिंग घेऊन केतकरांकडे चर्चेला जात असू, दर आठवड्याला तासभर होणारी ती चर्चा आम्हाला संदर्भश्रीमंत करत असे. लेखासाठी आम्ही एखादा विषय सांगितला तर त्या विषयाचे इतके पैलू ते आमच्या लक्षात आणून देत की त्या लेखात कुठले मुद्दे आले पाहिजेत, याचे एक सविस्तर, स्पष्ट असे चित्र आमच्या डोळ्यांपुढे उभे राही. ज्याला लेख लिहायला सांगायचे आहे, त्याच्याशी बोलताना त्याचा आम्हाला उपयोग होईच, शिवाय आमच्याही ज्ञानात भर पडे.


**कुमार केतकर आणि श्रीकांत बोजेवार एका निवांत क्षणी**

त्यांच्या व्यासंगाचा आवाका एवढा जबरदस्त आहे की आपण एखाद्याला ज्या विषयातले तज्ज्ञ समजतो, त्याच्याहूनही त्या विषयाची अधिक माहिती केतकरांना असते. याचा प्रत्यय आम्हाला आम्हाला अनेकदा आला आहे. केतकरांनी चित्रपटांविषयी फार लिखाण केलेले मी तरी वाचलेले नाही. परंतु उपजत औत्स्क्याने ते एखाद्या नव्या चित्रपटाविषयी विचारत. मग त्या चित्रपटाच्या निमित्ताने सुरू झालेली चर्चा पुढे एखाद्या आंतरराष्ट्रीय चित्रपटाकडे वळली की मी केवळ श्रवणभक्ती करत असे. कारण ते जे सांगत ते कुठेही वाचायला मिळणे अशक्य असते.

'कायद्याचे बोला' हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हाची गोष्ट. चंदूने (चंद्रकांत कुळकर्णी) केलेला चित्रपट म्हणून केतकरांनी उत्सुकतेने विचारले. मलाही चित्रपट आवडला होता, त्यावर थोडे बोलणे झाले. कोर्ट आणि खटला इथून चर्चा ट्रिगर होऊन पुढे ती गेली 'जजमेंट अट न्युरेम्बर्ग' या चित्रपटाकडे. नाझींनी केलेल्या अत्याचारात सक्रिय सहभागाचा आरोप असलेल्या चार

न्यायाधीशांची चौकशी होते, त्यावर हा चित्रपट आधारलेला होता. केतकरांनी केवळ शब्दांमधून प्रत्येक दृश्यासह तो डोळ्यांपुढे उभा केला. प्रत्यक्ष चित्रपट पाहूनही मला तो जेवढा कळला नसता तेवढा त्या तासाभरात कळला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी मला 'जजमेंट अट न्युरेम्बर्ग'ची त्यांच्याकडे असलेली पटकथाही वाचायला दिली.

अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या काळात घडलेल्या कु किंवा सुप्रसिद्ध अशा वॉटरगेट प्रकरणावर आधारित 'ऑल द प्रेसिडेन्ट्स मेन' या चित्रपटाचा विषय एकदा आमच्या संपादकीय बैठकीत निघाला. प्रत्येक पत्रकाराने तो पाहिलाच पाहिजे, असे ते म्हणाले. आमच्यातील काहींनी तो पाहिला होता, काहींनी पाहिलेला नव्हता. केतकरांनी लगेचच मिनी थिएटरमध्ये त्या चित्रपटाचा विशेष खेळ आयोजित करून ऑफिसधील आणि बाहेरच्याही शंभरेक पत्रकारांना तो दाखवला.

केतकर हे मुख्यत: राजकीय भाष्यकार म्हणूनच लोकांना माहीत आहेत. शरद पवार जसे २४ तास राजकारणी असतात तसे केतकर २४ तास राजकीय भाष्यकार-पत्रकार आहेत, हे खरेच आहे. परंतु केतकरांचा व्यासंग पाहता त्यांच्या दिवसाचे तास बहुधा अधिक असावेत असे वाटते. नारायण सुर्वे यांचे निधन झाले त्याच आठवड्यात केतकरांची हार्ट सर्जरी झाली होती. ते एका विश्रामगृहात आराम करत होते. त्याच ठिकाणी हाताशी संदर्भासाठी एकही पुस्तक नसताना केतकरांनी केवळ तासाभरात सुर्व्यांवर एकटाकी अग्रलेख लिहिला, त्यात हजार शब्दांत त्यांनी 'सर्व सुर्वे' डोळ्यांपुढे उभे केले होते.

त्यांचे शेकडो मित्र आहेत. त्यात अनेक विद्यार्थीही आहेत. मात्र त्यातील अनेकांचे अभ्यासाचे, स्वारस्याचे विषय लक्षात ठेवून ते त्यांच्यासाठी पुस्तके आणतात, एखाद्याच्या आवडीच्या विषयावर कुठे काही वाचले तर त्याला ते लगेचच फॉरवर्ड करतात.

संपादकांची थट्टामस्करी आणि तीही त्यांच्याच वृत्तपत्रातून करण्याचे धाडस मी एकदा केले होते, ते त्यांच्या या दिलदार स्वभावाची खात्री असल्यानेच. संजीव खांडेकर यांचा 'सर्च इंजिन' नावाचा एक कवितासंग्रह आहे, त्याची प्रस्तावना केतकरांची आहे. तो संग्रह प्रकाशित झाला तेव्हा 'सर्च इंजिन' हा शब्दही आपल्याकडे फार कमी लोकांच्या ओळखीचा असावा. संजीवच्या कविता सर्वसामान्यांना कळणे तसे कठीणच, मलाही त्या वाचून कळल्या नव्हत्या. मात्र केतकरांनी प्रस्तावनेत त्यातील एकेक कविता उलगडून सांगितली होती. 'ही प्रस्तावना वाचून केतकरांच्या दारात नवकवींची रांग लागली आणि ते त्यांना, आम्हाला आमच्या कविता समजावून सांगा, असा आग्रह करू लागले' असे मी तेव्हा 'दोन फुल एक हाफ'मध्ये लिहिले होते आणि ते वाचून केतकरांनी (आणि अर्थात नंतर संजीवनेही) त्याला खळाळून दाद दिली होती.

केतकर 'लोकसत्ता'चे संपादक असतानाच, २००९ साली 'दोन फुल, एक हाफ'ला दहा वर्षे पूर्ण झाली. 'याबद्दल तुला काय गिफ्ट देऊ?' असे त्यांनी विचारले तेव्हा मी म्हणालो, 'तुम्ही, टिकेकर आणि मी, आपण एकत्र जेवायला जाऊ या कुठेतरी.' या दोघांमधील वैचारिक-व्यावसायिक वाद, अबोला याविषयी आम्ही बरेच ऐकून होतो. परंतु केतकरांनी दुसऱ्याच क्षणी होकार दिला आणि 'अरुणला राजी करण्याची जबाबदारी मात्र तुझी', असे सांगून टाकले. पुढे टिकेकर कसे राजी झाले आणि या दोघांमधील 'आइस ब्रेक' करण्याची जबाबदारी दिनकर गांगल यांच्याकडे येऊन आम्ही चौघे अखेर दादरला प्रीतममध्ये कसे भेटलो हा मोठा किस्सा आहे! तेव्हा मी फक्त बीअर प्यायचो, परंतु टिकेकर समोर असताना मला बीअर पिणेही प्रशस्त वाटत नव्हते. मात्र 'तुझ्या सदराचे नावच 'दोन फुल एक हाफ' असताना तुला व्हिस्कीचे किमान अडीच पेग घेतलेच पाहिजेत, अरुणला काय घाबरतोस..' असे म्हणत त्यांनी माझा पेग भरला. त्या दिवशी मी प्रथमच व्हिस्कीची चव घेतली. पुढे व्हिस्कीचे अनेक ब्रँड्स, त्यांचे मूळ आणि लज्जत याविषयीची माहिती ऐकत केतकरांसोबत अनेक गप्पाष्टके रंगली. त्यांचे या विषयाचे ज्ञानही अफाट आहे. कधी राज ठाकरे यांच्या घरी, कधी श्रीकांत वाड यांच्या घरी, कधी कुमार नवाथे यांच्या पार्ल्यातील घरी (जिथे आता राजीव खांडेकर राहतात), तर कधी नवाथेंच्याच खंडाळ्यातील बंगल्यावर..अशा केतकरांच्या मैफिलीत मी सहभागी झालो आहे.

साहित्य संमेलनाध्यक्ष निवडणुकीच्या धामधुमीत एकदा विठ्ठल वाघ हे अरुण साधू यांच्या घरी भेटायला गेले होते. त्या भेटीविषयी लिहिताना मी एक वाक्य लिहिले होते- 'या भेटीत विठ्ठल वाघ साधूंच्या घरी सोफ्यावर असे ऐसपैस बसले होते की जणू स्वतःच्याच घरी बसले आहेत आणि साधू स्वतःच्याच घरात असे बसले होते की जणू दुसऱ्याच्या घरी बसलेले आहेत.' या स्वभावनिरीक्षणावर केतकर बेहद्द खुश झाले आणि त्यांनी मला डेव्ह बेरीचे 'डेव्ह बेरी इज नॉट टेकिंग धिस सिटिंग डाऊन' हे पुस्तक स्वाक्षरीसह भेट दिले. दिनकर गांगल, अरुण साधू, अशोक जैन, कुमार नवाथे, श्रीकांत वाड अशा अनेक ज्येष्ठांशी माझे सख्य झाले ते केतकरांमुळेच.

अजित पवार यांनी आर.आर पाटलांना तंबाखू न खाण्याचा जाहीर सल्ला दिला होता. त्यावर अग्रलेख लिहायचे ठरले, तेव्हा केतकर मला म्हणाले, 'या विषयावर तंबी स्टाईल अग्रलेख हवा, तूच लिही.' मी तो लिहिला, त्याचे शीर्षक होते, 'श्रीहरी, मारु नको पिचकारी.' त्या अग्रलेखावर केतकरांना सबंध दिवसभर फोन येत राहिले आणि त्या प्रत्येकाला ते न थकता 'श्रीकांतने लिहिला आहे' हे सांगत राहिले. असा संपादक मिळायला भाग्य लागते. केतकरांची स्वतःची लिहिण्याची क्षमता अफाट आहे. एकदा ते 'लोकरंग' पुरवणीचा लेख अर्धवट टाकून टीव्हीवरील एका चर्चेत सहभागी व्हायला गेले होते. त्याच दिवशी पुरवणीची पाने छपाईला जाणार होती. तो अर्धवट राहिलेला लेख केतकरांनी चक्क लाइव्ह चर्चेत इतरांचे बोलणे सुरू असताना, त्याच्या नोट्स काढत असल्याचे भासवून पूर्ण केला होता आणि तरी त्या लेखात एकाही शब्दाची खाडाखोड नव्हती किंवा कोणत्या संदर्भाची लिंकही तुटलेली नव्हती. असा हा भन्नाट माणूस आहे.

प्रसंगी केतकर संपादक म्हणून आपल्या सहकाऱ्याच्या

पाठीशी कसे भक्कमपणे उभे राहतात याचाही अनुभव मी घेतला आहे. मी अमोल पालेकर दिग्दर्शित 'पहेली' या चित्रपटाच्या समीक्षणात चित्रपटावर टीका केली होती. पालेकरांना ती रुचली किंवा पटली नाही, त्यांनी केतकरांना फोन केला व 'श्रीकांतला चित्रपट कळला नाही, मी दुसरे एक परीक्षण पाठवतो ते लोकसत्तात प्रसिद्ध कर' अशा अर्थाची काहीतरी गळ घातली. केतकर त्यांना म्हणाले, 'श्रीकांत आमच्या वृत्तपत्राचा अधिकृत समीक्षक आहे, त्याने लिहिले ते आमच्यासाठी फायनल आहे. त्याच्या टीकेचा प्रतिवाद करायचा असेल तर तो पाठव, मी प्रसिद्ध करतो. मात्र चित्रपटाची बाजू मांडणारा आणखी कोणाचा लेख मी आताच घेणार नाही.'

लोकसत्ताचे कार्यालय नरीमन पॉइंटमधून नवी मुंबईत शिफ्ट करायचे ठरले होते. नवी मुंबईतले कार्यालय तयार होण्यास थोडा अवकाश होता आणि शिफ्टिंगची तारीख मात्र ठरली होती. दरम्यानच्या काळात, तोवर लोकसत्ताच्या कर्मचाऱ्यांनी नवी मुंबईत जेथे अंकाची छपाई होते तिथे बसावे असे ठरले. तेथे बसण्याची व्यवस्था काय आहे, छपाईच्या आवाजात काम करणे शक्य होईल का ते केतकर स्वतः पाहून आले. त्यानंतर व्यवस्थापनातील व्यक्तीला त्यांनी फोन करून, 'वी आर नॉट मूव्हिंग टू द कॉन्सन्ट्रेशन कॅम्प' असे ज्या ठाम स्वरांत सांगितले, ते आठवले की माझ्या अंगावर अजूनही काटा येतो. त्यांच्या या एका वाक्याने शिफ्टिंग पुढे ढकलले गेले.

अनेकांशी त्यांची मैत्री असली तरीही त्यांच्यासोबत ड्युटी म्हणून मोठा काळ घालवलेल्या दोघांविषयी वेगळे लिहावे लागेल. विकास नाईक हा केतकरांचा गेल्या अनेक वर्षांचा साहाय्यक. तो त्यांच्या कुटुंबातलाच एक झालेला आहे. विकासशी असलेले केतकरांचे नातेही धमाल आहे. केतकरांचा मोबाइल बहुधा विकासकडेच असतो. एक दृश्य आम्ही अनेकदा पाहिलेले आहे. आमच्या संपादकीय मीटिंग सुरू असताना विकास हाती मोबाइल धरून आत येत असे. अर्थात कोणाचा तरी फोन आलेला असे. केतकर एखाद्या विषयावर बोलण्यात रंगून गेलेले असताना विकास असा आत आला की केतकर अत्यंत त्रासिक चेहऱ्याने 'कोण आहे?, मी नाही बोलणार आता..' असे निक्षून सांगत. त्यांच्या त्या नकाराचा परिणाम विकासवर काहीही होत नसे, तो पुढे येऊन सरळ त्यांच्या हातात फोन देऊन, बोला..असे म्हणत असे, मग केतकर कोणाचा फोन आहे ते पाहण्यासाठी स्क्रीनकडे बघत आणि विकासच्या 'आज्ञेचे' पालन चुपचाप करत. विकास नेहमीच्या सवयीने खालचे-वरचे ओठ आत दुमडून तेव्हा शांतपणे उभा असे. विकासला केतकरांना कोणाशी बोलायचे असते आणि कोणाला टाळायचे असते हे केतकरांपेक्षाही जास्त कळते. केतकरांच्या फोनवरील गप्पा ऐकून ऐकून त्यांचा ड्रायव्हर सादत हा एवढा ज्ञानी झाला आहे की तो अरब-ज्यू संबंधांवर पंधरा मिनिटे बोलू शकेल. अनेकदा तर तो केतकरांनाही आंतरराष्ट्रीय राजकारणातील डावपेच समजावून सांगतो आणि केतकरही ते प्रेमाने ऐकून घेतात. केतकरांवर निरतिशय प्रेम आणि श्रद्धा असलेल्या या दोघांशी आमचेही तेवढेच मैत्र झाले, ते त्यामुळेच.

केतकर आणि शारदा साठे यांच्यातील पती-पत्नीचे नाते तर कुणाही दांपत्याने हेवा करावा असे आहे. केतकरांचा उल्लेख काहींनी चुकून 'मिस्टर साठे' असा केल्याचा विनोद स्वतः केतकर मस्त रंगवून सांगतात. काहींनी तर दोघे 'लिव्ह इन'मध्ये असल्याचाही संशय व्यक्त केला आहे. केतकरांच्या घरी त्यांच्याशी गप्पा सुरू असताना बाजूला शारदाबाई अनेकदा कुठल्या तरी पुस्तकाचा अनुवाद करत शांत बसलेल्या असतात आणि मध्येच त्या केतकरांना सहजपणे तिरकस टोले मारतात. केतकरांची एक सर्जरी झाली होती, तेव्हा मी त्यांच्या घरी गप्पा मारायला गेलो होतो. गप्पा मारता मारता ते 'पुढच्या आठवड्यात गोव्याला जायचं आहे' असे काहीतरी म्हणाले. 'आताच सर्जरी झाली, कशाला जाता तुम्ही, रद्द करा' असे मी काळजीने म्हणालो. तोवर शांतपणे लिहीत असलेल्या शारदाबाई माझ्याकडे पाहत म्हणाल्या, 'आणि त्याला सांग फ्लाईटने जाऊ नकोस गोव्याला, बसनंच जा. सर्जरी काय पुन्हा एकदा करता येईल, भाषण थोडीच परत करता येतं?' असे टोले कधी ऐकायचे आणि कधी कानाआड करायचे हे केतकरांनी मनात ठरवलेले असते.

असा संपादक दुर्मिळ, असा माणूस त्याहून दुर्मिळ. केतकरांचा मेल आयडी काही वर्षांपूर्वी हॉटमेल होता. त्यांना २०१४ नंतर जेव्हा शिव्या घालणाऱ्या मेल्सची संख्या वाढली तेव्हा ते एकदा गमतीने म्हणाले होते, 'माझा हॉटमेल नाही, हेटमेल आहे.' एका अग्रलेखावरील प्रतिक्रिया म्हणून त्यांच्या घरावर हल्ला झाला तेव्हा किंवा परभणीला ब्राह्मणांवरील टीका सहन न होऊन त्यांच्या अंगावर जमाव चालून गेला त्यानंतरही ते नेहमीसारखेच शांत आणि ठाम होते. त्यांची मते पटतील न पटतील- ती सर्वांना पटावी असा त्यांचा आग्रहही नसतो- त्यांची विद्वत्ता, अभ्यास, माणूस म्हणून असलेला मोठेपणा तुम्हाला त्यांच्या स्नेहात बांधून ठेवतो. ज्यांना ते मदत करतात, त्यातली अनेक माणसे त्यांच्यावरच उलटतात, असा अनुभव त्यांनी वारंवार घेतलेला आहे. काही चुकीच्या माणसांना प्रसिद्धी देऊन आपण मोठे केले हेही ते खासगीत बोलून दाखवतात. परंतु तरीही ते कोणाहीविषयी मनात कटुता ठेवत नाहीत.

'एक हजाराची नोट' या चित्रपटाच्या निमित्ताने शेखर, मृणाल साठे आणि श्रीहरी साठे यांच्याशी ऋणानुबंध निर्माण झाले, ते केतकरांमुळेच. माझ्या स्वतःच्या राजकीय आकलनात केतकरांच्या सहवासामुळे भर पडली. 'दोन फुल एक हाफ' आणि 'दीडदमडी' या माझ्या दोन्ही पुस्तकसंचांना त्यांचे लेखी आशीर्वाद लाभले, ही माझी मोठीच कमाई आहे. केतकरांचा उल्लेख आम्ही अनेकदा 'केके' असा करतो. आता केकेंच्या पंचाहत्तरीनिमित्त त्यांच्यासोबत गप्पांचा आणि 'दोन फुल एक हाफ'चा योग यावा आणि हा सिलसिला कायम राहवा हीच इच्छा. 'आपण केतकरांच्या मेलिंग लिस्टवर आहोत' ही भावनासुद्धा 'आपण मोठी इस्टेट जमवली' या वाक्याच्या तोलामोलाची आहे, कदाचित कणभर जास्तच मोलाची.

**- श्रीकांत बोजेवार**
भ्रमणध्वनी : ९८९२४१९२६७
shrikant.bojewar@gmail.com

# २५ डिसेंबर, 'ग्रंथाली'चा ४६ वा वाचकदिन

मुंबई, ता. २८ : 'ग्रंथाली'चा ४६ वा वाचकदिन दादर-माटुंगा कल्चरल सेंटर येथे संपन्न झाला. या वाचकदिनी कवी किशोर कदम यांच्या हस्ते 'नाटक - एक मुक्त चिंतन' (रवींद्र लाखे) आणि 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०२०' (सुधीर थत्ते/नंदिनी थत्ते), कलर मराठी वाहिनीचे बिझनेस हेड दीपक राजाध्यक्ष यांच्या हस्ते 'माध्यमयात्रेतील माणसं' (रविराज गंधे), 'टपालकी' (सॅबी परेरा), विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते 'आस' (अपर्णा महाजन) आणि 'स्वरमंजूषा' (योजना शिवानंद) अशा सहा पुस्तकांचे प्रकाशनं करण्यात आले. प्रकाशनसोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ.लतिका भानुशाली, मेधा आलकरी व डॉ. मृण्मयी भजक यांनी केले.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मनोगत व्यक्त करताना कोरोनाकाळातील सुरुवातीच्या आठवणी उद्धृत केल्या आणि सद्यस्थितीचा आढावा घेतला. साहित्यामधून आपण उमेदीने जगतोच आहोत परंतु परत एकदा माणूसपणाचा चष्मा पुसून बसावं आणि आपण जिवंत आहोत याबद्दल देवाचे आभार मानावेत अशा भावना मनात येतात; असे त्या म्हणाल्या.

कवी किशोर कदम यांनी सत्यदेव दुबे यांच्या आठवणींना उजळा दिला. रवींद्र लाखे यांचे 'नाटक - एक मुक्त चिंतन' हे पुस्तक नव्या नाट्यकर्मींसाठी नसून नाटकाच्या क्षेत्रात बराच काळ घालवलेल्या अनुभवी कलावंतासाठी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दीपक राजाध्यक्ष, यांनी माध्यमाला दोष न देता त्याच्यामागे जे कारण आहे ते समजून घेऊया, असे आग्रही प्रतिपादन केले. माध्यमांना आर्थिक गणित सांभाळायचे असल्याने रंजक मालिका आणि विचारप्रवृत्त करणाऱ्या आशयघन मालिका यांचा ताळमेळ साधावा लागतो, अशी रोकठोक भूमिका त्यांनी मांडली. सिनेमा नाटकांचं डॉक्युमेंटेशन होतं तसं टीव्हीवरच्या कार्यक्रमांचं होत नाही ते 'माध्यमयात्रेतील माणसं' या पुस्तकाद्वारे होत आहे, असं ते म्हणाले.


किरण येले यांच्या 'तिसरा डुळा' या कथासंग्रहाला महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आला.

१ मे २०२० रोजी महाराष्ट्राचा हीरकमहोत्सवी वर्षाची सांगता झाली. या हीरकमहोत्सवानिमित्त 'ग्रंथाली'ने तीन महत्त्वाचे खंड प्रकाशित करण्याचे योजिले आहे. १. मोहरा महाराष्ट्राचा - संपादन रमेश अंधारे, २. मराठी राज्यातील मराठीचे वर्तमान - संपादन डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, ३. विज्ञान-तंत्रज्ञानात हीरकमहोत्सवी महाराष्ट्र - संपादक विवेक पाटकर आणि हेमचंद्र प्रधान. कोरोनाच्या वातावरणामुळे ही पुस्तके प्रकाशित होऊ शकली नाहीत. ही पुस्तके फेब्रुवारीत प्रकाशित होतील. या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त गाणे महाराष्ट्रा 'साठी' हा सांगीतिक कार्यक्रम आयोजित करण्याबद्दलची भूमिका सुदेश हिंगलासपूरकर यांनी स्पष्ट केली. त्यानंतर अरुण जोशी लिखित गाणे महाराष्ट्रा 'साठी' हा सांगीतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. कौशल इनामदार दिग्दर्शित या कार्यक्रमात महाराष्ट्राचे गुणगान करणारी बहारदार गाणी जयदीप बडगावकर, ऋचा सोमण-पाध्ये आणि कौशल इनामदार यांनी सादर केली. त्यांना तबल्यावर अर्चिस लेले यांनी आणि हार्मोनियमवर अमित पाध्ये यांनी साथ दिली. ध्वनिसंयोजन विराज भोसले यांचे होते. कार्यक्रमाचे निवेदन अस्मिता पांडे यांनी केले.

ग्रंथालीतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात आलेल्या अभिवाचनस्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रच नव्हे तर गुजरात, दुबई, अबुधाबी, लॉस एंजेलिस, सिएटल, कॅलिफोर्निया अशा जगभरातून तब्बल १५६ संघांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला. स्पर्धेचे आयोजन श्रीनिवास नार्वेकर व अस्मिता पांडे यांनी केले. राजीव श्रीखंडे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. महाविद्यालयीन गटात, विधी, नौपाडा-ठाणे यांना प्रथम पारितोषिक जाहीर झाले व द्वितीय पारितोषिकाचे मानकरी रामनिवास रुईया कनिष्ठ महाविद्यालय ठरले. खुल्या गटात व्यासपीठ- मुंबई यांना प्रथम तर द्वितीय पारितोषिक अमोघ पेंडसे व श्रेयस वैद्य, ठाणे यांना प्राप्त झाले. तृतीय पारितोषिक नाट्यकुल, मावळ-पुणे व संवादिनी, शिरुर व केदार जोशी व सई मराठे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. खुला व महाविद्यालय प्रथम विजेत्या गटास चंद्रकांत मेहेंदळे यांच्या नावे पारितोषिके देण्यात आली; तर खुला व महाविद्यालय द्वितीय विजेत्या गटास डॉ. उत्कर्षा बिर्जे यांच्या नावे पारितोषिके देण्यात आली. ही स्पर्धा 'ग्रंथाली' आणि 'व्हिजन व्हॉईस एन ॲक्ट'यांच्या संयुक्तविद्यमाने घेण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून रवींद्र ढवळे, अभिजित झुंजारराव, मेधा आलकरी, शुभा गोडबोले आणि अमृता मोडक यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमास दादर-माटुंगा कल्चरल सेंटर, सारस्वत बँक, स्टोरीटेल, एबीपी माझा, झी मराठी, राज्य मराठी विकास संस्था, युनियन बँक, राजू कदम यांचे सहकार्य लाभले.

हा कार्यक्रम जगभरातील वाचकांना पाहण्यासाठी ग्रंथालीच्या granthali watch या फेसबूक पेज व पोर्टलवर उपलब्ध आहे.

# काही दुर्मिळ क्षण




केतकर परिवार – कुंदा, आई, मीना आणि कुमार



के. डी. नाईक आणि कुमार केतकर – ग्रंथालीचे आरंभीचे दिवस



दिनकर गांगल आणि कुमार केतकर



कुमार केतकर, मा. सुशीलकुमार शिंदे आणि अरुण साधू



कुमार केतकर आणि विजया राजाध्यक्ष







'सत्यचित्र'चे दोन दुर्मिळ अंक



कुमार केतकर, शेखर साठे



सुनील देशमुख यांच्या घरातील
एका खास सदस्यसह...





तात्काळ कर्ज मिळवा आकर्षक अटी आणि किमान कागदपत्रांसह

Union Home

- कर्जासाठी अर्जाची ऑनलाईन सुविधा
- दररोज घटणाऱ्या शिल्लकीवर व्याज आकारणी

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
आन्ध्रा Andhra कार्पोरेशन Corporation

*अटी व शर्ती लागू.

हेल्पलाइन नं.: 1800 208 2244 / 1800 425 1515 / 1800 425 3555 | www.unionbankofindia.co.in
@unionbankofindia @UnionBankTweets UnionBankInsta YouTube UnionBankofIndiaUtube @unionbankofindia



जिथे मनं जुळतात
तिथे आनंद नांदतो
Dabur Anmol Jasmine
GARNIER Black Naturals
सह-प्रस्तुत
येऊ कशी तशी मी नांदायला
Co-powered by
magic HANDWASH
Special Partners
whisper
Cadbury Dairy Milk
marathi matrimony
Jewellery Partner
पु. ना. गाडगीळ आणि सन्स
सोम-शनि
रात्री 8 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Co-Presenting Sponsors:
Co-powered By:
Special Partners:
Jewellery Partner:
Streaming Partner:
ZEE5

# वाचकदिनी पुस्तक प्रकाशन



**डॉ. नीलम गोऱ्हे**
उपसभापती
विधानपरिषद





**अपर्णा महाजन**





**योजना शिवानंद**



**किशोर कदम (सौमित्र)**
कवी-अभिनेता





**रवीन्द्र लाखे**





**सॅबी परेरा**



**दीपक राजाध्यक्ष**
बिझनेस हेड
कलर्स वाहिनी







**रविराज गंधे**



**गाणे महाराष्ट्र'साठी' सांगीतिक कार्यक्रम. सादरकर्ते : कौशल इनामदार व कलावंत**



**'तिसरा डुळा' या ग्रंथाली प्रकाशित कथासंग्रहास 'महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार प्राप्त झाल्यानिमित्त लेखक किरण येले यांचा डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.**

# सहज नीटू जाला...



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**चिन्मय बोरकर**

माझी कुमार केतकरांशी ओळख झाली, ती 'महाराष्ट्र टाइम्स'मुळे. मी तेव्हा पार्ले टिळक विद्यालयात सातवीला होतो. स्कॉलरशिप परीक्षेला बसायचे होते. माध्यम अर्थात मराठी. साल १९९३. मराठी पेपरला कल्पनाविस्तार असत. 'सुख पहाता जवापाडे दुःख पर्वताएवढे', 'आता विश्वात्मके देवे' वगैरे सुभाषितं, ओव्या वगैरे असत. मला ते जमत नसे. तेव्हा माझ्या बाबांनी मला 'महाराष्ट्र टाइम्स'चे अग्रलेख वाचायला लावले. आमच्या घरात 'म.टा.', 'नवाकाळ' ही वृत्तपत्रे येत. 'लोकसत्ता'सुद्धा शेजारीपाजारी मिळे. 'मटा'चे 'अग्रलेख' (हा शब्द नवीन होता), 'मटा'चे 'संपादक (हा आणखी एक नवीन शब्द) लिहीत, पण त्यावर त्यांचे नाव नसे. नंतर काही दिवसांनी 'मटा'च्या शेवटच्या पानावर संपादक गोविंद तळवलकर, कार्यकारी संपादक कुमार केतकर ही ओळ सापडली. शेवटी स्कॉलरशिप परीक्षा संपली. मी राज्यात १९वा आलो. पण 'मटा' आणि 'मटा'चे अग्रलेख वाचायची सवय तेव्हापासून जडली.

तो दंगलीचा काळ होता, आणि बाबरी मशीद उद्ध्वस्त होऊन काहीच आठवडे झाले होते. आजूबाजूला भयाचे वातावरण होते व गल्लोगल्ली आता कोणत्याही क्षणी आपल्यावर हल्ला होणार अशी भीती सतत घातली जात होती. बाहेरच्या एकूणच वातावरणातून ती अधिकाधिक पसरवली जात होती. आम्ही मुलेसुद्धा हातात खेळातील तलवारी, धनुष्यबाण घेऊन गच्चीवर गस्त घालीत असू. अर्थातच शाळेला सुट्टी होती व रस्त्यावर वा सोसायट्यांमध्ये खेळताही फारसे येत नसे. तो वेळ मी माझे मराठी सुधारण्यात व सर्व वर्तमानपत्रे वाचण्यात घालवावा असे माझ्या आई-वडिलांना वाटे. कालांतराने दंगल ओसरली, नंतर मुंबईत मोठे बॉम्बस्फोट झाले आणि भीतीचे काहूर मनातून गेले नाही; अग्रलेख वाचायची सवय लागली होती. त्यात 'मटा'चे अग्रलेख वेगळे असत. एक तर 'मटा'च्या अग्रलेखांची भाषा वेगळी आणि सर्वांना समजेल अशी होती.

*पंडित बिरजू महाराज यांनी 'रोमिओ आणि ज्युलिएट' या शेक्सपीयरच्या अमर नाट्यकृतीचा कथक अविष्कार सादर केल्यावर केतकरांनी त्यांचे 'रोमांचकारी' असे वर्णन केले होते आणि अशा दृष्टिकोनापासून आपण अजून खूप मागे आहोत, अशी खंत व्यक्त केली होती.*

त्यावेळेचा मटा हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक मापदंड होता व मध्यमवर्गीयांच्या तथाकथित बुद्धिमत्तेचे गंडस्थळ. कुमार केतकर हे त्याचे अनभिषिक्त सम्राट होते. मटाला एलिट स्थान प्राप्त झाले होते. (अर्थात एवढा विचार करायची पात्रता त्यावेळी माझ्यात

नव्हती.) साहजिकच पार्ल्यात 'मटा'च पॉप्युलर होता. त्यावेळचे मटाचे प्रत्येक पान हे संकल्पना, सुसूत्रता व एका अमूर्त समग्रतेने भरलेले असे. त्यातील अदृश्य हात हा संपादकांचा असतो, हे हळूहळू लक्षात येऊ लागले होते. कोणताही नवीन वैज्ञानिक शोध असो वा सांस्कृतिक घडामोड, एखादी वैश्विक घटना असो वा कलासाहसाचा आविष्कार, त्याला 'मटा'च्या 'बॉटम लीड'मध्ये रंगीत स्वरूपात व आकर्षक मथळ्यासह स्थान मिळत असे. त्याचबरोबर अग्रलेखात भाष्यही. मी ते सर्व वर्गात हिरीरीने वाचूनसुद्धा दाखवत असे! अग्रलेखातील वा विचारातील मांडणी व त्याचा सर्वसमावेशक वैश्विक दृष्टिकोन कोणीही सहजासहजी नाकारू शकत नसे.

कुमार केतकर दूरदर्शनवरसुद्धा झळकू लागले. त्यात ते जोशपूर्ण बोलताना, विनोद करताना आणि चक्क हसताना दिसत. शिवाय निरनिराळ्या कार्यक्रमांत त्यांची भाषणं देखील होत – विशेषतः मॅजेस्टिक गप्पांसारखे कार्यक्रम. त्यामुळे त्यांची पार्ल्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांतून उपस्थिती वाढू लागली. केतकरांचे वाचन, व्यासंग आणि विद्वत्ता याने पार्लेच नव्हे तर समस्त मराठी मध्यमवर्गावर गारुड केले. कुमार केतकर कम्युनिस्ट असले तरी 'ओपन' आहेत, सर्वांनाा 'स्पेस देणारे' उदारमतवादी आहेत, चतुरस्र संपादक आहेत, राजकारणी असूनही रसिक आहेत, कम्युनिस्ट असूनही लोकशाहीवादी आहेत हा विचार हळूहळू दृढ झाला. कुमार केतकरांच्या लिखाणाने आणि भाषणांनी विज्ञान, तंत्रज्ञान, अध्यात्म, तत्त्वज्ञान, वैद्यक व्यवसाय, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, यांतील नव्हे तर नाटक, चित्रपट, कलाक्षेत्रातील प्रत्येक कृतिशील माणसाला त्यांनी 'मटा'मध्ये जोडून घेतले. कामगार चळवळ, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, पर्यावरणवादी चळवळींना त्यांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. याचे कारण सर्व मानवी व्यवहाराचे त्यांना कुतुहूल होते आणि ते त्याचा शोध घेत. ते त्या शोधप्रवासात वाचकाला त्यांच्याबरोबर घेऊन जात. त्यामुळे मला केतकरांच्या लिखाणाच्या वाचनाने जगाचे भान येऊ लागले. त्यांनी अनेक संशोधनात्मक लेखमालिका सुरू केल्या. 'मटा'मधून त्यांनी सुरू केलेल्या 'जात पंचायत' या मालिकेत फक्त जातींचे वा त्यातील वैशिष्ट्यांचे चित्रण नव्हते. तर तो एक जातिव्यवस्थेचा, परस्पर मानवी संबंधांचा व त्यातील गुंतागुंतीचा शोध घेणारा मानववंशशास्त्रीय प्रयत्न होता. त्या संदर्भात त्यांनी 'concept of equality and caste system' असा शोधनिबंधस्वरूप लेख इतरत्र प्रसिद्ध केला होता. 'जात पंचायत'नंतर आलेली 'बदलती नाती' ही लेखमालिकासुद्धा अशाच प्रकारे विलक्षण होती १९९०च्या दशकात नात्यांमध्ये जी उलथापालथ होऊ लागली होती व एकूणच सांस्कृतिक व सामाजिक वातावरण बदलू लागले होते, त्याचे चित्रण त्यात होते व आजही त्यातले बरेचसे लागू आहे. तो वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पत्रकारितेचा एक अभ्यासपूर्ण प्रयोग होता. तसे स्वरूप मटाच्या इतर पानांमध्येही झळकू लागले होते. मटाचे शेवटचे पान हे त्या दृष्टीने विशेष असे. तो प्रदीर्घ स्टोरीज्‌चा खजाना होता – कधी चित्रपट परीक्षणाद्वारे वा कधी स्त्रियांवरच्या प्रश्नाद्वारे! त्यातून नवनवीन तरुण लेखक-पत्रकार महाराष्ट्राला मिळत गेले; त्यांची एक फौजच केतकरांनी उभी केली. केवळ पत्रकारांची नव्हे, तर वाचकांचीसुद्धा. आपल्या लेखणीबरोबरच गावोगावी केलेल्या भाषण-संवादातून हा संपादक आपल्यातला आहे आणि आपण त्याला भेटू शकतो, त्याच्याशी बोलू शकतो, त्यांच्याशी संवाद साधू शकतो असा विश्वास त्यांनी वाचकांमध्ये निर्माण केला. ते सारे मानवी सभ्यता, संस्कृती, राजकारण व तत्त्वज्ञान यांचे वाटसरू बनून गेले. आजही महाराष्ट्रभर गावोगावी त्यांना त्यांचे वाचक भेटत असतात. मानवी इतिहासाच्या वाटेत आपण केतकरांबरोबरचे पांथस्थ आहोत असा आत्मविश्वास व भान त्यांना केतकरांना भेटल्यावर येते; मी ते प्रत्यक्ष अनुभवले आहे.

बाबरी मशीद व त्यानंतरच्या भीषण दंगलीतून ९० चे दशक भराभर सरकले; त्यांनी संस्कृतीत, मूल्यात व राजकारणात आमूलाग्र बदल घडवले होते. राज्यात युतीचे सरकार १९९८ साली होते, तर केंद्रात एनडीएकृत वाजपेयींचे. मी शाळकरी असतानाच्या हिंस्रता आणि क्रौर्याच्या वातावरणाचा उल्लेख मी आधी केला आहे. त्या भीतीने मी मानसिक प्रश्नांनी घेरला होतो. इतरांचे मला माहीत नाही, पण मी सामाजिक, राजकीय भवतालातील अनेक प्रश्नांनी गांजलो होतो. अनेक प्रश्नांना माझ्याकडे उत्तरे नव्हती. तशी ती कोणाकडे असतील अशी माणसे माझ्या पाहण्यात नव्हती. अशा वेळी केतकर हीच एक आशा मला वाटली.

वाजपेयी सरकारने आल्या आल्या राष्ट्रवादाचा फुत्कार देत अणुस्फोटचाचण्या घडवल्या; व त्यावेळच्या भाजपा सरकारने बाहू सरसावत चीनला व पाकिस्तानला चिथावायला सुरुवात केली; त्यापाठोपाठ पाकिस्ताननेसुद्धा अणुस्फोटचाचण्या करून त्याला उत्तर दिले; त्या चाचण्यांनी वस्तुत: आपापल्या सुशिक्षित व सुसंस्कृत मध्यमवर्गाची नशा उतरवली होती; परंतु भारतीय उपखंड एका अस्वस्थ दशकाच्या किंबहुना पर्वाच्या उंबरठ्यावर आणून ठेवला गेला होता. त्यावेळेच्या विशेष संपादकीयांची शीर्षके खूप बोलकी आहेत– 'बुद्ध ढसा ढसा रडला!' 'बुद्ध हतबुद्ध झाला', 'अणुस्फोट-भान आणि स्वाभिमान' (विश्वामित्राचे जग या त्यांच्या पुस्तकात हे समाविष्ट आहेत.) त्यावेळेच्या परिस्थितीचे संपादकीय भाष्य खरे म्हणजे त्या दशकाच्या अस्वस्थ करणाऱ्या घटनांची सांगड घालते – ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यात आली आणि या बुद्धजयंतीला (१५ मे १९९८) अणुस्फोटचाचण्या घडवून आणल्या गेल्या. पहिली होती 'हिंदू अस्मिता' जिने देशाची मानसिक फाळणी घडवून आणली आणि दुसरा होता 'राष्ट्राभिमान' ज्यामुळे आपण असलेले मित्र गमावले आणि शत्रूंना अधिक सामर्थ्य प्राप्त करून दिले. बुद्ध ढसा ढसा रडला तो त्यामुळेच. 'विवेकाने वापरलेले ज्ञान' म्हणजे 'विज्ञान-मानवी संहाराचा वापर करणारे ज्ञान हे विज्ञान नव्हे'; असे आचार्य विनोबा भावे यांना उद्धृत करून लिहिलेला 'जय विज्ञान' हा अग्रलेख त्याच मालिकेतील. त्याच मालिकेत पुढे कुसुमाग्रजांची अणुस्फोट झाल्यावर बेचिराख झालेल्या या पृथ्वीच्या राखेतून उगवणाऱ्या अंकुराची साक्ष देणारी कविता

छापली गेली. संस्कृतीच्या राजकारणाने विकृत रूप घेतले होते. त्याचा आणखी एक पुरावा म्हणजे पुढे तीन वर्षांनंतर ११ सप्टेंबरच्या भीषण हल्ल्यानंतर अफगाणिस्तानच्या इस्लामिक मूलतत्ववाद्यांनी बुद्धाच्या प्राचीन मूर्ती उद्ध्वस्त केल्या होत्या!


माझी आणि त्यांची प्रत्यक्ष भेट त्याच काळात, १९९८ मध्ये झाली, 'मटा'च्या कार्यालयात. 'टाइम्स'च्या दगडी इमारतीला तेव्हा कडेकोट सिक्युरिटीची भिंत नसे. संपादक अग्रलेखात काहीही लिहीत असले, तरी व्यक्तिगत पातळीवर माणूसघाणे, दुटप्पी व मुजोर असू शकतात, असे मला अनेकांनी सांगितले होते. त्यामुळे माझ्या मनात प्रचंड धास्ती होती. शिवाय मी कोणतीही भेटीची वेळ त्यांच्याकडे मागितलेली नव्हती; माझ्याकडे भेटीचे विशेष कारणही नव्हते; परंतु तत्त्वज्ञान, इतिहास, विज्ञान व मानसशास्त्र... एवढा प्रचंड आवाका असणाऱ्या व त्यातून संपूर्ण वैश्विक विचार लेखणीतून व भाषणातून सूत्रबद्ध व सोप्या शैलीत मांडणाऱ्या एका माणसाला भेटण्याची मला तीव्र इच्छा होती. त्यातून त्यांच्या केबिनबाहेर मी बराच वेळ रेंगाळलो व शेवटी न भेटताच परत जाऊ लागलो, तेव्हा तेथील एका माणसाने मला म्हटले, ''तुला केतकरांना भेटायचे आहे का? जा, ते कोणालाही भेटतात,'' तरीही मी त्यांच्या केबिनसमोर बराच वेळ रेंगाळलो, तेव्हा काही वेळाने त्यांनीच मला हात दाखवून आत बोलावून घेतले. काय बोलावे व कशासाठी आला आहेस या औपचारिकतेला माझ्याकडे काही उत्तर नव्हते, तरीही संवाद केतकरांनीच सुरू केला व मी वाचलो! 'तू कुठून आलास' ह्या प्रश्नानंतरच्या त्यांच्या विलक्षण मोकळेपणाने जणू आमची वर्षानुवर्षांची ओळख आहे अशा सहजतेत ते बोलले व माझी भीड चेपली. मी त्यानंतर दहाच मिनिटांत बाहेर पडलो, परंतु लक्षात राहिली ती त्यांची सहजता – 'सहज नीटू जाला'सारखी. ते 'मैत्र' जुळले ते आजतागायत.

कुमार केतकर खूप हुशार आहेत. कुमार केतकरांची ज्ञानलालसा वादातीत आहे, कुमार केतकरांची बुद्धिमत्ता पराकोटीची कुशाग्र आहे, कुमार केतकरांची स्मरणशक्ती अचाट आहे, त्यांची विश्लेषण शक्ती अफाट आहे, त्यांचे भाषेवरचे प्रभुत्व श्रेष्ठ आहे अशा विशेषणांनी सरांच्या भोवती पंचारती ओवाळल्या जातात आणि स्तुतिसुमने उधळली जातात. कुमार केतकर म्हणजे आधुनिक ऋषीमुनीच म्हणून मांडले जाते. पण सर त्या रूढ अर्थाने स्कॉलर कधीच नव्हते. राजकारणात सर मार्क्सवादी असले तरी शैक्षणिक बाबतीत ते कधीच मार्क्सवादी नव्हते. त्यांचा 'क्लास' ठरलेला होता. माझ्यासारख्या अंगभूत नैपुण्य, कौशल्य, हुशारी नसलेल्या नगण्य माणसाशी नाते जोडणे त्यामुळेच सरांना शक्य होते असे मला वाटते. सर तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असतील, पत्रकार असतील, विद्वान असतील; पण त्यांची ज्ञाननिष्ठाच त्यांना राजकारणाकडे खेचून घेऊन आली आहे. सर खरेच ऋषीमुनी असतील तर ते निबिड अरण्यात जाऊन किंवा हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरावर जाऊन अज्ञातवासात आणि एकांतवासात साधना आणि तप करत राहिले असते. पण ते हेच सरांचे वैशिष्ट्य आहे. आपला उपयोग समाजाला होऊ देणे ही त्यांची प्रेरणा आहे. जी भूमिका पटली ती प्रामाणिकपणे, पूर्णत्वाने पार पाडणे ही सरांची खरी भूमिका आहे. म्हणूनच तरुण वयात 'राजकारण', 'सत्यचित्रे' या त्यांनीच सुरू केलेल्या नियतकालिकांचे अंक काढणे, त्यांचे गठ्ठे स्वतःच्या खांद्यावरून वाहणे, भरगर्दीत सभासमारंभात गठ्ठे हातात घेऊन त्याची विक्री करणे, 'ग्रंथाली'च्या समारंभात, साहित्य संमेलनात स्टेजवर भाषणे ठोकून पुन्हा स्टॉलवर ग्रंथविक्री करणे यात त्यांना कोणताही संकोच नव्हता. त्यावेळी मध्यमवर्गाने त्यांचे कौतुक केले. ज्यावेळी निरनिराळी पदे, खुर्च्या पटकावणे मानाचे होते त्यावेळी त्यांनी त्या पदांच्या ऑफर झिडकारल्या, त्याचेसुद्धा कौतुक झाले. कोणताही निर्णय वैयक्तिक मानमरातब, स्वार्थ यासाठी घ्यायचा नाही तर समाजाच्या भल्यासाठीच्या आपल्या विचारांशी ठाम राहून घ्यायचा ही त्यांची भूमिका मला फारच श्रेष्ठ वाटते. म्हणूनच या पदांचा, मानाच्या खुर्च्यांचा त्यांच्या विचारांना, आचारांना अडथळा, अडचण होऊ लागली. त्याक्षणी त्या झुगारून देण्याची झुंजार वृत्ती सरांची आहे.

ती झुंझारता आणि सहजता दोन्ही त्यांना प्राप्त होते, कारण 'माणूस' हा त्यांच्या केंद्रस्थानी असतो, त्याचे व्यवहार, त्यांचे वागणे, त्यांचे गुण व दुर्गुण व त्यातील परिस्थिती यांचे त्यांना विलक्षण कुतूहल असते – मग ती 'सेलेब्रिटी', 'ज्ञानी' वा 'प्रसिद्ध' व्यक्ती असावी लागत नाही आणि या सहजतेमुळेच त्यांना अफाट स्मृती प्राप्त झालेली आहे. ते कोणतीही घटना व प्रसंग, व्यक्ती व त्यांचे कार्य हे इतिहास व मानवी सभ्यता–संस्कृतीच्या अफाट परिघात बघू शकतात व त्यातून त्यांचे अचूक मनोवैज्ञानिक विश्लेषण करू शकतात; त्यातून त्यांच्या जीवनाचे असंख्य बिंदू त्यांना जोडणे शक्य होते. म्हणूनच संपादक वा लेखक म्हणून त्यांनी लिहिलेले मृत्युलेख वा व्यक्तिचित्रे यांची शैली वैशिष्ट्यपूर्ण व वेगळी आहे. तो व्यक्तीच्या अनुषंगाने केलेला इतिहास, वर्तमान, मूल्य आणि भविष्याचा आढावा असतोच; पण त्याचबरोबर त्या व्यक्तीच्या मनी कायाप्रवेश करून त्याला उलगडलेल्या विश्वाचा आरसासुद्धा! ही शैली बऱ्याच अंशी युरोपीयन–अमेरिकन पत्रकारितेशी मिळती–जुळती आहे. तेथे वृत्तपत्रे व मासिके यांचे स्वतंत्र 'obituaries' डिपार्टमेंट असते. इतिहास, संदर्भ व व्यक्तिविशेष यांचे स्वतंत्र दालन. ती सांभाळणारे व लिहिणारे स्वतंत्र पूर्णवेळ पत्रकार असतात; आणि त्यांचे कामच अशा व्यक्तींचा व इतिहासाचा शोध घेणे हे असते. केतकर यांची लेखनशैली त्यांच्याशी मिळतीजुळती आहे; इतकी की कित्येक वेळा त्यांनी एखाद्या व्यक्तीवर लिहिलेल्या मृत्युलेखातील विचार व मुद्दे काही वेळा अक्षरशः जसेच्या तसे वा भावानुवादाच्या रूपाने लंडन इकॉनॉमिस्ट व न्यू यॉर्क टाइम्सच्या ऑबिच्युअरिजमध्ये काही दिवसांनी छापून आल्याचा अनुभव मी स्वतः घेतलेला आहे. लायझॅ कोलोकोवस्की, रोबोर्ट मॅक्नमारा, चार्ली विल्सन, सी.के. प्रल्हाद अशी उदाहरणे देता येतील.

तितक्याच उत्कटतेने त्यांनी महाराष्ट्राच्या व मराठी व्यक्तींवरही लिहिले आहे – फारशा परिचित नसलेल्या परंतु स्वतः गणितज्ञ

व रेनेसाँचा गाढा अभ्यास असणाऱ्या जितेंद्र कराडकरांपासून महाराष्ट्राचे आनंदयात्री असणाऱ्या पु.लं.च्या जीवनगाण्याबद्दल आणि भावना, हिंसा विषयकल्लोळाचे अपरिहार्य नाट्य रंगवणाऱ्या विजय तेंडुलकरांच्या 'शांतता'पर्यंत आणि मुंबईच्या कामगार चळवळीचे संघर्षात्मक व मनोज्ञ वर्णन करणाऱ्या कवी नारायण सुर्वे यांच्यापर्यंत. कारण व्यक्ती, समाज व त्यातून निर्माण होणारे गुंतागुंतीचे प्रश्न त्यांना अधिक महत्त्वाचे वाटतात. ते त्या प्रश्नांचा सतत शोध घेत असतात व सूत्र शोधत असतात, स्रोत शोधत असतात. 'विश्वामित्राचे जग' हे त्यांचे पुस्तक त्यांनी जे. कृष्णमूर्तींना अर्पण केले आहे. त्यात ते म्हणतात, 'जे. कृष्णमूर्ती ज्यांनी मला उत्तरापलीकडल्याही प्रश्नांचा वेध घ्यायला शिकवले. ते कोणत्याही राजकीय विचारसरणी व तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करत नाहीत. ते गुरू नाहीत वा प्रस्थापित अर्थाने विचारवंत नाहीत. परंतु त्यांना व्यक्ती व त्यांचे अनेकविध प्रभाव आणि संस्कार महत्त्वाचे वाटतात. धर्म, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विचारसरणी प्रथम मानवाचे संस्कार मग माध्यम आणि मग मात्र अवजारे आणि कालांतराने हत्यारे बनू लागतात; आणि माणूस त्या सर्व माध्यमांत अडकतो. काही काळातच तो माध्यमसंस्कारांचा गुलाम बनतो व माध्यमे त्यास नाचवू लागतात. तेथून संघर्ष, हिंसा व अतिरेकीपणास सुरुवात होते.' पत्रकार म्हणून काम करत करताना माध्यमांचा हा वाढवणारा विचार कुमार केतकर त्यांच्या विविध लेखांतून व भाषणांमधून मांडतात, किंबहुना माध्यम महर्षी मार्शल मॅक्लुहान यांचा 'माध्यम हाच संदेश आहे - (medium is the message)' हा शोधविचार त्यांना त्या तत्त्वज्ञानांशी सुसंगत वाटतो. मानवी इतिहास हा अशा प्रकारच्या विविध माध्यमकथांतून, मिथकांतून व गोष्टी तयार करण्याच्या व सांगण्याच्या तंत्रातून विकसित झालेला आहे याचा शोध, स्वरूप व विचार त्यांनी 'विश्वामित्राची प्रतिसृष्टी या त्यांच्या निबंधात केलेला आहे. सिग्मंड फ्रॉईड, मार्शल मॅक्लुहान. रॉजर पेनरोज, स्टीफन हॉकिंग, डॉ. जॉनाथन मिलर, बर्ट्रांड रसेल या आणि अशा अनेक शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि स्कॉलरची जागतिक मांदियाळी या त्यांच्या पुस्तकांमधून आपल्याला भेटत राहते. वस्तुत: ती स्वतंत्र पुस्तके नव्हेत. ते संकल्पना, विज्ञान, मिथके, तत्त्वज्ञान, समाजकारण, राजकारण आणि मानसशास्त्र यांचे खंड आहेत; रेनेसाँ आणि नंतर फ्रेंच राज्यक्रांती जी जागतिक स्तरावर पसरवली व त्या वैश्विक मूल्य संस्कृतीचे (स्वातंत्र्य, समता, बंधुता) मराठीतील अभूतपूर्व डॉक्युमेंटेशन आहे. त्या अर्थाने कुमार केतकर हे महाराष्ट्राचे रेनेसाँ व्यक्तिमत्त्व आहे - मानवी अस्तित्वाचा जैवउत्क्रांतीपर व पर्यायाने सामाजिक राजकीय वेध घेणारे!




मार्क्सने ''प्रश्न फक्त इतिहास व वर्तमान समजून घेण्याचा नाही तर तो बदलण्याचाही आहे, जर्मनीने फक्त क्रांतीचा विचार केला, तर फ्रान्सने ती प्रत्यक्षात आणली,'' असे नमूद केले होते. म्हणूनच प्रश्न अंतिम मुक्तीचासुद्धा आहेच. मार्क्सवर दिलेल्या मुलाखतीत केतकर म्हणतात, ''मार्क्स त्याच्या मांडणीतून काय सांगू पाहत होता? भांडवलशाही व्यवस्थेने निर्माण केलेली आपली जी सर्वोच्च रचना आहे, आपली जी स्वप्ने आहेत, मूल्ये आहेत, कल्पना आहेत, ते सारे बाजूला सारा. त्यातून व्यापक रितेपण अनुभवास येईल. नात्यांबद्दलची आसक्ती संपेल आणि त्याला आपण विशुद्ध प्रेम म्हणतो ते शिल्लक राहील. ...अँटि कम्युनिस्ट होणे खूप सोपे आहे, परंतु कम्युनिस्ट होण्यासाठी तुमच्या अंतर्मनात परिवर्तन गरजेचे असते. तुमच्या आतला सततचा संघर्ष गरजेचा असतो.'' अर्थातच त्यामुळे त्यांना फ्रान्सिस फुकोयामाचा 'end of history' मान्य नाहीच; तसेच सॅम्युअल हटिंग्टन यांचा संस्कृतिसंघर्षाचा सिद्धांत. त्यांना इतिहासाच्या क्रमातून येणारी सांस्कृतिक सरमिसळ व सांस्कृतिक मीलन अभिप्रेत आहे. पंडित बिरजू महाराज यांनी 'रोमिओ आणि ज्युलिएट' या शेक्सपीयरच्या अमर नाट्यकृतीचा कथक-आविष्कार सादर केल्यावर केतकरांनी त्यांचे 'रोमांचकारी' असे वर्णन केले होते आणि अशा दृष्टिकोनापासून आपण अजून खूप मागे आहोत, अशी खंत व्यक्त केली होती.

खरे म्हणजे अशा मीलनातून व फ्रेंच/अमेरिकन राज्यक्रांतीच्या प्रेरणेने आपला भारतीय स्वातंत्र्यलढा उभा राहिला होता. ते सर्व प्रयत्न पुसण्याचे किंबहुना इतिहास संपवण्याचे अश्लाघ्य प्रयत्न अस्मिता, धर्म व प्रच्छन्न सांस्कृतिक राजकारणाद्वारे सुरू आहेत. आश्चर्य म्हणजे अनेक सुज्ञ, सुशिक्षित व सुजाण लोकांचा त्याला पाठिंबा आहे, व त्या साथीने आता उग्र रूप धारण केले आहे. ती अमूर्त असली, तरी त्याला लोकशाही राजकारणाचा वैधानिक मुलामा आहे, कोणत्याही संस्कृतीशी, आदर्शवाद व विचारसरणीशी त्याचा तीळमात्र संबंध नाही, ते एक कृष्णविवर आहे. परंतु त्याच्याशी संघर्ष करण्याचा मार्ग केवळ प्रस्थापित राजकारण आहे. व केतकर संघर्षात उतरले आहेत. 'बोली अरूपाचे रूप दाखवीन' याप्रमाणे त्यांनी वेळोवेळी त्याबाबत सांगितले आहे व त्यासाठी प्रचंड टीका व अवहेलनेला सामोरे गेले आहेत; आता संघर्षाची निर्णायक वेळ आहे. जे. कृष्णमूर्तींनी म्हटल्याप्रमाणे कोणताही निश्चित रस्ता नसलेला सत्याचा प्रकाशच त्यातून मार्ग काढू शकतो. त्यासाठी ज्ञानेश्वर आणि बुद्ध, टिळक आणि लेनिन, फ्रॉईड आणि जे. कृष्णमूर्ती, नेहरू आणि मार्क्स यांना एकत्र यावे लागेल. ते केतकरसरच करू शकतात!


**- चिन्मय बोरकर**

भ्रमणध्वनी : ९८२०८८१८६१

chinmay.borkar@gmail.com

# मला कळलेले अद्वितीय व्यक्तिमत्त्व



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**वीरेंद्र सुळे**

*कुमार नेहमीच वैज्ञानिकतेच्या जटिल तात्त्विक प्रश्नांवर चर्चा करण्यास तयार असतो. कुमारची वैज्ञानिक, भौतिक, शास्त्रीय प्रश्नांची समज, आंतरराष्ट्रीय राजकारण, दहशतवाद, पर्यावरण, आर्थिक-सामाजिक असमानता यांच्याशी असलेला संबंध उलगडून दाखवण्याची हातोटी असामान्य आहे.*


साधारण १९८५ ते १९९० पर्यंतचा काळ हा माझ्या व्यक्तिगत भवितव्याचे मार्ग शोधण्याचा होता. त्या काळी उदयास येत असलेला कॉर्पोरेट व आयटी सेक्टर त्यामधील भवितव्य आणि झपाट्याने विस्तारत चाललेल्या अभियांत्रिकी व उद्योगव्यापार यांच्या मर्यादा यांमध्ये बहुतेक सगळे उच्चशिक्षित तरुण लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या पकडण्यासाठी आसुसले होते. मी मात्र स्वतःच्या आंतरिक प्रेरणांच्या शोधात होतो. त्यांची थोडीफार जाणीव झालीही होती. त्या सर्व कॉर्पोरेट वातावरणात मी किती असमर्थ, अयोग्य व मिसफिट आहे हे मला जाणवले होते. त्यामुळे मी मला सर्वात प्रिय असलेल्या संशोधन क्षेत्रात जाण्याचे ठरवले. मार्ग अर्थात अत्यंत खडतर व आत्मविश्वास खच्ची करणारा होता. त्यामध्ये मला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तींमध्ये कुमार केतकरांचा मोठा वाट होता. (माझी दुसरी दोन प्रेरणास्थाने होती – चिंतामणी देशमुख व दिलीप महाजन). साहित्य, कला, समाजशास्त्र यांचे अत्यंत सामान्य ज्ञान असलेल्या (किंबहुना तेवढेही नसलेल्या) माझ्यासारख्या व्यक्तीस त्यांच्यासारख्या विचारवंताने जवळच्या मित्रासारखे वागवणे ही माझ्यासाठी फार मोठी मिळकत होती. त्यांचे निरागस, साधे, सचोटीने भरलेले व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व (कम्युनिस्ट लोक ज्यास कॉम्रेड या नावाने संबोधत असत असे होते. त्यामुळे की काय, पण मी त्यांना एकेरी कुमार नावाने संबोधू लागलो). आज सगळे त्यांना सर म्हणतात. त्यामुळे मला लाजल्यासारखे बऱ्याचदा होते. ही वैयक्तिक गोष्ट एवढ्यासाठी लिहीत आहे की त्यामधून कुमारमध्ये असलेल्या एका अद्वितीय व्यक्तीची ओळख होते. त्याच्यामध्ये दडलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पत्रकार व विचारवंत असलेल्या व्यक्तीच्या मोठेपणाचा व गर्वाचा लवलेशही मला कधी जाणवला नाही. गेल्या अनेक वर्षांतल्या काही मोजक्या आठवणी मला सांगाव्याशा वाटतात.

**रामानुजन जन्मशताब्दी व विज्ञानग्रंथाली**

या काळातच मी कुमारच्या संपर्कामुळे 'ग्रंथाली'च्या गच्ची 'गप्पा-ग्रुप'चा सदस्य झालो. त्या गप्पांमध्ये अनेक तात्त्विक, वैज्ञानिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांवर चर्चा होत असत. त्यातून सुचलेल्या कल्पनांवरून ग्रंथालीतर्फे अनेक उपक्रम केले गेले. त्यात अर्थातच

कुमार व दिनकर गांगल यांचे प्रयास अग्रणी होते. असाच एक विषय त्या गच्चीवर सुचला व त्यातून वर्षभराचा कार्यक्रम निर्माण झाला. तो म्हणजे श्रीनिवास रामानुजन यांचे जनशताब्दी वर्ष साजरे करण्याचा. तो कार्यक्रम अनेक दृष्ट्या अभिनव होता. भारतातील इतर कोठल्याही मोठ्या शहरात व स्थानिक भाषेत गणिताबद्दल, गणिताने प्रेरित विज्ञानाबद्दल असा कार्यक्रम वर्षभर झाला नसेल. त्यात अर्थातच कुमारचे विज्ञानाबद्दलचे विचार, त्यातून चळवळ घडवून आणण्याची प्रेरणा व गांगल यांचे नेतृत्व यांचा वाटा मोठा होता. वर्षभर चाललेल्या त्या कार्यक्रमात अनेक सामान्य लोकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वैज्ञानिकांची भाषणे व परिसंवाद ऐकण्यास, त्या व्यक्तींना पाहण्यास मिळाले. ती एक वैज्ञानिक चळवळच झाली. त्यातून पुढे विज्ञान ग्रंथालीचा उपक्रम जन्माला आला.

‘फँटसी’ ही निराधार माणसाला वाटणारी संजीवनी आहे. तथाकथित वास्तव वादाच्या नावाखाली साहित्यकलेतून ‘फँटसी’ला बाद केले तर जीवनातील आनंदच नाहीसा होईल. ‘फँटसी’हे सर्जनशील माणसाला मिळालेले वरदान आहे.’
(लोकसत्ता, ७ मार्च २००९ ‘त्रिकालवेध’ पृ. ४९)



भारत देशाला वैज्ञानिकतेची व वैज्ञानिक विचारसरणीची गरज निकडीची आहे असे मला नेहमी वाटत आले आहे. त्यात कुमारचे विचार देखील साथ देत असत. कुमार नेहमीच वैज्ञानिकतेच्या जटिल तात्त्विक प्रश्नांवर चर्चा करण्यास तयार असतो. कुमारची वैज्ञानिक, भौतिक, शास्त्रीय प्रश्नांची समज, आंतरराष्ट्रीय राजकारण, दहशतवाद, पर्यावरण, आर्थिक-सामाजिक असमानता यांच्याशी असलेला संबंध उलगडून दाखवण्याची हातोटी असामान्य आहे.

**नेहरूवाद व त्यावरील आक्षेप**

मी अनेकदा संपर्कात आलेल्या उच्चशिक्षित लोकांकडून माझी कुमारशी असलेली ओळख केवळ सांगितल्यामुळे तोंडसुख अनुभवले आहे. पण एक गोष्ट यात नक्की लक्षात येते. ती म्हणजे त्यातील बहुतेक लोकांचा वैयक्तिक राजकीय दुराग्रह, विशिष्ट समूहांबद्दल व व्यक्तींबद्दल असलेला गैरसमज अथवा द्वेष, भांडवलशाहीचे फाजील प्रेम व व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना हेच त्या लोकांचे कुमारवरील आक्षेपांचे मूळ आहे. कुमारवर गांधी घराण्यातील व्यक्तीचा उदो उदो करण्याचा आक्षेप नेहमी घेतला जातो. विशेषतः सध्याच्या काळात नेहरूंचे विचार देशविरोधीच असल्याचा प्रचार होतो. कुमार कोणत्याही परिमाणाने नेहरू व गांधी घराण्याचा व्यक्ती-प्रणेता नाही. नेहरूंनी दाखवलेल्या आणि काँग्रेसच्या व देशाच्या पुढील राजकारणात महत्त्वाचा वाटा असलेल्या आर्थिक धोरणांविषयी कुमारचे सखोल विचार व अभ्यास आहे. त्या आक्षेपातून उचभ्रू समाजातील प्रगतिशील विचारांची वानवाच दिसून येते.

हा काळ सोविएत युनियनच्या विकेंद्रीकरणाचा व ऱ्हासाचा होता. माझ्यासारखे अनेक तरुण गोर्बाचेव्ह यांच्या ग्लासनोस्त व पेरेस्त्रोइका या धोरणाने प्रभावित होते. त्याच काळात कुमारने सोविएत युनियनला दिलेली भेट अनेक बाबतींत डोळे उघडणारी होती. प्रत्यक्षात तेथे काय चालले होते व त्याचा अर्थ काय हे कुमारने सर्वांना सांगितले. सत्य सांगणे हे तितकेसे सोपे नव्हते. सोविएतच्या ऱ्हासाचा परिणाम संपूर्ण जगावर दिसतो.

अलिकडच्या काळात मी युवल हरारी यांच्या पुस्तकांनी प्रभावित झालो आहे. हरारी यांनी मांडलेला विषय कुमार व मित्रसमूह या सर्वांच्याच कुतूहलाचा ठरला आहे. हरारीच्या मानवाचा भूतकाळ व त्याचे भविष्य, दोन्ही विषयांत कमालीचे नावीन्यपूर्ण विचार दिसून येतात. त्यात कुमारच्या चौफेर ज्ञानामुळे विषयाची सखोलता आणखी प्रभावी होते.

कुमारने लिहिलेल्या अनेक पुस्तकापैकी मला सर्वात जास्त आवडलेले पुस्तक, ‘बदलत्या विश्वाचे अंतरंग.’ हे पुस्तक एक प्रकारे द्रष्टेच म्हणावे लागेल. पुस्तकाचा तात्त्विक विचार, आंतरराष्ट्रीय घडमोडींचे चित्रण, कॉर्पोरेट जगाची फोल ठरत असलेली भांडवलशाही भूमिका अशा अनेकविध अंतरंगांमुळे ते पुस्तक अनेक वर्षे वाचले जाईल, सर्वांनी ते वाचावे असे मी आग्रहाने सुचवीन.

कुमारला पंचाहत्तरीच्या शुभेच्छा. त्याला सुदृढ आयुष्य लाभावे व त्याने त्याच्या असामान्य वैचारिक दृष्टीने सर्वांनाच मार्गदर्शन करावे ही इच्छा.

**वीरेंद्र सुळे**
भ्रमणध्वनी : ९८८१०६३८७९
viren.sule@gmail.com

ग्रंथाली




**तसबीर**
**सदानंद डबीर**
**जगण्यातल्या असोशीने काठोकाठ भरलेला संग्रह**
**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# प्रज्ञावान संपादकांची परंपरा; ज्ञानमय प्रबोधनाचा प्रेरक वारसा



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे**

*गोविंद तळवलकर, माधव गडकरी, अरुण टिकेकर व अनंत भालेराव या समकालीन व स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी संपादकांच्या प्रज्ञापरंपरेत कुमार केतकरांचं स्थान नेमकं कुठं आहे? कुमार केतकरांमध्ये गोविंद तळवलकर व अरुण टिकेकर यांचा विद्याव्यासंग तर आहेच; त्याचबरोबर एक प्रगमनशील सामाजिक-राजकीय कार्यकर्त्याची 'धार'ही त्यांच्या संपादकीय कार्यकिर्दीस लाभलेली आहे.*

मराठी पत्रकारितेची वैचारिक परंपरा नि धारणा समजून घ्यायची असेल तर मराठीचे आद्य पत्रकार नि संपादक ज्ञानमहर्षी बाळशास्त्री जांभेकर यांचं मत वाचलं पाहिजे. त्यांनी २४ ऑगस्ट १८३२ साली मांडलं होतं :

''Of the various working and effects of public press there is none perhaps valuable, or more extensively beneficial, than the check which an independent and impartial publication never fails to exercise on the abuse of power, or misconduct of persons vested with authority. This salutary effect, however, can only be produced by scanning the measures of public men, condemning what is improper in their conduct, and making known such of their acts as are of a beneficial character. And the conductor of a public journal must not shrink from this important part of his duty, either from dread of the anger of any party, or tenderness for the feeling of the individual of who it may necessary to speak.' (The Bombay Darpan, Balshashtri Jambhekar, 24- August 1832)

बाळशास्त्री जांभेकरांनी १८८ वर्षांपूर्वी सांगितलेला हा पत्रकारितेचा धर्म आजही चिंतनीय व स्मरणीय आहे. खरं तर, मराठी नि एकूणच पत्रकारितेचा हा धर्म आहे. स्वातंत्र्याआधीच्या भारतात हे सांगितलं गेलंय. आज तर आपण स्वतंत्र भारतात आहोत. म्हणूनच मी मानत आलोय, की पत्रकारिता हे जनहिताचं माध्यम आहे; ते धनहिताचं माध्यम नाही. ते समाजसेवेचं, जनजागरणाचं नि राष्ट्रकार्याचं माध्यम आहे. तो व्यवसाय जरूर असेल; परंतु तो केवळ नफेखोर धंदा तर अजिबात नाही. दुर्दैवानं आजची माध्यमं ही धार बोथट झालेल्या की गमावलेल्या शस्त्रासारखी झालीहेत. ते टीका उच्चरवानं करतात, पण ते कुणाला तरी खुश करायला, सत्याची कास धरायला नाही. पत्रकारिता हा सत्य प्रतिपादनाचा नि प्रस्थापनेचा व्यवसाय आहे. हा व्यवसाय सत्यालाप करायचा नाही, ना तो सत्य झाकायचा व्यवसाय आहे. आजच्या भाषेत सांगायचं तर तो एक 'सामाजिक उद्योग' (Social entreprenurship) आहे. आज सत्य सांगणारी आणि सत्य

प्रतिपादनासाठी पडेल ती किंमत मोजणारी पत्रकारिता होत नाही असं म्हणणं हे वाईट अवस्थेतही चांगलं काम करणारे नि पत्रधर्म पाळणारे संपादक नि पत्रकार यांच्यावर अन्याय करणारं ठरेल. मात्र एकंदरित प्रसारमाध्यमं ही 'HMV' (His Master's Voice) झालीहेत की काय अशी शंका येत राहते. एका बाजूला प्रभावी राष्ट्रकार्याची व समाजजागरणाची परंपरा पन्नास-साठ वर्षं होती तर दुसरीकडे 'पतनपरंपरा' असं चित्र माध्यमक्षेत्रात आजमितीला आढळतंय. हे चित्र लोकशाहीसाठी नि देशासाठी चिंतनीय जरूर आहे. हिंदी पत्रकारितेचे पितामह दिवंगत बाबूराव पराडकर वृंदावन इथं १९२५ मध्ये केलेल्या हिंदी संपादक संमेलनातील अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते :

'पत्र निकालकर सफलतापूर्वक चलाना बडे बडे धनिकों अथवा सुसंगठित कंपनियों के लिए ही संभव होगा। पत्र सर्वांगसुंदर होंगें, आकार बड़े होंगें, छपाई अच्छी होंगी, पत्र मनोहर, मनोरंजक और ज्ञानवर्धक चित्रों से सुसज्जित होंगे, लेखों में विविधता होगी, कल्पनात्मकता होगी, गंभीर गवेषणा होगी और मनोहारिणी शक्ति भी होगी। ग्राहकों की संख्या लाखों में गिनी जायेगी। यह सब कुछ होगा, पर पत्र प्राणहीन होंगे। पत्रों की नीति देशभक्त, धर्मभक्त अथवा मानवता के उपासक महाप्राण संपादकों की नीति न होगी। इन गुणों से संपन्न लेखक विकृत मस्तिष्क के समझे जाएँगे। संपादक की कुर्सी तक उनकी पहुँच भी न होगी। वेतनभोगी संपादक मालिकों का काम करेंगे और बड़ी खूबी के साथ करेंगे। वे हम लोगों से अच्छे होंगे। पर आज भी हमें जो स्वतंत्रता प्राप्त है, वह उन्हें न होगी।'

पारतंत्र्यात असताना जे स्वातंत्र्य संपादकांना होतं, ते स्वातंत्र्योत्तर काळात असणार नाही हे त्यांचं भाकीत चकित करून सोडणारं आहे.

गेल्या पन्नास वर्षांच्या मराठी पत्रकारितेकडे पाहताना शैलीदार पत्रकार ह.रा. महाजनी, डॉ. नानासाहेब परुळेकर, आचार्य प्र. के. अत्रे, व्दा.भ. कर्णिक, गोविंद तळवळकर, प्रभाकर पाध्ये, माधव गडकरी, अरुण टिकेकर, अनंत भालेराव, गणपतराव जाधव, बाळासाहेब पाटील, रंगाअण्णा वैद्य, ग.त्र्यं. माडखोलकर, पां.वा. गाडगीळ, म.य. ऊर्फ बाबा दळवी व दादासाहेब पोतनीस या प्रज्ञावान संपादकांची गुणवत्तापूर्ण व गौरवशाली परंपरा महाराष्ट्राला आहे. मराठी पत्रकारितेची परंपरा ही समाजहितैषि नि राष्ट्रहितैषि राहत आली आहे. या तेजस्वी संपादकांनी व पत्रकारांनी त्यांना कणा काठ ठेवला, सत्त्व जपलं नि तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यांनी त्यांच्या भूमिकेशी कधी प्रतारणा केली नाही. वैचारिक निष्ठा व सचोटी यांना तिलांजली दिली नाही. ते देश, महाराष्ट्र नि सामाजिक परिवर्तनाची कास धरून सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळीचे प्रेरक वा आधारस्तंभ बनले. त्यांनी कुणाचीही भीडभाड न ठेवता निर्भयतेनं त्यांची मतं लोकांसमोर मांडली. व्यापक जनहिताची चाड राखली.

**तळवलकर - टिकेकर - गडकरी - भालेराव :**
**समकालीन संपादकांचा वारसा**

कुमार केतकर वयाचं अमृतमहोत्सवी वर्ष साजरं करत आहेत. ते संपादकांच्या परंपरेचे शेवटचे शिलेदार ठरू नयेत. परंतु तशा संपादकांचा दुष्काळ पडलाय हे सत्य. महाराष्ट्रात गुणवत्तेचा तुटवडा नाही. मालकांनी हे ज्ञानवैभव पुन्हा त्यांच्या दैनिकात आणण्याची गरज आहे. संपादकांकडून काढून घेतलेली कॅप्टनशिप पुन्हा बहाल करायची गरज आहे. मालकांमुळे नव्हे तर संपादकांमुळं ओळखली जाणारी दैनिकं नि माध्यमं हवी आहेत. काही सन्माननीय अपवाद वगळता चेहरा हरवलेले संपादक अग्रलेखात प्राण फुंकू शकत नाहीत. सुमार वाचन, सुमार लेखन, कल्पनाशक्तीचा अभाव, पगारी वृत्ती, स्वातंत्र्याचा अभाव, आर्थिक उद्दिष्टांचं पीडादायक असहाय्य ओझं, चैतन्य गमावलेलं वातावरण यामुळे हा शब्द नि ज्ञानात्मक व्यवसाय गलितगात्र व धनगुलाम झाला असं वाटत राहतं. नफा जरूर व्हावा नि त्यासाठी प्रयत्नही व्हावेत, पण त्यासाठी किती किंमत मोजायची याचं भान मालकांनी ठेवायला हवं. अच्युतानंद मिश्र हे 'नवभारत टाइम्स'चे संपादक होते नि भोपाळच्या माखनलाल चतुर्वेदी पत्रकारिता विश्वविद्यालयाचे कुलगुरूही होते. त्यांनी मांडलेला विचार मला मौलिक वाटतो. ते म्हणाले होते :

'आधीच्या काळी संपादक हे सर्वेसर्वा होते; नंतर मालक किंवा त्यांचा सीइओ सर्वेसर्वा झाले नि आता मालकही सर्वेसर्वा राहिले नाहीत तर 'बाजार' हा सर्वेसर्वा झालाय. बाजार ठरवतो की कोणत्या माध्यमात किती नि काय द्यायचं. कोणत्या पानावर काय छापायचं, कुठं छापायचं. पहिल्या पानावर संपूर्ण पानभर जाहिरात पूर्वी न देण्याचा संकेत असे. संपादक बातम्यांचं महत्त्व पाहून जाहिरात नाकारत असत. आता संपादक सोडा मालकही ती नाकारत नाहीत. माध्यमं ही बाजाराची गुलाम वा अर्धगुलाम होताहेत का हा सवाल आहे.'

खरं तर माध्यमांचीच अस्मिता नि अस्तित्वही पणाला लागलं आहे. माध्यमांची वाचकांच्या मनातील नि समाजातील विश्वासार्हता संकटात आल्यावर याशिवाय वेगळं काय घडणार? या पार्श्वभूमीवर तळवलकर, टिकेकर, गडकरी व भालेराव यांच्या परंपरेची चिकित्सा करावी लागेल. हे प्रतीकात्मक प्रतिनिधी आहेत महाराष्ट्र राज्यातील बुद्धिजीवी पत्रकारितेच्या परंपरेचे. त्यांनी पत्रकारितेला व्यावसायिक प्रतिष्ठा मिळवून दिली. संपादक या पदाला संस्थात्मक वलय प्राप्त करून दिलं. त्यांनी समाजकारण, अर्थकारण, राजकारण व संस्कृतिकारण यांत 'विषयपत्रिका' निश्चित (अजेंडा सेटिंग) करण्याचं काम केलं. एकूणच पत्रकारिता नि संपादक यांचं 'मतनिर्माते' (ओपिनियन मेकर) म्हणून नैतिक वजन वृद्धिंगत केलं व प्रतिष्ठा उंचीवर नेली. एका ज्ञानपरंपरेला व्यावसायिक उंची दिली. त्यांच्यात काही दोष होते, मर्यादा होत्या. परंतु त्यांचं योगदान हे अधिक प्रभावी होतं. ती समकालीन मराठी पत्रकारितेतील 'गुणवत्तेची गावं' नि बेटं होती. ही दैनिकं संपादकाच्या नावानं ओळखली जात हे त्यांचं भांडवल होतं. आजच्या दैनिकांच्या

संपादकांची नावं तरी लक्षात राहतात का? याला अपवाद आहेत. मी असं म्हणणार नाही सारेच तसेच आहेत. ही एकप्रकारची पतनपरंपरा नव्हे काय? माझ्या मते ती पतनपरंपरा आहे. ती पतनाकडून अध:पतनाकडे जाऊ नये ही माफक अपेक्षा का करू नये?

**मग जपावी अशी परंपरा आहे तरी काय ?**

गोविंद तळवलकर हे विचारानं रॉयवादी नि नेहरूंचे; तसंच यशवंतराव चव्हाण यांचे चाहते होते. आंतरराष्ट्रीय प्रश्न, साहित्य, राजकारण, समाजकारण, संस्कृतिकारण नि शिक्षणकारणावर त्यांनी त्यांच्या खास शैलीत विपुल लेखन केलं. ग्रंथलेखन केलं. महाराष्ट्र टाइम्स त्यांच्या अग्रलेखांसाठी वाचला जायचा नि त्याचे पडसाद महाराष्ट्रात पडायचे, एवढं नैतिक वजन त्यांनी त्यांच्या अग्रलेखांना कष्टपूर्वक नि गुणवत्तेनं प्राप्त करून दिलं होतं. त्यांनी साहित्य, शिक्षण नि राजकारण यांच्या शुद्धिकरणाचं काम त्यांच्या उपहासगर्भ नि धारदार शैलीनं दमदार रीतीनं कुणाचीही भीडभाड न बाळगता केलं. मग तो विषय बॅ. अंतुले यांचं प्रतिभा प्रतिष्ठानचं प्रकरण असो की तत्कालीन मराठवाडा विद्यापीठातील कुलगुरू नाथ यांच्यावरील 'नाथांचं भारूड' प्रकरण असो, शंकरराव मोहिते-पाटील यांचं 'समाजवादी लक्षभोजन' असो, तळवलकर यांनी अग्रलेखांनी उलथापालथ घडवली. साहित्य-संस्कृती मंडळाच्या डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांच्या नवलेखक अनुदान योजनेवरही खरपूस नि उपहासगर्भ टीका केली. आता असं वाटतं, की त्यांनी अंतुले यांच्यावर लिहिलेला 'म्लेंछ संहार जाहला' शीर्षकाचा लेख मुस्लिमद्वेषाचा प्रतीक होता की मला ते शीर्षक आक्षेपार्ह वाटतं.

'लोकसत्ता'चे संपादक अरुण टिकेकर हे मूलत: संशोधक व ग्रंथलेखक. ते गंभीर प्रकृतीचं संशोधनवृत्तीनं लेखन करणारे अव्वल दर्जाचे संपादक. त्यांचं वर्णन 'विचारवंत संपादक' नि इतिहास संशोधक संपादक असाच केलं गेलं. मराठी व इंग्रजीवर जबरदस्त प्रभुत्व धारण करणारा ते एक आगळेवेगळे नि विलक्षण संपादक होते. आज जगभर ज्या ज्ञानपत्रकारितेची (नॉलेज जर्नालिझम)ची चर्चा होते त्याचे ते पाईक होते. त्यांचा एक वेगळाच ठसा त्यांनी निर्माण केला. गाढे पंडित असं त्यांचं वर्णन करता येईल. मुंबई विद्यापीठाची घसरण पाहताना ते तुटून पडत. कारण त्यांनी त्या विद्यापीठाचा दीडशे वर्षांचा इतिहास लिहिलेला. माधव गडकरी हे गोविंद तळवलकरांच्या अगदी विरोधी व्यक्तिमत्त्व. गोविंद तळवलकर समाजात न मिसळणारे तर माधव गडकरी हे समाजकेंद्रित. व्याख्यानं, संमेलनं करीत महाराष्ट्र पादाक्रांत करत त्यांनी एकच हंगामा केलेला. चार भिंतीतली पत्रकारिता नाकारणारे ते 'कार्यकर्ते संपादक' होते. त्यांची 'चौफेर' टोलेबाजी नि शब्दबाजी गाजून गेली. ते एक चमकदार संपादक झाले. माधवराव गडकरी यांची अगदीच वेगळीच शैली होती.

मराठवाडाचे संपादक अनंत भालेराव यांची जातकुळी माधव गडकरी यांच्यासारखी, कारण ते संपादक झाले होते हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यातून! मराठवाडा हे त्या चळवळीचं मुखपत्र होते. अनंत भालेराव यांच्या नेतृत्वाखाली 'दै. मराठवाडा' मराठवाडा विकास आंदोलनासाठी प्रेरणा देऊन त्यात भरीव यश मिळवलं. एका प्रादेशिक दैनिकानं विकासाची युवा चळवळ उभी करावी व त्यांचा खंबीर आधारस्तंभ बनावं याचं हे उत्तम उदाहरण आहे. या चळवळीतूनच मराठवाड्यात परभणी इथं कृषिविद्यापीठाची व अन्य विकासात्मक योजनांची पूर्तता होऊ शकली. अनंत भालेराव हे हैदराबाद मुक्तिसंग्राम, मराठवाडा विकास आंदोलन व समाजवादी चळवळी अशा पार्श्वभूमीतून आलेले असल्यानं व कार्यकर्ता-नेता हा पिंड असल्यानं असं वेगळेपणानं अभिव्यक्त झाले. त्यांचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे अग्रलेखांची व लेखनाची उत्तम गुणवत्ता. मराठवाडा हा त्यांच्या अग्रलेखांसाठी वाचला जायचा. आंदोलनाची, विकासाची ही 'कावड' घेऊनच अनंतराव भालेराव यांनी व्यापक समाजहिताची कामं केली.

त्यांना आणीबाणीच्या विरोधात सक्रिय लेखन केल्यानं तुरुंगवासही भोगावा लागला. अभिव्यक्तिस्वातंत्र्यासाठी निर्भयपणे लढणारे नि अक्षर दर्जाचं लेखन करणारे ते एक शैलीदार संपादक होते. पुण्या-मुंबईपासून दूर मराठवाडयात राहूनही त्यांच्या अक्षरतेजानं नि लेखन प्रनिभेनं ते महाराष्ट्रातील एक लक्षवेधी संपादक झाले. त्यांच्या लेखनावर वारकरी संप्रदायाचा नि समाजवादी लेखनाचा प्रभाव होताच; शिवाय मराठवाडाचा दिवाळी अंकही वैचारिक खाद्य म्हणून महाराष्ट्रभर जायचा. त्यांच्या उत्तम संपादक क्षमतेचा हा दिवाळी अंक प्रतीक होता.

> 'कुमार केतकरांची नजर भूतकाळाकडे मागे वळते तेव्हा त्यांना...सिंहावलोकन करायचे असते, ते साऱ्या मानवी संस्कृतीच्या भूतकाळाचे....भूतकाळाच्या या धूसरतेतून वर्तमानाकडे जेव्हा ते वाचकाला घेऊन येतात, तेव्हा आजच्या व्यामिश्र जीवनाची क्लिष्ट गुंतागुंत शक्य तितकी स्पष्ट दाखविण्याचा त्यांचा सायास असतो आणि ...भविष्यातील अनेकानेक शक्यतांचा 'फ्यूचरॉलॉजी' बांधत असलेला तो इमलाही विचारांच्या प्रकाशझोतात शक्य तेवढा उजळण्याचा ते प्रयत्न करतात.'
> (काळाचा पैस – संपादकीय प्रस्तावना 'त्रिकालवेध' **डॉ. सदानंद बोरसे**)

**कुमार केतकरांचं प्रज्ञापरंपरेतील स्थान**

गोविंद तळवलकर, माधव गडककरी, अरुण टिकेकर व अनंत भालेराव या समकालीन व स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी संपादकांच्या प्रज्ञापरंपरेत कुमार केतकरांचं स्थान नेमकं कुठं आहे? कुमार केतकरांमध्ये गोविंद तळवलकर व अरुण टिकेकर यांचा विद्याव्यासंग तर आहेच; त्याचबरोबर एक प्रगमनशील सामाजिक-राजकीय कार्यकर्त्याची 'धार'ही त्यांच्या संपादकीय कार्यकिर्दीस लाभलेली आहे. हा माधवराव गडकरी व अनंत भालेराव या संपादकांच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचा घटक मला कुमार केतकरांच्या व्यक्तित्वात जाणवतो. ग्रंथाली चळवळ असो की अन्य आंदोलन, त्यामध्ये ते झेकून देताना दिसतात. राजकीय भूमिकेबाबतीत ते अनंत भालेराव यांच्याप्रमाणे सक्रिय दिसतात. माझ्या मते कुमार केतकर हे नक्कीच त्या प्रज्ञापरंपरेचे पाईक आहेतच; पण त्यांना संपादकपदाचा कालावधी प्रदीर्घ न मिळाल्यानं त्यांना मोठा प्रभाव पाडता आला नसावा. त्यांच्या राजकीय मतांबद्दल बोलायचं झालं तर इंदिरा गांधींबद्दलची टोकाची अनुकूलता व त्यामुळे आणीबाणीचं समर्थन व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच झाला असतानाही त्यांनी केलेली भलावण पटणारी नाही. अर्थात त्यांची म्हणून एक वैचारिक बाजू त्यासाठीही आहे; पण ती पटत नाही. आणीबाणीत माध्यमांवरच्या आक्रमणाविरोधात त्यांनी लढा द्यायला हवा होता. आता ते काँग्रेसचे राज्यसभा खासदार झालेले आहेत. राज्यसभेत अनेक पक्षांनी संपादकांना पाठवलेले आहे. विद्वतसभा म्हणून तिथे ते त्यांचं योगदान देत आहेत नि विरोधी पक्षाची माध्यमांची भूमिका ते तिथेही बजावत आहेत. हे जरी खरं असलं तरी कुमार केतकर हे एका प्रज्ञापरंपरेचे पाईक तर आहेतच, शिवाय एक क्रियाशील सांस्कृतिक-साहित्यिक नेतृत्वही देत आहेत. सत्तेला न आवडणारं निर्भीडपणे मांडणारे विचारवंत देशाला नेहमीच हवे असतात व त्यांची संख्याही नेहमीच कमी असते. त्यामुळेच अशा नेतृत्वाचं महत्त्वही असतं. हे नाकारता येईल काय? नक्कीच नाही!

**– प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे**
भ्रमणध्वनी : ९०९६९५००३५
profgsudhir@gmail.com

ग्रंथाली

# यशपुष्प

**डॉ. आशुतोष रारावीकर**





**यशस्वी जीवनासाठी**
**विचारपुष्पांचा खजिना**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**

# छपाई ते लेखणी

**यशवंत मराठे**




**यशस्वी उद्योजगाची लेखनातली चौफेर**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**

# व्रतस्थ ते तटस्थ... व्हाया त्रयस्थ



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**शैलेश पांडे**

*सामाजिक प्रश्नांप्रती असलेली वृत्तपत्रांची बांधिलकी वाढत्या व्यावसायिक स्पर्धेमुळे कमी व्हायला लागली. जाहिराती आणि त्यासाठी संबंधितांचा सांभाळ करण्याचे भान पत्रकारितेला या युगाने दिले.*


लाखो अमेरिकी लोकांच्या वाचनाच्या सवयीला दिशा देणारा पत्रकार-प्रकाशक म्हणून हेन्री आर. ल्यूसचे नाव घेतले जाते. तो साधारणतः पन्नास वर्षांपूर्वी गेला. अमेरिकेत त्याला 'मॅगझिन मॅग्नेट' म्हटले जायचे. जगप्रसिद्ध टाइम मॅगझिनचा तो सहसंस्थापक. हेन्री म्हणायचा, ''मला जगाच्या हृदयात शक्य तितक्या खोल शिरायचे आहे. त्यासाठीच मी पत्रकार झालो...'' खरेच आहे. पत्रकारिता हा जगाच्या म्हणजे भवतालातील माणसांच्या काळजात शिरण्याचाच व्यवसाय आहे. तो आरंभापासून तसा होता. पत्रकारिता लोकांच्या काळजात होती आणि जग पत्रकारांच्या काळजात होते. किमान काळजापाशी तर होतेच. पत्रकारिता हे व्रत होते. नंतर त्यात व्यवसाय आला आणि या व्रताला हळूहळू ग्रहण लागले. प्रोफेशनल किंवा व्यावसायिक होणे चुकीचे नाही. टिकून राहण्यासाठी आणि वाढण्यासाठी कोणत्याही उपक्रमाला व्यावसायिक स्वरूप द्यावेच लागते. नफा-तोट्याचा विचार करावाच लागतो. अगदी आरंभापासून नसेल कदाचित, पण पत्रकारिता हा काही प्रमाणात व्यवसाय होताच. त्यासोबतच त्यात ध्येयवाद होता. मूल्ये होती. आता तो फक्त व्यवसाय म्हणून शिल्लक राहिला आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. जगाच्या आणि भारताच्या पत्रकारितेच्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर मराठी पत्रकारितेची वाटचाल तपासून पाहताना सुमारे दोन शतकांचा भव्य कालखंड आपल्यापुढे येतो. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण'पासूनची पहिली जवळजवळ शंभर-सव्वाशे वर्षे-इंग्रजांच्या काळातली आणि नंतरची सत्तरेक वर्षे स्वातंत्र्योत्तर काळातली. मराठी पत्रकारिता तशी स्वातंत्र्याच्या आधीपासूनच बहरायला लागली होती. अनेक वृत्तपत्रे सुरू झाली होती. त्यांच्या संख्येत भर पडत गेली. भारतात भाषक वृत्तपत्रांचा उदय झाला तेव्हा उर्दू-पर्शियनच्या बरोबरीने आरंभी जी वृत्तपत्रे निघाली, त्यांत मराठी व बंगाली भाषांतील वृत्तपत्रांचा समावेश होता. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी पत्रकारांसाठी ही पार्श्वभूमी तयार होती. स्वातंत्र्यानंतर मराठी पत्रकारिता अधिक बहरली. तिला ध्येयवादाचे, सुधारकी विचारांचे अधिष्ठान आधीपासूनच होते. अनेक विचारप्रवाहही होते. वृत्तपत्र हे मतपत्रच असते, याबद्दल बहुतांश लोक ठाम होते. त्यामुळे एखाद्याचे कौतुक अमर्याद व्हायचे आणि टीकाही जहाल व्हायची. एकूण

मराठी पत्रकारितेचा स्वातंत्र्योत्तर काळातला बाज हा प्रामुख्याने रांगडा होता. त्यानंतरच्या काळात वृत्तपत्रांची संख्या वाढत गेली. प्रामुख्याने दैनिके वाढली. पत्रसृष्टीने चांगलेच बाळसे धरले. संपादकांच्या नावाने वृत्तपत्रे ओळखण्याची परंपरा तोवर बऱ्यापैकी कायम होती. ती त्यानंतरही बराच काळ चालली. कारण संपादक ही एक संस्था होती आणि वृत्तपत्रांचे मालकही बऱ्यापैकी ध्येयवादी होते. संपादकांच्या लेखणीवर वैचारिक लढाया होत आणि त्याच लेखणीतून मोठी समाजकार्येही घडून येत. विचारप्रवाह कोणताही असो, मालक आणि संपादक आणि त्यामुळेच बाकीची मंडळी सहसा आपल्या व्रतस्थ भूमिकांवर ठाम राहत. मराठी पत्रकारितेत 'दर्पण'पासून सुरू झालेली व्रतस्थता, व्यासंग, विचार याही काळात कायम होता. या दीर्घ काळाने बाळशास्त्रींसारखे अनेक मातब्बर लोक पाहिले, १८५७ चे बंड पाहिले, त्यानंतरची सेन्सॉरशिप पाहिली, काँग्रेसची स्थापना पाहिली, टिळक-गांधी युग पाहिले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना आणि पहिली बंदी पाहिली. याशिवाय, स्वातंत्र्यलढ्यातील जहाल-मवाळांचा संघर्ष, पहिले व दुसरे महायुद्ध अशा अनेक घटना या काळात घडून गेल्या. मराठी पत्रकारिता ब्रिटिशांच्या काळात सुरुवातीला काहीशी बुजली, मग लढली आणि नंतर स्थिरावली. ती व्रतस्थ होती. ध्येयवादी होती. मतभेद असतानाही प्रामुख्याने दिलदारीची होती. प्रसंगी जहाल असली तरी विचारी होती.

स्वातंत्र्य मिळाल्यावर जे लोक पत्रकारितेत होते, त्यांना या व्रतस्थतेचा वारसा होता. देश नव्याने स्वतंत्र झाला होता. स्वातंत्र्यलढ्याचे भारलेपण होते. वैचारिक लढे होतेच, पण लोकतंत्राची प्रस्थापना आणि देशापुढील अन्य प्रश्नांविषयीची जागरूकता घडवणे हा त्या पिढीचा ध्यास होता. आमच्या पिढीने तीन दशकांपूर्वी ज्यांच्याकडून पत्रकारितेची बाराखडी गिरवली, त्यापैकी बहुतेकांची ही मंडळी पूर्वसुरी होती. त्यामुळे त्यांचे ते भारावलेपण आमच्या गुरूंमध्येही उतरले होते. त्यांच्याकडे केवळ भाषा आणि ज्ञान नव्हते. त्यांच्याकडे वैचारिक भूमिका होती. भरपूर अनुभव होता. त्यांचे आकलन उत्तम होते. समजावून सांगण्याची हातोटी होती. त्यांनी आणीबाणीचा प्रत्यक्षानुभव घेतला होता. त्यामुळे लोकतंत्रातील पत्रकारितेचे महत्त्व त्यांना कळत होते. पत्रकार कसा असला पाहिजे, हे त्यांच्या वर्तनातून, लेखणी-वाणीतून आणि वावरातून दिसायचे. न्यूजरूम हे फक्त बातम्या बनवण्याचे नव्हे तर पत्रकार घडवण्याचेही ठिकाण होते. त्याकाळी पत्रकार फक्त बातमी किंवा लेख लिहायला शिकत नव्हते. ते विचार आणि भूमिकाही आत्मसात करीत होते. वादविवादांत हिरिरीने सहभागी होत होते. फक्त विदेशी किंवा पाश्चात्त्य विचारांना महत्त्व देणारे, सुधारक म्हणतील तेच खरे म्हणणारे, भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानासाठी लेखणी झिजवणारे, डावे-उजवे, बहुजनवादी, मागासवर्गीयांसाठी झटणारे असे सगळे प्रवाह पत्रकारांमध्ये होते. एकमेकांना दोष देत असतानाही ते पत्रकारिता करायचे हे खास. बहुतांश लोक मालकाचे धोरण पाळायचे. करायचे मात्र पत्रकारिताच. अपवाद वगळले तर बहुतांश मालकांमध्येही पुरेशी शुचिता होती. लोकलज्जा होती. आपण वृत्तपत्राचे मालक आहोत आणि आपले वृत्तपत्र लोक वाचतात म्हणजे समाजाप्रति आपली काही जबाबदारी आहे, असे मानणाऱ्या मालकांची संख्या अधिक होती. एखाद्याने थोडेसे इकडेतिकडे करतो म्हटले तरी बहुतेकदा संपादकाचा शब्द अंतिम असायचा. फार जुनी गोष्ट नाही, संपादकाने सांगितल्यावर पानावर लागलेल्या जाहिराती काढल्या गेल्याचे आमच्या पिढीने पाहिले आहे. आता जाहिरातीसाठी संपादकाचाच लेख काढून टाकण्याचे दिवस आलेले आहेत. असो... हे सारे परिवर्तन एका दिवसांत घडलेले नाही. न्यूजरूममध्ये नवख्यांना लक्षपूर्वक शिकवणे (आणि शिकणेही) एकाएकी बंद किंवा कमी झालेले नाही. मूळ प्रश्न असा, की आडातच नसेल तर पोहऱ्यात येणार कुठून? शिकवणारे आणि शिकणारे यांची संख्याच कमी असेल तर करायचे काय? या क्षेत्रात प्रतिभा येणेच मंदावले असेल तर तिचा प्रवाह येणार कुठून? मराठी पत्रकारितेच्या गेल्या पन्नास वर्षांचा विचार करताना पहिली पंचवीस वर्षे वेगळी पाहावी लागतात. किमान ९० च्या दशकापर्यंत पहिला आणि त्यानंतर आतापर्यंतचा दुसरा असे दोन टप्पे तर ठळकपणे जाणवतात. वारशाने मिळालेल्या व्रतस्थतेकडून त्रयस्थतेकडे वळणे हा प्रोफेशर्नॅलिझम पहिल्या पावशतकाच्या टप्प्यात दिसला. तरीही ते समाजमान्य होते. भूमिका घेण्यात कमीपणा किंवा भीती वाटण्याचा तो काळ नव्हता. १९९० नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे युग जसे अवतरले, तशी पत्रकारितेतील व्रतस्थता कमी झाली आणि त्रयस्थतेचे दिवस आले. आपल्याला बातमी किंवा लेखातून जे काही सांगायचे आहे, ते कोणत्याच भूमिकेतून सांगायचे नाही, असा संस्कार कळत-नकळत सुरू झाला. मार्केटचे प्रेशर न्यूजरूममध्येही दिसू लागले. आपण समाजातल्या घटना-घडामोडींकडे त्रयस्थासारखे बघितले पाहिजे, अशी शिकवण नव्या पिढीला दिली जाऊ लागली. बातमी पवित्र असते-असावी हे खरेच. पण, बातमीमुळे, घटनेमुळे पत्रकाराच्या मनात कोणतेच स्पंदन उमटू नये आणि त्याची अभिव्यक्तीही अशक्य व्हावी, हे तसे नवलाईचे होते. विविध प्रकारच्या चळवळींमधून आलेले पत्रकार त्यामुळे अधिक अस्वस्थ होत. सामाजिक प्रश्नांप्रती असलेली वृत्तपत्रांची बांधिलकी वाढत्या व्यावसायिक स्पर्धेमुळे कमी व्हायला लागली. जाहिराती आणि त्यासाठी संबंधितांचा सांभाळ करण्याचे भान पत्रकारितेला या युगाने दिले. ९०च्या दशकात अनेक वृत्तपत्रांच्या प्रादेशिक आवृत्त्या सुरू झाल्या. त्यामुळे एका पिढीला उत्तम संधी मिळाली. चांगले पगारही मिळाले. 'क्लासिकल' पत्रकारितेतून घडलेल्या लोकांच्या हाताखाली ही पिढी घडली. पण, त्याच पिढीला ही अभिजात पत्रकारिता पुढे नेणे अशक्य झाले. काही अपवाद असतीलही. पण, बहुतांश ठिकाणी पत्रकारितेची मूल्ये मागे पडून व्यावसायिकता तेवढी शिल्लक राहिली आणि व्रतस्थतेकडून त्रयस्थतेकडे वळलेली पत्रकारिता तटस्थ कधी झाली ते कुणालाच समजले नाही. यात दोष कुण्या एका व्यक्तीचा-समूहाचा नाही-नव्हता. परिस्थितीच तशी घडत गेली. प्रश्न

'सर्व्हायव्हल'चा असतो तेव्हा नीतिमत्तेला फारसा थारा नसतो. परिणामी प्रवाह पतित होण्यापासून फार कमी लोक स्वतःला बचावू शकले. ९० नंतर आलेले पेड न्यूज वा तत्सम गोष्टींचे आक्रमण हा स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकेल. त्यांचा विस्तार येथे करण्याचे औचित्य नाही. त्रयस्थतेला या गोष्टींनी हातभार लावला एवढे मात्र खरे. पुढे चोवीस तासांचा टीव्ही आल्यामुळे वृत्तपत्र क्षेत्राला जे ग्लॅमर होते, त्याला उतरती कळा लागली. टीव्हीवाल्यांनी वृत्तपत्रांना वेग शिकवला, पण त्या वेगात वृत्तपत्रांमधील व्यासंगी, सखोल लेखनाची परंपरा थंडावली. वादविवादांचे रकाने रिकामे झाले. याच काळात खाऊजा युगाने इतर क्षेत्रांत रोजगाराच्या नव्या संधी तयार केल्या. पत्रकारितेच्या तुलनेत तिकडे पगार बरे होते. चांगले लोक तिकडे वळले. त्यामुळे पत्रकारितेत उत्तम प्रतिभा येणे बऱ्यापैकी मंदावले. न्यूजरूममधील अनौपचारिक शिक्षण-प्रशिक्षण तसेही मंदावले होते. तरीही काही लोक प्रयत्नपूर्वक पत्रकारितेत स्थिरावले. त्यांनी आपले व्रत निभावले. पत्रकारितेचे रहाटगाडगे सुरू राहिले. वृत्तपत्रांनीच टीव्हीला माणसे दिली. इंटरनेटला माणसे दिली. न्यूज सेन्स आणि न्यूज व्हॅल्यू या दोन गोष्टी वृत्तपत्राच्या न्यूजरुममध्ये शिकून तयार झालेले अनेक प्रतिभावंत लोक टीव्हीकडे वळले. अनेकांनी जाहिरात-पीआर एजंसीज काढल्या. काहींनी थेट कुठल्या तरी सरकारी विभागांत किंवा माहिती खात्यात नोकरी धरली. वृत्तपत्रीय पत्रकारिता पूर्वीही काही लोक सोडत. दुसरे काही तरी करीत. या काळात ही संख्या वाढली. ग्लॅमर, पगार, सुरक्षितता, ताण इत्यादी अनेक मुद्दे त्यामागे होते. प्रिंट मीडियासाठी हा एक प्रकारे 'ब्रेन ड्रेन' होता. तो अद्याप सुरू आहे. त्यामुळे प्रिंटमध्ये फार कमी प्रमाणात चांगल्या प्रतिभा ऊरल्या आहेत किंवा येत आहेत. मुख्य म्हणजे बहुतांशी वृत्तपत्रे चालवणाऱ्यांना प्रतिभेशी फारसे देणेघेणे उरलेले नाही. मी गेली किमान पंधरा वर्षे पत्रकार होऊ पाहणाऱ्यांच्या मुलाखती घेतोय. डबल-ट्रिपल एम. ए., एम. फिल., पीएच.डी.चे रजिस्ट्रेशन झालेले वगैरे. काहींकडे इतर पदव्याही. थोडेफार इतर कोर्सेसही केलेले. पण, इंग्रजी सोडा, मराठी देखील नीट लिहिता येत नाही. किरकोळ भाषांतर नीट करता येत नाही. न्यूज व्हॅल्यू, न्यूज सेंस वगैरे तर नंतर आणि भाषेचे लालित्य वगैरे तर त्याही नंतर येते. त्या व्यक्तिंचा दोष नाही. असे लोक पूर्वीही वृत्तपत्रांत येत. पण, त्यांना शिकवणारी प्रतिभावंत चमू न्यूजरूममध्ये असायची. मुळात त्या व्यक्तीलाही शिकण्याची आवड असायची. दोन्हीकडे ध्यास होता...शिकण्याचा-शिकवण्याचा. त्यामुळे एखादा अपवाद वगळता या प्रक्रियेतून चांगले-उत्तम-उत्कृष्ट पत्रकार घडायचे. पत्रकारितेचे एक वैशिष्ट्य आहे. ते इतर कोणत्याच व्यवसायात नाही. हे क्षेत्र अनिश्चित आणि अस्थिर तर आहेच. शिवाय, याचे कोणतेच शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याची व्यवस्था अद्याप इतर व्यवसायांसारखी स्थिरावलेली व सक्तीची म्हणून मान्यता पावलेली नाही. त्यामुळे कुणीही पत्रकार होऊ शकतो. इतर क्षेत्रांचे तसे नाही. डॉक्टर, इंजिनीयर, आर्किटेक्ट, वकील, सीए यासारखे काहीही करायचे असेल तर त्या-त्या संस्थात्मक प्रक्रियेतून-प्रशिक्षणातून जावे लागते. रीतसर अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो, परीक्षा द्यावी लागते, उत्तीर्ण व्हावे लागते आणि त्या-त्या व्यवसायाच्या नियामक संस्थांकडे नोंदणी करूनच व्यवसाय सुरू करता येतो. बहुतेकदा या प्रक्रियेतून किमान सरासरी (ॲव्हरेज) प्रॉडक्ट तर निघतेच. पत्रकारितेच्या चक्कीचे तसे नाही. पत्रकारिता करण्यासाठी कोणतेच शिक्षण त्या अर्थाने सक्तीचे नाही. तुम्ही जनसंवाद पदवी-पदविका झाला असलात-नसलात तरी तुम्ही पत्रकार होऊ शकता. जाहिरातींमध्ये तशी सूचना असते. पण, सक्ती कशाचीच नाही. त्यामुळे कुणीही येऊन या क्षेत्रात प्रयोग करू इच्छितो. खरे तर पत्रकारितेचे क्षेत्र इतरांहून अधिक काही तरी मागते. ते ध्यास मागते. अभ्यास-व्यासंग-वाचन-चिंतन मागते. कष्ट मागते. ताण घेण्याची ताकद मागते. शिकण्याची धडपड मागते. टिकण्याची क्षमता मागते. गुरूंपुढे विनम्र होणे मागते. शिकण्याची आवडही नाही आणि शिकवायलाही फारसे कुणी नाही, अशा क्षेत्राचे भविष्य फारसे चांगले नसते. अपवादांचा पुन्हा सन्मान येथे नोंदवला पाहिजे. पण, सध्याची प्रिंटची मराठी पत्रकारिता बहुतांशी अशा स्थितीत आली आहे. त्यामुळे तटस्थता त्यातल्या बहुतेकांना परवडणारी आहे. सोसवणारी आहे. थोड्याफार प्रमाणात प्रतिभासंपन्न लोक शिल्लक आहेत. त्यांनाही तसे व्हावे लागते बहुतेकदा. ही तटस्थता त्यांना समाजात प्राबल्य असलेल्या भोगवादी-चंगळवादी मानसिकतेने बहाल केली आहे. 'मार्केट फोर्सेस' ही अदृश्य ताकद, जिच्यामागे सगळे फरफटत चालले आहेत. कुणी जाहीरपणे बोलणार नाही, पण पत्रकार स्वतःचेच प्रश्न सोडवू शकत नाहीत हे वास्तव आहे. बहुतेक पत्रकारांचे संसार तुटपुंज्या पगारावर चाललेले आहेत. अनेक लोक पत्रकारितेखेरीज अन्य कामेही (भाषांतर, प्रूफ रीडिंग, पेज मेकिंग, प्रेस नोट तयार करून देणे इत्यादी) करतात आणि कसेबसे घर चालवतात. बहुतेकांना देशाच्या संसदेने तयार केलेल्या वर्किंग जर्नालिस्ट्स कायद्याप्रमाणे वेतन मिळत

> 'पत्रकार सर्व प्रकारची 'वैचारिक आयुधे' वापरीत असतो....ज्या ऐतिहासिक, तात्त्विक सांस्कृतिक 'आयुधां'चा आधार पत्रकार घेत असतो; त्या विषयांचा सखोल वा सविस्तर अभ्यास करणे त्याला शक्य होत नाही. 'वर्तमाना'च्या लाटांवर आरूढ झालेल्या पत्रकाराला समुद्राची खोली वा व्याप्ती समजण्यासाठी त्या लाटांवरून उतरावे लागते.'
>
> (मनोगत - 'त्रिकालवेध')



नाही. रजा मिळण्याची सोय नाही. वेठबिगारी करणाऱ्यांची संख्या मोठी. रोजगाराची परिस्थिती अशी आहे, की मिळेल त्यात भागवण्यावर बहुतेकांना समाधान. अशा लोकांनी समाजाचा–व्यवस्थेचा 'वॉच डॉग' किंवा जागल्या वगैरे व्हायचे कसे आणि कशाच्या बळावर? जे स्वतःच अत्यंत कठीण स्थितीत दिवस काढताहेत, असे पत्रकार समाजासाठी काय करू शकतील? त्यांना तटस्थ होणे परवडते. त्यामुळे ते तसे झालेले आहेत. यात दोष कुणाचाही नाही. एकूण व्यवस्थेचा आहे. ही तटस्थता पत्रकारितेत आपसूक आलेली नाही. ती व्यवस्थेतून आणि समाजातून पत्रकारितेत शिरलेली आहे आणि पत्रकारितेने नाईलाजास्तव तिचा स्वीकार केलेला आहे. पण, भविष्यात याचा धोका समाजाला आणि लोकशाहीला होणार आहे. पत्रकार तटस्थ होतो तेव्हा ती तटस्थता फक्त न्यूजरूमपुरती राहत नाही. पत्रकाराला कशाचेच काहीच वाटत नाही तेव्हा समाजात दिशाहीनता पसरत असते. सध्याची अस्वस्थता तशीच आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ वगैरे म्हणून जिला नावाजले जाते, ती पत्रकारिता लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी कोणती आयुधे वापरू शकते? तिच्याकडे ती ताकद आहे काय? तिच्याकडे तो अधिकार आहे काय?...प्रश्न अनेक आहेत, उत्तरेही आहेत. शोधायला सुरुवात कुणी करायची आणि बदल कुणी करायचे हा मुद्दा आहे. सारे काही संपलेले नाही. वृत्तपत्रे–टीव्ही आणि एकूण मीडिया पाहिला तर आशेची अनेक किरणे शिल्लक आहेत. चांगले संपादक आहेत. पत्रकारही आहेत. इतर प्रतिभावंत लोकही या क्षेत्रात आहेत. ध्येयवादीही शिल्लक आहेत. खाजगी व्यवसाय असला तरी त्याचा समाजमनाच्या मशागतीशी संबंध आहे, हे ध्यानात ठेवणारे मालकही (थोडेफार का होईना) शिल्लक आहेत. या सर्वांच्या भरवशावर पुन्हा झेप घेतली जाऊ शकते. तटस्थतेची भिंत मोडून पत्रकारिता पूर्वीसारखी व्रतस्थ व्हायची असेल तर आधी न्यूजरूम आणि न्यूजरूमच्या बाहेरही प्राणपणाने लढणाऱ्या गड्याच्या पाठीशी कुणालातरी उभे राहावे लागेल. काहीतरी त्याला आश्वस्त करणारे घडवावे लागेल आणि मग पाठीवरती थाप देऊन लढ म्हणावे लागेल. स्वतः अन्याय सोसत राहणारा माणूस कुणालाच न्याय मिळवून देऊ शकत नाही आणि कुणाचा जागल्याही होऊ शकत नाही. तो तटस्थ होऊ शकतो. त्याला तेवढेच परवडते.


**– शैलेश पांडे**

भ्रमणध्वनी : ९६८९९१७८०३

pandeshailesh2003@yahoo.co.in



ग्रंथाली

## २५ डिसेंबर - वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके





**माध्यमयात्रेतील माणसं**

रविराज गंधे

**माध्यमविषयक**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




**नोबेलनगरी २०२०**

सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते

**नोबेलविषयक कथा**

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

# केतकरांचे ‘ते विधान’ व महाराष्ट्राचे वर्तमान धर्मकारण



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**हेमंत प्रकाश राजोपाध्ये**

*...त्यासाठी हिंदू (वैदिक व पौराणिक), बौद्ध आणि जैन अभिजात धर्मपरंपरांचा, त्यांतील धारणांचा ऐतिहासिक चिकित्सेच्या अंगानं, अकादमिक शिस्तीत, मुळापासून अभ्यास करणं गरजेचं आहे. केतकरांसारख्या अभ्यासू विद्वानांच्या किंवा पुरोगामी विचारकांच्या विधानांचा विशिष्ट धर्मद्वेषपर असा विपर्यस्त अर्थवाद व तत्सम ट्रोलिंग याला समर्पक उत्तरदेखील यातूनच मिळणार आहे.*

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निधनानंतर ज्येष्ठ पत्रकार, संपादक कुमार केतकर यांनी केलेलं एक विधान त्यावेळी आत्यंतिक खळबळजनक ठरलं होतं. ‘विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदींचे पंतप्रधानपदासाठी नाव जाहीर झाल्यावर हिंदुत्ववाद्यांच्या वाढत्या आक्रमक हालचालींच्या पृष्ठभूमीवर ही हत्या झाली आहे’ अशा आशयाचं जाहीर विधान केतकरांनी केलं होतं. हे विधान भारतीय जनता पक्षाच्या संभाव्य राजकारणावर थेट शाब्दिक हल्लाच होता. केतकरांचं ते विधान अनेक हिंदुत्ववादी प्रवक्ते, समाजमाध्यमांवरील कार्यकर्ते, ट्रोल्स वगैरे मंडळींद्वारे आजही हिणकस, तुच्छतापर अंगानं उद्धृत होत असतं. दाभोलकरांच्या हत्येची बातमी व केतकरांचं ते विधान आलं त्यादरम्यान मी जर्मनीत माझ्या डॉक्टरेटसाठीच्या प्रबंधाचं काम सुरू करत होतो. तिथल्या मराठी मित्रमंडळींमधले एखाददोन अपवाद वगळल्यास बहुतांश सर्वांनाच केतकरांचं ते विधान आत्यंतिक टोकाचं, व्यक्तिद्वेष्टं वाटलं होतं. दाभोलकरांच्या हत्येच्या बातमीला पचवू न शकलेल्या मलाही ते विधान काहीसं विनाकारण किंवा उद्वेगातून आलेल्या घाईत केलं गेलं असावं, असं वाटलं होतं. मात्र त्यादिवशी मित्रांसोबत झालेल्या गप्पांनंतर घरी आल्यावर झोपताना फेसबुकवर नजर टाकली असता माझ्या मित्रयादीतील, नातेवाईक मंडळींतील बहुतांश मंडळी एकीकडे त्या खुनाविषयीची अनपेक्षितता, धक्का व थोडंफार झालेलं दुःख व्यक्त करत असतानाच, दाभोलकरांच्या ‘हिंदूविरोधी’ भूमिकेवर बोलत होते. बहुतांश पोस्ट्सचा सूर हा ‘हिंदू लोक तरी किती काळ भावना दुखावून घेणार!’ असा होता. (अर्थातच मोदी, त्यांच्या पक्षाचं जनमानस ढवळून काढणारं राजकारण व त्याची योग्यायोग्यता इथे चर्चेला घ्यायची नसली तरी,) केतकर आपल्या विधानातून ज्या सामूहिक आक्रमकतेकडे निर्देश करत होते, ते तितकं निराधार किंवा घाईत केलेलं नाही याची थोडीशी जाणीव मला त्याक्षणी झाली. समाजातील तत्कालीन वाढतं राजकीय चलनवलन केवळ आक्रमकता म्हणून किंवा एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाचा किंवा संघटनेचा अजेंडा म्हणून निकालात काढावं इतकी सामान्य आणि क्षुल्लक बाब ही राहिलेली नाही हे संबंधित राजकारणाचा वाढता जनाधार पाहताना आता लक्षात यायला हवं. हा जनाधार केवळ रामजन्मभूमी आंदोलनातून वाढला का?


गुजरात दंगलीतील हिंदुत्ववादी आक्रमकतेविषयीच्या 'मस्क्युलाइन' आकर्षणातून वाढला का? केवळ सावरकर, गोळवलकर यांच्या वैचारिक मांडणीतून हे सारं मंथन होतं आहे का? असे शेकडो सवाल आता समाजशास्त्राच्या अभ्यासकांसमोर उभे राहून खुणावत आहेत. त्यामुळेच हिंदुत्ववादाच्या उदयाविषयी जॅफ्रोले, कॉनरॅड एल्स्ट, लॉरेन्स बॅब यांसारख्या पाश्चात्त्य अभ्यासकांच्या किंवा राजमोहन गांधींपासून पुरुषोत्तम अग्रवालांनी केलेल्या मांडणीच्या पल्याड जायची गरज असल्याच्या वास्तवाकडे बघण्यासाठी आजचं प्रत्यक्ष आणि समाजमाध्यमांवरचं समाजकारण भाग पाडणार आहे.

१९४३ सालच्या कॅनडामधील क्विबेक इथे भरलेल्या पॅसिफिक रिलेशन्स कॉन्फरन्स या परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाठवलेल्या 'श्री. गांधी आणि अस्पृश्यांची मुक्ती' या विषयावरील निबंधात काँग्रेसच्या आणि गांधीजींच्या अस्पृश्यांविषयीच्या भूमिकेवर विस्तृत व नेमके आरोप केले होते. या कॉन्फरन्समध्ये हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील तत्कालीन वाद हा राजकीय सत्तेसाठी सुरू असून दलितांचा लढा हा खऱ्या अर्थी मुक्तीचा लढा असल्याचं प्रतिपादन केलं होतं. या निबंधात आंबेडकरांनी म्हटल्यानुसार 'जात हीच हिंदुस्थानातील धर्म असल्यामुळे' भारतीय राज्यघटनेनं जातिव्यवस्थेची योग्य दखल घेऊन त्यानुसार राजकीय व्यवस्था स्वीकारणं आवश्यक आहे.

धार्मिक अस्मितांचं आक्रमक राजकारण, केतकरांच्या विधानावर आलेल्या प्रतिक्रिया हे सारं लक्षात घेता 'हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील तत्कालीन वाद हा केवळ राजकीय सत्तेसाठी सुरू' हे आंबेडकरांचे महत्त्वपूर्ण निरीक्षण चिंतनीय ठरतं. हिंदू आणि मुस्लीम या राजकीय सत्तेसाठी झगडणाऱ्या दोन समूहांचा हा उल्लेख मोघम असला तरी त्या त्या धर्मातील उच्चजातीय, उच्चभ्रू वर्गाकडे बाबासाहेबानी अंगुलीनिर्देश केला होता हे उघड आहे. या दोन्ही वर्गांकडे फाळणी होऊन संबंधित देशांमधील राजकीय सत्ता मिळाली असली तरी स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षांनी आज या दोन्ही वर्गांच्या राजकीय उत्तराधिकाऱ्यांनी स्वतःची, स्वतःच्या राजकारणाची आणि पर्यायानं संबंधित समाजांची केलेली अवस्था आज आपणा सर्वांना रोज अनुभवाला येते आहे. देशातील आणि महाराष्ट्रातील समाजकारण हे धर्मभावना, सामूहिक आणि सांस्कृतिक अस्मिता यांच्याभोवती फिरण्याच्या प्रक्रियेचं मूळ कारण या संबंधित देशातील उच्चभ्रूंच्या आणि 'अपवर्डली मोबाइल' झालेल्या मध्यमवर्गाच्या सत्ताकांक्षेत दडलं आहे. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या धर्मकारणाचा मागोवा घेताना हे सूत्र मला अतिशय महत्त्वाचं वाटतं. उपखंडातील व भारतातील व्यापक राजकारण व सत्ताकारणाचा भाग असलेलं महाराष्ट्राचं धर्मकारणदेखील ओघानं याच वर्गांभोवती रेंगाळत आलं आहे. याच उच्चभ्रूकेंद्री धर्मकारणाच्या इतिहासाचा वर्तमानातून मागोवा घेत काही प्रश्न मला उभे करावेसे वाटतात.

राज्यशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक जयंत लेले यांनी 'Community, Discourse and Critique in Jnanesvar' या निबंधात प्रतिपादित केल्यानुसार समूहनामक व्यवस्थेची शक्ती ही तिचं वर्तमान रूप आणि तिच्या ठायी असलेल्या सुप्त, अज्ञात रूपातील बहुगामी क्षमता यांच्यातील सहसंबंधांतून आकाराला येत असतं. लेले यांचं हे प्रतिपादन मला या उच्चभ्रूकेंद्री धर्मकारणाच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचं वाटतं. साधारण २००३-०४ साली मी संस्कृत विषयात बी.ए. करत असताना फर्ग्युसन महाविद्यालय आणि स.प. महाविद्यालयातील संस्कृत विभागात संस्कृतकेंद्री समाजव्यवस्थेचं अग्रस्थान मिरवणाऱ्या जातवर्गांतील विद्यार्थ्यांहून, विशेषतः नगर जिल्ह्यातील व मराठवाड्यातील बहुजन समजल्या जाणाऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती. यातील बहुतांश विद्यार्थी आळंदीच्या कीर्तनशाळेतील होते. काही लोक संस्कृत शास्त्रं, उदाहरणार्थ- न्याय, मीमांसा, व्याकरण इत्यादी विषय शिकण्यासाठी वाराणसीतील वेगवेगळ्या पाठशाळा आणि विद्यापीठांत जात. (या विद्यार्थ्यांना संबंधित पाठशाळादि व्यवस्थांमध्ये नमूद केलेली शास्त्रं शिकवली जात असली, तरी वेद शिकवले जात नाहीत.) लेले यांनी निर्देश केलेल्या ह्या बहुगामी क्षमतेच्या उद्दीपनाची आणि उन्नयनाची दिशा काय होती, हे दिसून येतं. याच सुमारास ऑर्कुट नावाचं समाजमाध्यम व्यासपीठ आकाराला येत होतं. मराठी शहरी तरुण मध्यमवर्गात ते लोकप्रिय होत होतं. याच दरम्यान २००५ साली भांडारकर संस्थेवर झालेला हल्ला, त्या घटनेचे ऑर्कुटसारख्या माध्यमांवर दिसून आलेले परिणाम इत्यादींमुळे या उद्दीपनाचे आणखी काही आयाम आकाराला येत असल्याचं दिसून आलं. या हल्ल्यानंतर उदय झालेल्या ऑर्कुटवरील संबंधित जाती, उपजाती इत्यादींच्या समूहांतून दिसून येणारा विखार किंवा विविध जातसंस्था, त्यांची संमेलनं आणि प्रकाशनांतून जातीय विद्वेष आणि अहंकाराचे फुत्कार उघड किंवा अप्रत्यक्षरीत्या समोर येत होते. या सगळ्यातून झालेल्या मोबिलायझेशनचं आरंभीचं रूप निमशहरी, ग्रामीण भागातील ब्राह्मणेतरवर्गाच्या राजकीय जागृतीचं निदर्शक होतं, असा एक मतप्रवाह तेव्हा ऐकू येत होता. अगदी मा. शरद पवारांसारख्या द्रष्ट्या, व्यासंगी नेत्यांनी राजीव खांडेकर यांना दिलेल्या एका

> 'इतिहास आणि मानसशास्त्र एकमेकांमध्ये इतके घट्टपणे गुंफलेले आहेत, की ते वेगळे करायचा प्रयत्न केला, की दोन्ही अर्थशून्य होतात. ती गुंफण, ती वीण, ते धागे जर नीट समजून घेतले तर आपले 'सिव्हिलायझेशन' हे एक ऐतिहासिक, रोमांचकारी नाट्य होते. थरारनाट्यसुद्धा.'
> (लोकसत्ता, ८ ऑगस्ट- २००९ 'त्रिकालवेध' पृ. १६०)



जुन्या मुलाखतीत 'या घडामोडींद्वारे बहुजन समाजात अभूतपूर्व जागृती झाल्याचं' सांगितलं होतं. मात्र हळूहळू या संघर्षातून ब्राह्मण आणि मराठा या उच्च जातींच्या सांस्कृतिक सत्तासंघर्षाचं बटबटीत दर्शन समोर येऊ लागलं. याची अकादमिक अंगानं तपशीलवार मांडणी अद्याप झालेली नसली तरीही त्या राजकारणाचं वरकरणी दिसणारं रूप भलत्याच दिशेला घेऊन गेलं, हे काहीच वर्षांत दिसून आलं. रा.स्व. संघाच्या वसंतराव भागवतांनी आकाराला आणलेल्या 'मा.ध.व.' समीकरणाच्या साहाय्यानं मराठाकेंद्री बहुजन राजकारणाला शह देणारं ओबीसी समाजाचं राजकारण उभं करण्यात उजव्या राजकारणाला लक्षणीय यश आल्याचं दिसून येतं. हिंदुत्ववादी विचारधारेकडे मराठेतर बहुजन समाज ज्या रीतीनं आकर्षित झाला त्या रीतीच्या मुळाशी असलेल्या ऊर्ध्वगामी गतिमानता लक्षात घेताना डॉ. आंबेडकर आणि डॉ. जयंत लेले यांच्या मांडणींची अगत्यानं आठवण होते.

आंबेडकर आणि लेले यांनी केलेल्या प्रतिपादनातून अधोरेखित होणारं भारतातील समाजकारण, धर्मकारण प्रामुख्यानं आपल्या उच्चवर्ण, उच्चवर्गकेंद्री जाणिवांच्या मर्यादांना ओलांडण्यासाठी आजही तयार नाही. भारतीय धर्मकारण आणि संस्कृतिकारण हे विशिष्ट रीतीच्या श्रद्धा, स्मृतींच्या आधारावर आकाराला आलेलं असतं. किंबहुना सर्वच समाजांमधली सांस्कृतिक, राष्ट्रीय आणि श्रद्धापर विश्वं काही मिथकात्म स्मृतींवर बेतलेली असतात. समाजातील जातीय उतरंडीला, धार्मिक-भाषिक अधिसत्तेला झुगारून देत आध्यात्मिक मुक्तीचा मार्ग खुला करण्याची वारकरी मार्गातून ज्या बहुजनांसाठी झाली तो बहुजन समाज गेल्या काही दशकांत अतिशय वेगानं व लक्षणीयरीत्या संस्कृत प्रामाण्यवादी, ब्राह्मणकेंद्री व्यवस्थांच्या custodianच्या नव्या भूमिकेत बेमालूम रीत्या शिरला. गेल्या काही दशकांत आकाराला आलेल्या या राजकारणाची, संस्कृतिकारणाची चिकित्सक मीमांसा करण्याची मुभा आज मराठी अभ्यासकीय विश्वात उरली आहे का? ज्या संस्कृतनिष्ठ परंपरांना आणि त्यातून घडवलेल्या कल्पित कथित देशीपणाला त्यागून पाश्चात्य जीवनशैलीला, भाषांना जवळ करणाऱ्या उच्चवर्गात फोफावत जाणाऱ्या कृत्रिम पुनरुज्जीवनवादाची कारणं नेमकी काय आहेत? उच्चभ्रू अभिजनवर्गाच्या सांस्कृतिक अस्मितांचं आणि व्यवस्थांचं रक्षण करण्यासाठी आपलं बळ कामी आणणाऱ्या बहुजन हिंदू अस्मितांचं ऐतिहासिक मॅपिंग नेमकं कोणत्या चौकटीत करायचं? हिंदुत्ववाद व त्याची ऐतिहासिक अभिरूपं हा केवळ ब्राह्मणजात समूहकेंद्री किंवा श्रुतिस्मृतिकेंद्रीच होती का, या व अशा अनेक प्रश्नांना सामोरं जाण्याचं धाडस पुरोगामित्व मिरवणाऱ्या संघटना आणि राजकीय पक्षांना करावं लागणार आहे. त्यासाठी हिंदू (वैदिक व पौराणिक), बौद्ध आणि जैन अभिजात धर्मपरंपरांचा, त्यांतील धारणांचा ऐतिहासिक चिकित्सेच्या अंगानं, अकादमिक शिस्तीत, मुळापासून अभ्यास करणं गरजेचं आहे. केतकरांसारख्या अभ्यासू विद्वानांच्या किंवा पुरोगामी विचारकांच्या विधानांचा विशिष्ट धर्मद्वेषपर असा विपर्यस्त अर्थवाद व तत्सम ट्रोलिंग याला समर्पक उत्तरदेखील यातूनच मिळणार आहे. मात्र ट्रोलिंगला ट्रोलिंगनं उत्तर देण्याचे नवनवीन रस्ते शोधणाऱ्या कुठल्याही बाजूच्या संघटनेची,पक्षांची असा अभ्यास करण्याची, कार्यकर्त्यांना शिक्षित करण्याची तयारी आणि मानसिकता आज दिसत नाही.

महाराष्ट्राचं धर्मकारण हे उत्तरेकडील गायपट्ट्यासारखं सरंजामी नसलं तरी त्यात इथल्या मातीतील खासा सरंजामीपणा निश्चित आहे. या सरंजामी वृत्तीची अभिव्यक्ती प्रतिगामी समजल्या जाणाऱ्या वैचारिक, सांस्कृतिक वर्गातून ज्या रीतीनं दिसून येते तशीच ती पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या वर्गातूनदेखील सर्रास मिरवली जाते. हे सरंजामी वास्तव मांडण्याची आणि स्वीकारण्याची गरज जोवर प्रामाणिकपणे मान्य केली जात नाही तोवर महाराष्ट्रातील धर्मकारण आणि पर्यायानं समाजकारण व राजकारण खऱ्या अर्थी प्रागतिकतेकडे पाऊल टाकत आहे असं म्हणता यायचं नाही. तोवर पुरोगामी असण्याच्या कितीही बाता मारल्या, तरी त्या बातांचं महत्त्व बोलाच्या कढीइतकंच असेल, हे किमान आतातरी आपण समजून घ्यायला हवं.

**– हेमंत प्रकाश राजोपाध्ये**
भ्रमणध्वनी : ७०६६४६३३६६
rajopadhyehemant@gmail.com


ग्रंथाली

**शिल्पा जितेंद्र खेर यांची तीन पुस्तके**

**यश म्हणजे काय? भाग १ व भाग २ आणि राम-आयन**








**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.** **मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.** **मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

# कुमार केतकर आणि इंटलेक्च्युअल ॲक्टिव्हिझम



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**धनंजय गांगल**

लहानपणीच्या ‘कुमारकाका’मधलं काकापण त्याच्या लोभस स्वभावामुळे आपसूकच कधी विरघळून गेलं ते नीटसं आठवतही नाही. वय, प्रज्ञा, अनुभव, पद या सगळ्याच अंगानी कोसो मैल ज्येष्ठ असलेल्या कुमार केतकर यांचा उल्लेख मी कुमार म्हणूनच करतो, कारण त्याशिवाय त्याच्याविषयी लिहिणं मला शक्य होणार नाही. मला त्याच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधीही कधी आली नाही. मला त्याच्याशी कुठल्या विषयावर मोठा वाद-चर्चा केल्याचंही आठवत नाही. जसं अपघाताच्या दोन-चार क्षणांत जीवनाची खोली समजते तसंच एखाद्या नाट्यमय घटनेतून माणूस पटकन उमजतो. पण तसे काही नाट्यमय प्रसंगाना आम्ही सह-सामोरे गेलोय असंही नाही. माझ्याकडे कुमारबद्दल सांगण्यासारखे किस्से किंवा ड्रॅमॅटिक असं काही नाही. Kumar has an uncanny knack of acknowledging existance of everyone around him and I was always one among the blessed ones, of course, in silence. आता मागे वळून पाहताना वाटतं, माझ्या घडण्याच्या वयात कुमारनं वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांचा, त्याच्या लेखांचा, भाषणांचा खूप खोलवर प्रभाव आहे. मला कुमार उमगतो तो एकसंध नाही तर एखाद्या कोलाजसारखा बहुविध इम्प्रेशन्सनी भरलेला. त्यातील जुनी काही इम्प्रेशन्स त्या पिढीतील त्याच्या सुहृदांशी मी ताडून पाहण्याचा प्रयत्न केला खरा, पण त्यांनाही आता पुरेसं स्मरण होत नाही. त्यामुळे तो नाद मी सोडून दिला. असो. कुमारचं बहुपेडी व्यक्तिमत्त्व खरं तर एका लेखात मावणं शक्यच नाही. तरीही एक प्रयत्न करून बघूया.

*कुमारचा विषय निघाला की थोरोचं एक वाक्य मला नेहमी आठवतं– "If a soldier marches out of sync with his companions, perhaps he hears a different drummer."*

माझ्या वैचारिक परिप्रेक्ष्यांत कुमारच्या विचारांचा, लिखाणाचा मोठा वाटा आहे. त्यानं आमच्या पिढीला मध्यमवर्गीय एकरेषीय जाणिवेतून बाहेर पडून अनेक अंगांनी विचार करायला भाग पाडलं. दोन-तीन उदाहरणं देतो. इंदिरा गांधींविरुद्ध देशभर वातावरण असताना ‘ज्वालामुखीच्या तोंडावर’ हे आणीबाणीचं चक्क समर्थन करणारं पुस्तक! त्यानं आणीबाणीआधीचा आंतरराष्ट्रीय पट असा काही उलगडून दाखवला, की त्यात आणीबाणी अपरिहार्य वाटावी. मान्य असो-नसो पण आणीबाणीकडे असंही बघता येतं! हे काहीतरी वेगळच बौद्धिक खाद्य होतं! दुसरं उदाहरण आळेकरांच्या महानिर्वाण नाटकाचं. कुमारनं ॲब्स्ट्रॅक्ट पठडीतल्या त्या नाटकाचे अनेक पदर विलक्षण पद्धतीनं उलगडून दाखवले

आहेत, हे त्यानं नाटकावर लिहिलेल्या एका पुस्तिकेतून कळलं. कुमारनं सुर्वे, प्रमोद महाजन, तेंडुलकर आणि बाळ ठाकरे यांच्यावर लिहिलेले मृत्युलेखही मुळातून वाचायला हवेत. तितक्याच ताकदीचं कुमारनं विजय तेंडुलकरांच्या हिंसेच्या तत्त्वज्ञानावर केलेलं भाष्य! तो लेख 'वीकली'त आला होता. This apparently created a rift between Tendulkar and Kumar. अर्थात नक्की काय घडलं याबाबत त्याच्या समकालीनांचं मत 'राशोमान'प्रमाणे वेगवेगळं आहे.

त्यानं डेली ऑब्झर्व्हर, इकॉनॉमिक टाइम्स, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, लोकमत अशा अनेक वृत्तपत्रांत उच्च पदं भूषवली आहेत. तो काही वृत्त-वाहिन्यांचा सल्लागार संपादक होता. बदलते विश्व, त्रिकालवेध, ओसरलेले वादळ, एडिटर्स चॉईस, विश्वामित्राचे जग, शिलंगणाचे सोने, मोनालिसाचे स्मित, कथा स्वातंत्र्याची, ज्वालामुखीच्या तोंडावर - हा कुमारलिखित विपुल पुस्तकसंग्रह आहे. आजही, तो अनेक डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर विविध विषयांवर लिहीत असतो. त्यानं अनेक परीक्षक आणि अभ्यासक समित्यांवर पदं भूषवली आहेत. हे राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर संगीत, नाटक, सिनेमा, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, अध्यात्म, राजकारण, समाजकारण, अर्थकारण अक्षरसाहित्य - अभिजात कलांपासून जीनोम-मॉलिक्युलर बायॉलॉजीपर्यंत अशी अनेक विषयक्षेत्रं. कला आणि ज्ञानाची अशी एखादीच शाखा असेल ज्यावर तो व्यक्त झाला नसेल. सखोल विचार, परखड विवेचन आणि ठोस भूमिका हे त्याच्या विचारांचे वैशिष्ट्य आहे व तेच लेखनाचे उतरते. तो एकाच विषयावर वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर वेगवेगळी मांडणी करतो. त्यात वरवर विसंगती वाटली तरी तशी अजिबात नसते. तो टार्गेट ऑडियन्स बघून विषयाच्या बौद्धिक खोलीत शिरतो. अनेकदा तो युरोपीय रेनेसाँपासून सुरुवात करतो आणि टप्प्याटप्प्यानं वर्तमानात येतो. तो तात्कालिकतेच्या पलीकडे जाऊन काळाचा पूर्ण पैस मांडतो. कुतूहल, जिज्ञासा, ज्ञान, विवेक, संवेदना, चांगुलपणा, सुसंस्कृतपणा या सगळ्यांना कवेत घेणारा एक छान शब्द आहे - जाणिवा! कुमार वाचक-श्रोत्यांच्या या जाणिवा रुंदावण्याचं काम सातत्यानं करत असतो. विषय कुठलाही आणि कितीही गुंतागुंतीचा असो कुमारची मांडणी सहसा सोप्या शब्दांत, सुस्पष्ट असते आणि उथळ शेरेबाजीपासून मुक्त असते. हे त्याचे विरोधकही मान्य करतील. त्याचा लेख समजला नाही, त्याला टोक आलं नाही असं कधी होत नाही. तो ज्यांच्यापर्यंत पोचायचं आहे त्यांच्यापर्यंत व्यवस्थित पोचतो हे त्यावर आलेल्या प्रतिक्रियांमधून लक्षात येतं. तो संपादकीय प्रकृती म्हणून म्हणून तळवलकर आणि गडकरी यांच्या कुठेतरी मध्ये होता. त्याची पत्रकारिता ही मुख्यतः अत्यंत बौद्धिक, स्वच्छ-मोकळी आणि नागरी राहिली आहे. एखादा प्रश्न वरवर तात्कालिक वाटला तरी त्याला ऐतिहासिक परिमाण असते. त्यांच्या लेखनात त्या प्रश्नाची ची उत्तरे नसली तरी तात्कालिकतेच्या पलीकडे जाऊन ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक पूर्ण पैस ते मांडतात. राजकारण, समाजकारण, संस्कृतीकारण, विज्ञानकारण या सगळ्याच परिप्रेक्षात घडणाऱ्या लहानशा घटनांबद्दल जाणून घेण्यास तो सतत उत्सुक असतो. पण त्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न तो पूर्णपणे राजकारणातून तेही विशेषतः सत्तेच्या राजकारणातून लावण्याचा त्याचा प्रयत्न असतो. तो कुठल्याही संवादात शांतपणे आधी समोरच्याचं ऐकून घेतो आणि मग आपला विचार अत्यंत मुद्देसूद, सुसंगतपणे मांडतो. केवढे संदर्भ तेही तारखेसकट त्याच्या जिभेवर असतात! इंटलेक्चुअल ॲक्टिव्हिझम हा शब्द त्याच्या पत्रकारितेला चपखल बसतो. इंटलेक्चुअल ॲक्टिव्हिझम ही त्यानं आमच्या पिढीला दिलेली देणगी आहे! आणि तो ठेवा सांभाळायला आम्ही चांगलेच कमी पडतोय!


धनंजय गांगल, कुमार केतकर, वसंत लिमये आणि सचिन खेडेकर

चांगल्या नेतृत्वानं जोखीम घेणं टाळायचं नसतं. चुका, त्रुटी टाळण्याचा किती प्रयत्न करायचा याला मर्यादा आहेत आणि झाल्या तर नंतर दुरुस्त करणं हे स्वस्त असतं. नेतृत्वानं वातावरण असं निर्माण करायचं की सहकाऱ्यांना जोखीम घेताना त्या नेतृत्वाची भीती नाही तर आदर आणि आधार वाटेल. दुसरं म्हणजे - कुठल्याही संस्थेत अधिकाराची श्रेणीबद्ध उतरंड (हायराकिकल) असलेली रचना असते. सर्वात कनिष्ठ अधिकारावर असलेल्या व्यक्तीला अत्यंत वरिष्ठ व्यक्तीशी काही संभाषण करायचं असेल तर त्याला वरिष्ठांशी आणि खुद्द स्वतःशी थेट बोलण्याचं स्वातंत्र्य चांगल्या नेतृत्वानं दिलं पाहिजे. कुमारबरोबर काम केलेल्या त्याच्या सहकाऱ्यांकडून ऐकलंय त्यावरून हे कुमारला तंतोतंत लागू होतं. कुमारची वृत्ती एखाद्याला पत्रकारितेत एका ठिकाणी एका विशिष्ट टप्प्यापुढे जाण्याची संधी नसल्यानं, त्याच्या गुणवत्तेला इतरत्र

वाव देण्याची, त्याला नव्या कोंदणात पाठवण्याची होती. एखादा अग्रलेख आवडल्याचं कुणी सांगितलं तर तो ज्याने लिहिला असेल त्या सहकाऱ्याचं नाव अभिमानानं सांगणारा असा संपादकही अपवादानंच आढळेल.

आत्ममग्न मध्यमवर्ग आणि लोहियावादी ह्या कुमारच्या आवडीच्या पंचिंग बॅग्ज! ८०-९०च्या दशकात जसजसं आर्थिक स्थैर्य येऊ लागलं तसतसा आपल्या कोशात गेलेला मध्यमवर्ग! जेव्हा मध्यमवर्ग फक्त आत्ममग्नच होता तेव्हा वाटायचं, कुमार उगाचच अति टीका करतोय. पण आता भाजपा आयटी-सेलच्या पौष्टिक खुराकावर पोसून त्याच मध्यमवर्गाला चढलेला मद बघितला तर शहारून येतं. ज्या वर्गाकडून देशाच्या बौद्धिक नेतृत्वाची अपेक्षा करायची त्याची अशी अवनत अवस्था पाहून दुःख आणि भीती वाटते. त्याच वेळेस आश्चर्य वाटतं की कुमारला त्यावेळेसच ह्याची foresight होती! तीच गोष्ट लोहियावाद्यांची. केवळ इंदिराजींना टोकाचा विरोध केला म्हणून कुमारचा त्यांच्यावरचा राग त्यावेळी अनाठायी वाटायचा! पण एकच उदाहरण म्हणून नितीशकुमारच्या कोलांट्याउड्या बघितल्या तरी कुमारचं त्यांच्याबाबतचे विश्लेषण त्यावेळी काळाच्या खूप पुढे होतं हे लक्षात येतं. २००९ चा लोकसभा निवडणूक निकाल आणि त्यानंतरच्या शक्यता यावर त्यावेळच्या 'स्टार माझा'नं केतकरांचे सात ऑप्शन्स असा कार्यक्रम केला होता. तेव्हा काँग्रेसचा पूर्ण पराभव होऊ शकतो हीही शक्यता धरून कुमारनं मांडणी केली होती. हे एक लहानसं उदाहरण. कुमार हे विश्लेषण कुठलाही अभिनिवेश किंवा पूर्वग्रहदूषितता न बाळगता करत असतो. पण गेल्या काही वर्षांतलं याला छेद जाईल असं कुमारबाबत माझं एक निरीक्षण आहे. मारिओ पुझोच्या क्लासिक गॉडफादरमध्ये मायकेल कोरेलिओनीच्या तोंडी एक वाक्य आहे- Never hate your enemies. It affects your judgement. सध्या कुमारची निवडणुकीच्या संदर्भातील भाकितं वारंवार off-the-track असतात.

मला अंधुकसं आठवतंय त्याप्रमाणे बहुतेक 'सांस्कृतिक आव्हान' किंवा अशाच एका लेखात पसायदानाचा उल्लेख कुमार 'ज्ञानेश्वरांचा मॅनिफेस्टो' असा करतो आणि पुढे त्याचं समर्थनही करतो, की '' 'ज्ञानेश्वरांचा मॅनिफेस्टो' असा शब्दप्रयोग करणंच मराठी शुचिर्भूतांना खटकेल, पण त्यांना तो खटकावा म्हणूनच केला आहे.'' असा खट्याळपणा कुमार करणार. एकीकडे त्याच्या वृत्तपत्रात त्याच्या मताचा प्रतिवाद करणारा लेख अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करत छापणार. दुसरीकडे तो आणीबाणी आणि पर्यायानं येणाऱ्या अभिव्यक्तिसंकोचाचं समर्थन करणार. सर्वसामान्यपणे संकेत असा आहे, की विरोधी विचारसरणींच्या लोकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात पुरोगाम्यांनी सहभागी होऊ नये. तो औचित्यभंग आहे असं अनेकांना वाटतं. पण 'हीच ती वेळ, हाच तो क्षण' मानून अचूक वेध घेत ब्राह्मणसभेच्या महाअधिवेशनात जाऊन ब्राह्मण आणि ब्राह्मण्य या शब्दांची-संकल्पनांची चिरफाड करून त्याची रोखठोक भूमिका मांडणारा, सर्वसाधारण डाव्या विचारांचा असूनही ग्लासनोस्त, पेरेस्त्रोइका आणि जागतिकीकरण यांचं स्वागत करणाराही कुमारच. तो नेहरू-गांधी घराण्याची पाठराखण करतो, पण काँग्रेस पक्ष म्हणून आणि एकूणच डाव्यांवर टीकाही करतो. संघपरिवार हा त्याच्या टीकेचं बऱ्याचदा लक्ष असलं तरी त्याला पद्मश्री मिळाली ती वाजपेयी-सरकारच्या काळात. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पूर्णवेळ इंग्रजी पत्रकारिता करण्याचे पर्याय उपलब्ध असूनही तो हिरिरीनं मराठीत व्यक्त होत राहिला. तेही कुठला अभिनिवेश न बाळगता. शिवसेनेविरुद्ध सतत एडिटोरिअल-लाइन धरणारा कुमार, 'टाइम्स'नं आर.के. लक्ष्मण यांच्यावर केलेल्या पुस्तक प्रकाशनासाठी कुठलाही पूर्वग्रह न ठेवता बाळ ठाकरेंना बोलावणारा कुमारच! त्या कार्यक्रमात 'युअर हॅन्ड इज शेकिंग, माय हॅन्ड इज शेकिंग - इट्स अ रियल शेकहॅण्ड!' ही दोघांची आठवण आवर्जून सांगणाराही कुमारच. मार्क्स, लेनिन, स्टॅलिन यांच्याविषयी लिहिणारा कुमारच आणि व्हाया लोकमान्य टिळक - आयन रँडविषयी कुतूहल असणारा कुमारच. इंदिराजींच्या समाजवादाचे समर्थन करणारा आणि मनमोहनसिंगांच्या आर्थिक सुधारणांवर भरभरून लिहिणारा कुमारच. कुमारला चॅनेलवर संबित पात्रासारख्या गृहस्थाशी वाद घालायला लागावा याचा आम्हाला त्रास होतो. पण कुमार त्याचा हट्ट सोडत नाही. तो भिडतो. तो राज्यसभेवर जाईल जाईल वाटतं होतं तेव्हा तो गेला नाही. आता, राज्यसभेच्या नशिबात कुमार नाही असं वाटत असताना तो अचानक राज्यसभेत दाखल झाला. तेही एवढी वर्षं टाळलेला काँग्रेसप्रवेश करून. आणि अशा वेळी, की काँग्रेस पक्ष इतिहासात सर्वात दयनीय अवस्थेत आहे! खरं तर भरलेलं आपल्या सगळ्यांचंच जगणं अशा थोड्याफार विसंगतीनं असतं. पण कुमारच्या बाबतीत ते उठून दिसतं.

मला नेहमी जाणवतं - Kumar is a very consummate person, hampered by his love for Nehru-Gandhi Family. भक्त या शब्दाला सध्या वेगळा अर्थ प्राप्त झाला आहे. आपल्या विरोधकांचा टोकाचा विद्वेष हे एकक त्याला प्राप्त झालं आहे. त्यामुळे मी कुमारला चाहता असा शब्द वापरीन. कुमार नेहरू-गांधी कुटुंबाचा निस्सीम चाहता आहे आणि ते सर्वश्रुत आहे. त्याचा दृढविश्वास ते कधीही चुकत नाहीत हा आहे. राजकीय अपरिहार्यता म्हणून एकवेळ जेपींनी संघाला मुख्य धारेत आणलं आणि इंदिराजींनी आणीबाणी लादली या दोन्ही निर्णयांचं समर्थन होऊ शकेल, पण आपल्याला एकविसाव्या शतकात नेणाऱ्या पंतप्रधानांचं शाहबानोबाबतचं वर्तन? त्याचे कुठल्याच प्रकारे समर्थन होऊ शकत नाही. किंबहुना नव-हिंदुत्ववादाला खतपाणी घालण्यात अप्रत्यक्षपणे, अजाणता त्या घटनेचा मोठा हात आहे. त्याबाबत कुमारनं राजीव गांधींच्या निर्णयाविरुद्ध भूमिका घ्यायला पाहिजे होती. It was his moral obligation. पण आठवतंय त्याप्रमाणे त्यानं संदिग्ध भूमिका घेतली. त्याचं बहुआयामी, बहुपेडी अत्यंत प्रज्ञावान व्यक्तिमत्त्व नेहरू-गांधी घराण्याच्या या प्रेमामुळे बऱ्याचदा झाकोळलं जातं याचं दुःख होतं.

अरुण साधू हे कुमारच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होते. कुठल्याशा मुलाखतीहून परत येताना गाडीत साधूकाका अस्वस्थ दिसले. मुलाखतीत वारंवार तुम्ही 'सिंहासन' कादंबरीत

राजकारण्यांची parody - थट्टा – छान उडवली आहे असे उल्लेख होत होते. साधूकाका म्हणाले की मी राजकारण समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे – अत्यंत गंभीरपणे आपण त्याकडे बघितलं पाहिजे. सिंहासन म्हणजे राजकारणाचे विडंबन आहे असं वाटत असेल तर माझी ती कादंबरी फसली आहे असं म्हणावे लागेल! या नवं–मध्यमवर्गाचा एकूणच जीवनाकडे आणि विशेषतः राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा असा उथळ आहे. या प्रचंड लोकसंख्येच्या लोकशाहीत, होणाऱ्या विकासात, जास्तीत जास्त वाटा आपल्याला मिळावा आणि कमीत कमी कर्तव्यं करायला लागावीत यासाठी प्रत्येकजण कार्यरत असतो. मग कधी जात तर कधी धर्म, कधी भाषा तर कधी प्रदेश अशा वेगवेगळ्या अस्मितांच्या आधारावर एकत्र येत तो दबावगट बनवून फायदे आपल्याला आणि तोटे दुसऱ्याला हे ईप्सित साध्य करण्याच्या प्रयत्नात असतो. त्याचाच एक भाग म्हणजे सतत आपल्यावर अन्याय होतोय हे इतरांना पटवून द्यावं लागतं. One campaigns in poetry but one has to govern in prose. पक्ष, शासन, सरकार, नोकरशाही आणि त्यांच्यामधील व्यवहारातील गुंतागुंत. हे सगळं मध्यमवर्ग बौद्धिक क्षमता असूनही समजून घ्यायला तयार नाही. त्याचं मन खेळाडू क्रीडामंत्री, डॉक्टर आरोग्यमंत्री आणि जनरल संरक्षणमंत्री झाला की प्रश्न सुटतात असं बाळबोध आहे. पक्ष चालवणं, निवडणुका लढवणं यासाठी प्रचंड पैसे लागतात, ते आपण देत नाही. सामान्य लोकांनी पक्षाला आर्थिक साहाय्य्य केलं ते आणीबाणीनंतर जनता पक्षासाठी आणि आता काही प्रमाणात दिल्लीत 'आप'साठी. त्यानंतर नाही. तेव्हा हा वर्ग Vajpayee and Dr MMS have a luxury to project clean image as Bangarus and Kalmadis do that inconvenient work for them - ho nuances हे समजून घ्यायला तयार नसतो. त्यात शीर्ष नेतृत्व जर अविवाहित पुरुष असेल तर तो त्यांना अत्युच्च नि:स्वार्थ वाटतो! कारण शेवटी स्त्रियाच पुरुषाच्या अध:पतनाला कारणीभूत असतात हा खोल रुजलेला दृष्टिकोन. कोपऱ्यात लपून बसून वळणावर सिग्नल तोडल्याबदल्यात ५०/१००/२०० रुपये घेणारा पोलिस हा भ्रष्टाचारी पण कायद्यात लहानशी पळवाट ठेवून किंवा शासकीय धोरणात लहानसा बदल करून कित्येक शेकडो कोटींचा फायदा करून देणारा भ्रष्टाचार त्यांच्या गावीही नसतो. आर्थिक आणि दृश्य असेल तोच फक्त भ्रष्टाचार अशी मध्यमवर्गाची सुटसुटीत कल्पना आहे. भ्रष्टाचार हे एक केवळ उदाहरण म्हणून! पण राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, एकूण सगळ्याच बाबतीत मध्यमवर्गीय जाणिवा ह्या अशा mediocre होत चालल्या आहेत. अण्णा आंदोलनानं अजाणता या mediocrityला बळ दिलं!

'The media is willing to crawl when nobody is even asking it to bend' अडवाणींच्या आणीबाणी संदर्भातील एका निरीक्षणाचा संदर्भ देणारी कुमारचे एक्स्प्रेसमधील सहकारी शेखर गुप्ता यांचीही मुलाखत डिसेंबर २०१४ मधली. त्यानंतर पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं आहे. माध्यमांपासून देशातल्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्वच लोकशाही संरचनांना हे लागू होतं की काय अशी शंका येऊ लागली आहे. अशा वैचारिक पोकळीत Making india great again through redemptive fantasies of past purity ह्या विचारांचं फावतं. वर्तमानकाळ जेव्हा गोंधळलेला असतो, त्यामुळे भविष्यकाळ संदिग्ध होण्याची शक्यता असते आणि ठाम बौद्धिक नेतृत्वाचा अभाव काल्पनिक भव्य इतिहासात उत्तरं शोधण्यास भाग पडतो. नव्या हिंदुत्ववादाच्या उन्माद हा त्यातून आलाय! हे विवेकानंदप्रणीत अनुकंपा असलेलं हिंदुत्व नाही. बहुसंख्य असूनही victimhoodमध्ये रमलेलं आणि सतत कल्पित शत्रूच्या द्वेषानं पछाडलेलं हे नव–हिंदुत्व आहे. एकीकडे West is anxious visioning the future आणि दुसरीकडे We are busy reconstructing the past.

गो बॅक अंकल सॅम –आहा! बट टेक माय सन विथ यू! ही पाश्चात्त्यांबरोबरच्या संबंधातील 'हिपोक्रसी'ही याच वैचारिक पोकळीतून जन्माला येते. आमची हजारो वर्षांची संस्कृती, परंपरा, सगळं महान आहे! तुझ्या त्या भ्रष्ट विचारांची सावलीही आमच्यावर नको. तेव्हा Uncle Sam तू चालता हो. हा पण जाताना माझ्या मुलाला मात्र घेऊन जा – शेवटी भविष्य तिथेच आहे – इथे काही खरं नाही. सध्याचे राजकीय नेतृत्व हे या वैचारिक पोकळीचं कारण नाही तर ते लक्षण आहे. लोकसभेच्या डोक्यावर राज्यसभा आणि विधानसभेच्या डोक्यावर विधान परिषद यांचे प्रयोजनच हे आहे की अन्य शाह्यांप्रमाणे लोकशाही हीदेखील स्खलनशील आहे. लोकनियुक्त आहोत आणि बहुमतात आहोत हा दावा करत हकूमशाहीकडे वाटचाल होण्याचा सतत धोका असतो. राजसत्तेवर सद्सदविवेकाचा अंकुश असलाच पाहिजे अगदी a tyranny of the unelected अशी या विवेकाची–अंकुशाची हेटाळणी झाली तरी. हे सर्व विस्तारानं लिहिण्याचं कारण, कुमारचं त्याच्या विचारांचं आणि लेखनाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी. तो बौद्धिक आयुधं वापरत, जाणिवा रुंदावत या विवेकाचा अंकुश परजायला त्यांना सतत उद्युक्त करत असतो.

कुमार कितीतरी विशालपटाचा आणि त्रिकालाचा वेध सतत घेत असतो. कुमारचा विषय निघाला की थोरोचं एक वाक्य मला नेहमी आठवतं– "If a soldier marches out of sync with his companions, perhaps he hears a different drummer." This probably explains Kumar in absolute. कुमार हा असा सतत त्याची वैचारिक आयुधं परजत जीवनाच्या, समाजाच्या, राजकारणाच्या सर्वांगाना भिडत असतो आणि आपल्याला भिडायचं आवाहन करत असतो. His body of work - त्याच्या योगदानाची, कार्याची, कर्तृत्वाची मीमांसा करण्याचं कार्य तो आपल्यावर सोपवतो.

**– धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

# महाराष्ट्रातील डाव्या राजकारणाचा जमाखर्च



प्रज्ञा
प्रतिभा
प्रगल्भता

**श्रीरंजन आवटे**

*भारतीय राजकीय वास्तवास अनुरूप अशा प्रकारची मांडणी करण्यात डाव्या पक्षाच्या राजकारणास अपयश आले. त्यांची मांडणी सोव्हिएत किंवा चीनच्या प्रारूपापासून प्रेरित होती, मात्र भारतीय राजकीय व्यवस्थेशी अनुकूल असा कोन त्यांना साधता आला नाही. एकविसाव्या शतकातील दुसरे दशक संपत असताना जगभरात उजव्या शक्तींची लाट आहे. भारतातील राजकारणाची मध्यभूमी उजव्या शक्तींनी व्यापली आहे. महाराष्ट्रात तर भाजपला रोखत महाविकास आघाडी सरकारचा अभूतपूर्व प्रयोग घडला आहे. अशा वेळी डाव्या राजकारणाची सखोल चिकित्सा होण्याची आवश्यकता आहे.*

कार्ल मार्क्स यांच्या क्रांतदर्शी विचारांनी अवघ्या अकादमिक जगताला नवे वळण मिळाले. त्यांच्या विचारातून अकादमिक आणि प्रत्यक्ष व्यवहारात अनेक बाबतीत परिवर्तन घडून आले. मार्क्सच्या अपेक्षेप्रमाणे युरोपात किंवा अत्याधिक औद्योगिक भांडवली देशात न घडता रशियात घडली. रशियन राज्यक्रांतीच्या प्रेरणेने जगभरात विविध ठिकाणी संघटनात्मक बांधणी झाली. कामगारवर्ग क्रांती घडवून आणू शकतो, असा विश्वास या क्रांतीमुळे मिळाला. ढोबळमानाने मार्क्सवादाच्या सैद्धांतिक मांडणीवर विश्वास आणि रशियन क्रांतीच्या माध्यमातून तो विचार प्रत्यक्षात येऊ शकतो असा दिलासा या दोन्हीतून साम्यवादाविषयीचे आकर्षण जगभर निर्माण झाले. मार्क्स-एंगेल्सने प्रतिपादित केलेल्या साम्यवादाला मुळातच आंतरराष्ट्रीय परिमाण होते. १९१७ पासून साम्यवादाचा प्रभाव अधिक वाढला. आंतोनियो ग्राम्शीपासून फिडेल कॅस्ट्रो ते अगदी नेहरूंपर्यंत महत्त्वाचे नेते, विचारवंत डाव्या विचारप्रवाहाकडे झुकले होते. डाव्या विचारधारेचे आकलन आणि प्रत्यक्षात करावयाची कृती याविषयी मतभेद असले तरी सोव्हिएत मॉडेलमुळे हे सारे प्रभावित झालेले होते, हे निश्चित.

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतातील एक प्रमुख विचारप्रवाह म्हणून कम्युनिस्ट प्रवाह उदयाला आला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना नेमकी केव्हा झाली, याविषयी मतभेद आहेत. मानवेंद्रनाथ रॉय यांनी १९२० साली ताश्कंद येथे स्थापन केलेला मूळ पक्ष की १९२५ साली कानपूरच्या परिषदेत स्थापन झालेला खरा पक्ष असा हा वाद असला, तरी साधारण या दशकातच डाव्या पक्षांची पायाभरणी झाली, असे दिसते. स्वातंत्र्यआंदोलनात कळीच्या प्रसंगी नेमकी काय भूमिका घ्यायची याविषयी सातत्याने डाव्या संघटनांमध्ये मतभेद होते. ब्रिटिशांचे साम्राज्यवादी सरकार उधळून लावणे हे समान ध्येय डाव्यांचे आणि काँग्रेसचे असले तरी काँग्रेससोबत त्यांचे फारसे जुळले नाही. भाकपला गांधींविषयी वैचारिक जवळीक वाटली नाही. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये काँग्रेसची भूमिका मध्यवर्ती होती तोवर कम्युनिस्ट किंवा डावे मुख्यप्रवाही राजकारणाला वेगळे वळण देऊ शकतील इतके प्रभावी नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात अशी भूमिका पार पाडण्याची महत्त्वाकांक्षा त्यांची

होती. यातूनच वेगवेगळ्या ठिकाणी त्यांनी आपल्या विचारप्रवाहाचा प्रसार सुरू केला.

महाराष्ट्रातही ही कम्युनिस्ट चळवळ सुरू झाली. मुंबईसारख्या ठिकाणी कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने या चळवळीला पोषक वातावरण मिळाले. गिरणी कामगार आणि रेल्वे कामगार प्रामुख्याने या चळवळीशी जोडले गेले. श्रीपाद अमृत डांगे, शां.सा. मिरजकर यांसारख्या मंडळींचा ही चळवळ पुढे नेण्यात मोठा वाटा होता. नेहरू सरकार हे साम्राज्यवादी स्वरूपाचे आहे आणि भारतातही आपल्याला रशियाप्रमाणे कामगारांकरवी क्रांती घडवून आणायची आहे, हा विचार पक्षाच्या गाभ्याशी होता. पक्षाच्या ध्येयधोरणासोबत मतभेद निर्माण होऊन शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) या नव्याने स्थापन झालेल्या पक्षात विष्णुपंत चितळे आणि वसंतराव तुळपुळे यांच्यासारखे नेते सामील झाले. १९५० साली झालेल्या नाशिकमधील दाभाडी गावात झालेल्या अधिवेशनात शेकापने 'दाभाडी प्रबंध' मांडला आणि मार्क्सवादी भूमिका स्वीकारली.

आजघडीला महाराष्ट्रातील डाव्या पक्षांमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप), शेतकरी कामगार पक्ष (शेकाप), समाजवादी पक्ष, लाल निशाण पक्ष अशा काही प्रमुख पक्षांचा विचार करता येऊ शकतो.

भाकपने स्वातंत्र्योत्तर काळात सातत्याने नेहरू सरकारची चिकित्सा केली. पहिल्या लोकसभा निवडणुकीत भाकप हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष होता. १९५७ सालच्या महाराष्ट्र विधानसभेतही ६ जागा लढवून ४ जागा भाकपने जिंकल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला पाठिंबा हा भाकपच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला पाठिंबा देणारा भाकप हा एक प्रमुख पक्ष होता.

१९६४ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षात उभी फूट पडली. १९६२ च्या चीनसोबतच्या युद्धात काय भूमिका घ्यायची या संदर्भात वाद निर्माण झालेले होते. तसेच नेहरू सरकारची चिकित्सा कशी करायची हा स्वातंत्र्योत्तर काळात डाव्यांसमोरचा मतभेदाचा प्रमुख मुद्दा होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षातील पुराणमतवादी गटाने भारत-चीन युद्धाच्या प्रसंगी नेहरूंना पाठिंबा दिला. नेहरूंना पाठिंबा म्हणजे साम्राज्यवादाला पाठिंबा अशी धारणा असलेल्या दुसऱ्या गटाने या भूमिकेचा धिक्कार केला. नेहरूंना पाठिंबा देण्यात जसा व्यावहारिकतेचा भाग होता तसाच नेहरूंमुळे भारताचे सोव्हिएत सोबतचे संबंध दृढ झाल्याचा आयामही होता. अर्थात साम्यवादाच्या चिनी आणि सोव्हिएत आवृत्त्यांच्या संदर्भाने भारतीय डाव्यांमध्ये म तभेद होतेच. अखेरीस याचे पर्यवसान मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या निर्मितीत झाले. देशात जशी ही फूट झाली तशी ती महाराष्ट्रातही झाली. महाराष्ट्रात गोदावरी परुळेकर, एस.वाय. कोल्हटकर, बी. टी. रणदिवे हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. माकपमधून १९६८ साली सशस्त्र क्रांतीची मागणी करणारा गट वेगळा झाला. हा गटच पुढे नक्षलवादी गट म्हणून ओळखला गेला. पश्चिम बंगाल आणि आंध्रात याचा परिणाम माकपच्या प्रभावावर झाला. महाराष्ट्रात मात्र फारसा परिणाम झाला नाही.

कम्युनिस्टांचा प्रभाव कमी करण्याकरता काँग्रेसने शिवसेनेला अधिक बळ दिले. वसंतराव नाईकांच्या रणनीतीमुळे शिवसेनेला 'वसंतसेना' असेही अनेकांनी संबोधले आहे. भाकप आमदार कृष्णा देसाई यांच्या हत्येनंतर सेना आपला पहिला उमेदवार विधानसभेत पाठवू शकली. रोझा देशपांडे यांनी नंतर लोकसभा पोटनिवडणुकीत सेनेच्या उमेदवाराचा पराभव केला हे जरी खरे असले तरीही शिवसेनेच्या उदयानंतर आणि शिवसेनेसोबतच्या संघर्षासह डाव्यांचा प्रभाव रोडावला.

यानंतर आणीबाणीच्या निर्णयालाही भाकपने पाठिंबा दिला तर माकपने विरोध केला. जनता पक्षासोबत सख्य ठेवत निवडणुकीय गणिते जुळवण्यात माकपला यश आले. माकप व्यवहारी डावपेच आखून निवडणुकी रिंगणात उभा राहतो, त्यामुळे हा पुरेसा डावा पक्ष नाही, अशी टीकाही सातत्याने होते. काँग्रेसच्या राजकारणाला कसा प्रतिसाद द्यायचा असा पेच डाव्यांसमोर सुरुवातीपासून असल्याचे दिसते. त्याला तिवसा, किनवट, सुरगणा अशा काही मोजक्या भागांतच आपला प्रभाव कायम ठेवण्यात कम्युनिस्ट पक्षांना यश मिळाले. विशेषतः १९९० नंतरच्या आर्थिक धोरणांना त्यांनी विरोध केला असला तरी त्याला सशक्त पर्यायी मांडणी करण्यात त्यांना अपयश आले आहे. निवडणुकीच्या रिंगणात आणि वैचारिक वर्तुळातही दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना विविध वर्गांतून मिळत असलेला पाठिंबा रोडावला.


दुसरीकडे शेतकरी कामगार पक्षाने 'दाभाडी प्रबंध' मांडला आणि मार्क्सवादाची मांडणी स्वीकारली. लेनिन-स्टॅलिन यांचे पक्षबांधणीचे तंत्र स्वीकारले. निवडणुकीच्या रणनीतीमुळे स्थापनेपासूनच शेकापमध्ये फूट पडली. जेधे-मोरे, मोरे-खाडिलकर असे वाद घडले. साठच्या दशकात शेकाप प्रभावी होता, मात्र हळूहळू पक्षाचा प्रभाव ओसरला. पश्चिम महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रातील काही भागात शेकाप अधिक प्रभावी होता. विशेषतः नव्वदनंतरच्या काळात रायगड या जिल्ह्यात शेकाप टिकून राहिला. सोलापुरातील सांगोल्यातील गणपतराव देशमुख अगदी २०१९ पर्यंत शेकापचा गड राखून होते. विविध क्षेत्रांतील संस्थात्मक बांधणीला प्राधान्य देण्याचा शेकापला फायदा झाला. तसेच, संसदीय आणि अर्थराजकीय गणितांचे समीकरण जुळवण्यात त्यांना काही प्रमाणात यश आले. डळमळीत वैचारिक निष्ठा, अपारदर्शक आर्थिक व्यवहार आणि वैचारिक मतभेद या साऱ्यातून पक्षप्रभाव लयास गेला.

डाव्या पक्षांपैकी आणखी एक महत्त्वाचा पक्ष म्हणजे समाजवादी पक्ष होय. जनता दलाने केलेल्या प्रयोगातून समाजवादी पक्ष उदयाला आला. प्रामुख्याने यादव समुदायाचा सामाजिक आधार मिळवत पक्षाला उत्तर प्रदेशात महत्त्वाचे स्थान मिळाले. महाराष्ट्रात या पक्षाला मुंबई आणि ठाण्यामध्ये काही प्रमाणात यश मिळाले. १९९३ च्या दंगली आणि बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर मुस्लीम समुदायाला शिवसेनेपासून संरक्षण मिळवून देणे ही जबाबदारी

या पक्षाने पार पाडली, असे सांगितले जाते. मुंबई ठाण्याच्या पलीकडे महाराष्ट्रभर मुस्लीम समुदायाचे प्रमाण लक्षणीय असले तरी ते विखुरलेले असल्याने तेथे आपला जम समाजवादी पक्षाला बसवता आला नाही.

लाल निशाण पक्ष हा डाव्या पक्षांपैकी एक महत्त्वाचा पक्ष होय. १९४२ च्या चले जाव चळवळीच्या संदर्भाने आणि दुसऱ्या महायुद्धाबाबत नेमकी काय भूमिका घ्यायची यावरून डाव्यांमध्ये जे मतभेद झाले त्याचे पर्यवसान म्हणून नवजीवन संघटना स्थापन झाली. हा काही राजकीय पक्ष नव्हता. अंतिमतः कम्युनिस्ट पक्षात विलीन व्हायचे असेच या संघटनेचे धोरण होते. मात्र शेकापमधील अंतर्गत वादामुळे आणि नंतर १९६४ साली कम्युनिस्टामध्येच उभी फूट पडल्याने कोणत्याच पक्षात ही संघटना विसर्जित झाली नाही. या संघटनेचे स्वरूप बदलले आणि लाल निशाण पक्ष १९६५ साली अस्तित्वात आला. राजकीय पक्षाचे स्वरूप धारण करूनही हा पक्ष निवडणुकांपासून दूरच राहिला. कामगार संघटनांची बांधणी करण्यावर त्यांनी भर दिला. एस.के. लिमये, चव्हाण यांचा गट विरुद्ध ए.डी. भोसले गट असा वाद निर्माण झाला तो प्रामुख्याने काँग्रेसच्या संदर्भाने नेमकी काय भूमिका घ्यायची यावरून. एस.के. लिमये यांची मांडणी ही काँग्रेसला पूरक अशा स्वरूपाची होती आणि कम्युनिस्टांनी राजीव गांधी यांच्यामागे एकत्र यावे असेही त्यांनी सुचवले होते. 'काँग्रेस पक्ष आणि कम्युनिस्ट यांच्यातील तोल सावरण्यास अव्वल महत्त्व आहे' असे एस.के. लिमये यांनी स्वतःच म्हटले होते. एस.के. लिमये यांची इंदिरा गांधींसोबत भेट घडवून आणण्यात कुमार केतकरांची भूमिका महत्त्वाची होती. कुमार केतकर स्वतः लाल निशाण पक्षाचे अधिकृत सभासद नव्हते, मात्र लाल निशाण पक्षाची वाटचाल आणि केतकरांची घडण समांतर पद्धतीने घडली. केतकरांवर नेहरूवादी राजकारणाचा प्रभाव होता. डाव्या चळवळीशी जैव नाते असले तरीही त्यांच्या स्वतंत्र भूमिकेवर ते ठाम होते. आणीबाणीच्या समर्थनार्थ तेव्हा आणि नंतरही केतकरांनी लेखन केले. आणीबाणीविषयी त्यांची भूमिका नेहमीच वादग्रस्त राहिली आहे, मात्र केतकर आंतरराष्ट्रीय संदर्भात आणीबाणीची आवश्यकता प्रतिपादतात. १९७५ ते १९८४ या नऊ वर्षांच्या काळात दक्षिण आशियातील भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या तीनही देशांच्या राष्ट्रप्रमुखांना संपवले जाणे हा व्यापक कारस्थानाचा भाग असल्याची त्यांनी मांडणी केली.

'प्रत्येक देशात वा समाजात एकाच वेळी अनेक नैतिक गृहीतके एकत्रपणे नांदत असतात वा नांदत नसतात. जेव्हा ती नैतिक सहिष्णुता संपते, म्हणजेच परस्परांच्या नैतिक गृहीतकांबद्दलचा आदर संपतो, तेव्हा दंगे-धोपे वा युद्धे होतात. माणसाच्या सांस्कृतिक उत्क्रांतीच्या काळात असे कलह, दंगे-धोपे वा युद्धे झाली असली तरी त्या नैतिकतेचा शोध अखंड चालू आहे.'
(लोकसत्ता, ३१ डिसेंबर २००५ 'बदलते विश्व' पृ. ३०८)



सुरुवातीपासूनच व्यापक गांधी-नेहरूंच्या काँग्रेसी आवृत्तीसोबत त्यांचा वैचारिक पिंड मिळताजुळता होता. त्यामुळे केतकरांसारख्या आयडियॉलॉग व्यक्तीची काँग्रेसने राज्यसभेवर निवड करणे साहजिक होते. त्यांच्या परिवर्तनवादी भूमिकेत सातत्य आणि सुसंगतता आहे. केतकरांनी जमातवादी, मूलतत्त्ववादी राजकारणावर जे ताशेरे पत्रकार म्हणून ओढले तीच आग्रही भूमिका ते आज खासदार म्हणून निभावत आहेत. केतकरांनी लाल निशाण पक्षाच्या लिमये गटासोबत संवादी रहात काँग्रेसी राजकारणास पूरक अशी पावले उचलली. मात्र कालांतराने काही मोजक्या भागातील प्रभावासह लाल निशाण पक्ष क्षीण होत गेला.

याशिवाय इतर अनेक छोटेमोठे गट डाव्या चळवळीतून निर्माण झाले. कॉ. शरद पाटलांचा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष निवडणुकीच्या रिंगणात प्रभाव पाडू शकला नाही, तरीही या पक्षामुळे वैचारिक वर्तुळात गंभीर मंथन झाले. जनता दल या पक्षास डावा पक्ष म्हणणे सयुक्तिक नाही तसेच रिपब्लिकन पक्ष आणि दलित/आंबेडकरवादी चळवळीचे राजकारण हा स्वतंत्र विषय असून येथे डावा पक्ष म्हणून त्याची जाणीवपूर्वक चर्चा केलेली नाही.

एकुणात महाराष्ट्रातील डाव्या पक्षांच्या राजकारणाकडे पाहताना काय जमेच्या बाजू दिसतात?

डाव्या पक्षांच्या राजकारणातून गंभीर राजकीय वैचारिक मंथन झाले. साम्राज्यवाद आणि भांडवलशाही यांकडे कशा प्रकारे पाहता येऊ शकते याचे विविध दृष्टिकोन मांडले गेले. राजकीय प्रक्रिया आणि सामाजिक वास्तव यांच्याकडे पाहण्यातील गुंतागुंत त्यांच्या राजकारणातून समोर आली. स्थानिक किंवा प्रादेशिक राजकीय घटनांना आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यातून पाहण्याची नजर डाव्यांच्या राजकारणातून विकसित झाली. अपवाद वगळता बहुतेक डाव्या नेत्यांची राजकीय निष्ठा अविचल होती आणि आहे, हे विशेष. प्रामाणिक ध्येयवादासह, आदर्शवादासह डाव्यांनी राजकारणाचा वस्तुपाठ घालून दिला. सार्वजनिक चर्चाविश्वात सकारात्मक हस्तक्षेप करण्यात त्यांचे मौलिक योगदान आहे. सामाजिक चळवळींना दिशा देण्याचे काम त्यांनी केले आहे. वंचित, शोषित, परिघावरच्या समूहाला नैतिक बळ त्यांनी पुरवले आहे. कामगारविषयक कायद्यांमध्ये झालेले बदल डाव्यांमुळे घडून आले. सामाजिक सुरक्षेच्या संदर्भात धोरणनिर्मिती व्हावी यासाठी त्यांनी सातत्याने वचक ठेवला. लोककल्याणकारी राज्यसंस्थेचे स्वरूप

टिकून राहावे याकरता ते अधिक दक्ष होते. अगदी युपीए १ मध्ये सरकारचा भाग असणाऱ्या डाव्यांनीच तर सरकारवर अंकुश ठेवून लोकाभिमुख योजना पार पडाव्यात यासाठी आग्रह धरला.

असे सारे असूनही निवडणुकीच्या रिंगणात आणि एकूणच राजकीय व्यवस्थेत डावे क्षीण का झाले किंवा त्यांना अपयश का आले, याचा विचार आज करणे अधिक आवश्यक आहे. आज उजव्या शक्तींनी पूर्णपणे राजकीय मध्यभूमीवर पकड मिळवलेली असताना ते अधिक औचित्याचे आहे. याची अनेक कारणे आहेत. त्यातील काही प्रमुख मुद्यांना येथे स्पर्श केला आहे.

भारतीय राजकीय वास्तवास अनुरूप अशा प्रकारची मांडणी करण्यात डाव्या पक्षाच्या राजकारणास अपयश आले. त्यांची मांडणी सोव्हिएत किंवा चीनच्या प्रारूपापासून प्रेरित होती मात्र भारतीय राजकीय व्यवस्थेशी अनुकूल असा कोन त्यांना साधता आला नाही. त्यातून कालांतराने डाव्या राजकारणाची तळागाळातील समूहापासूनची जैव नाळ तुटली. संसदीय राजकारणातील अपरिहार्यता लक्षात घेऊन राजकीय डावपेच आखण्याऐवजी आत्यंतिक तर्ककठोर वैचारिक बाणा त्यांनी महत्त्वाचा मानला. पक्ष/संसदीय दल हे दुय्यम मानण्याची त्यांची धारणाही या बाबीला कारणीभूत ठरली.

भारतातील वर्गवास्तव समजावून घेऊन डाव्यांनी आपले राजकारण उभे केले, मात्र जातीचे वास्तव समजावून घेण्यात ते अपुरे पडले. जातींमुळे भारतीय सामाजिक वास्तवाची जटिलता वाढते. त्यानुसार भारतीय संदर्भात प्रदेशनिहाय नवी मांडणी होणे गरजेचे होते. महाराष्ट्रातही शेतकरी कामगार पक्षाला जे मर्यादित यश लाभले त्यात समाजवास्तवाचे भान आणि संघटनात्मक बांधणीचा मोठा वाटा आहे. डाव्या राजकारणाचे शीर्ष नेतृत्व हे अधिकांश प्रमाणात उच्चजातीय आहे. विविध जातीसमूहांतील लोकांना पक्षाकडे आकृष्ट करण्यात आणि त्यांच्यातून नेतृत्वाची फळी उभी करण्यात डाव्यांना अपयश आले.

महाराष्ट्रात डाव्यांचा प्रभाव घटण्याला शिवसेना कारणीभूत आहेच तसेच राजकीय अर्थव्यवस्थेसोबत अनुकूलन साधण्यात डावे अक्षम असण्याचा घटकही जबाबदार आहे. डाव्यांनी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे महत्त्व पुरेसे ध्यानात घेतले नाही. जागतिकीकरणाला विरोध करण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती दिला मात्र त्याला पर्यायी नीती ते देऊ शकले नाहीत किंवा त्या अनुषंगाने कृतिकार्यक्रम त्यांना देता आला नाही.

कामगारांच्या पलीकडे इतर वर्गासोबत जैव नाळ तयार करण्यातही डावे अपुरे पडले आणि त्यामुळे युनियनच्या राजकारणापुरते त्यांना सीमित करणे इतरांना शक्य झाले. काँग्रेसबाबत काय भूमिका घ्यायची हा कायमच डाव्यांसमोर महत्त्वाचा पेच राहिला आहे. स्वतःचे नवे राजकारण उभे करण्याऐवजी प्रतिक्रियावादी राजकारण त्यातून आकाराला आले.

सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे सांस्कृतिक आस्थेच्या संदर्भात किंवा धर्मविषयक बाबींबाबत नेमकी काय भूमिका घ्यावी याबाबत डाव्यांना निःसंदिग्ध भूमिका घेता आली नाही. स्थानिक, समुदाय विशिष्ट आणि धर्मविशिष्ट सांस्कृतिक आस्थेकडे त्यांनी अस्मितेच्या चष्म्यातून पाहिले. या आस्थेला बळ देणे म्हणजे अस्मितावादी राजकारण करणे किंबहुना आपल्या तत्वचौकटीपासून दूर जाणे या दृष्टीने त्यांनी पाहिले. दुसरीकडे काँग्रेसलाही याबाबत ठोस भूमिका घेता आलेली नसली तरी लोकानुरंजनवादी, लवचीक निवडणुकीच्या भूमिकांमुळे त्यांना यश मिळत राहिले. मात्र सांस्कृतिक/ धार्मिक अवकाश याबाबतची ठोस नेमकी भूमिका कोणालाच न घेता आल्याने उजव्या शक्तींना इंधन मिळाले. त्यातून नव्वदोत्तरी राजकारणाचा अवघा पट अशा उजव्या शक्तींनी टप्याटप्याने व्यापला.

एकविसाव्या शतकातील दुसरे दशक संपत असताना जगभरात उजव्या शक्तींची लाट आहे. भारतातील राजकारणाची मध्यभूमी उजव्या शक्तींनी व्यापली आहे. महाराष्ट्रात भाजपला रोखत महाविकास आघाडी सरकारचा अभूतपूर्व प्रयोग घडला आहे. अशा वेळी डाव्या राजकारणाची सखोल चिकित्सा होण्याची आवश्यकता आहे. राजकारणाची सर्जक पुनर्मांडणी करण्याची सर्वाधिक गरज आज आहे. सांस्कृतिक अवकाशाचे महत्त्व ध्यानात घेऊन रणनीती आखण्याची आज जरुरी आहे. डाव्या राजकारणात असणाया प्रामाणिकपणाच्या जोडीला व्यावहारिक डावपेचांची जोड असण्याची आवश्यकता आहे. लोकांना समजेल आणि त्यांना रिलेट होईल अशा परिभाषेत डाव्यांचे राजकारण घडायला हवे.

समताधिष्ठित समाजाचे स्वप्न उराशी बाळगणारे डावे वळण डावपेचांबाबत यशस्वी ठरले तर ते अधिक उजवे ठरेल. Another world is possible हा आशावाद जिवंत असेल तर त्या दिशेचा प्रवासही यशस्वी होऊ शकतो. या यशस्वी प्रवासाची आवश्यकता केवळ डाव्यांसाठीच नव्हे तर भारतीय संवैधानिक मूल्ये टिकावीत म्हणूनही आहे.

**– श्रीरंजन आवटे**
भ्रमणध्वनी : ९७६२४२९०२४
shriranjan91@gmail.com

**ग्रंथाली**




**जगावेगळी माणसं**
**रमेश वाघमारे**

**काळुपुऱ्यातील–गौरपुऱ्यातील व प्रतिभापुऱ्यातील जगावेगळ्या माणसांचं दर्शन.**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**



**विजयराज बोधनकर**

# कलेतील माझे गाळीव समाधान

माझ्या चित्रप्रवासाबद्दल सांगण्याअगोदर या निसर्गाच्या कोटीच्या कोटी निर्मितीघटकांबद्दल मला कृतज्ञ होणं गरजेचं वाटतं. मानवाच्या सतत मूलभूत गरजा पुरवणाऱ्या आणि नवेनवे आश्चर्य निर्माण करणाऱ्या निसर्गाबद्दल अभ्यास करायचा झाला तर कितीतरी जन्म अपुरे पडतील. पुरेपूर सौंदर्यानं नटलेला वैश्विक निसर्ग अनुभवतांना या ईश्वरी निर्मितीबद्दल सारंच आश्चर्यकारक वाटायला लागतं. मी जेव्हा चित्र काढतो त्याचं वारेमाप कौतुक होतं तेव्हा या निसर्गाच्या निर्मितीपुढे आपण किती छोटे आहोत याची जाणीव व्हायला सुरुवात होते आणि मला या निसर्गाच्या कलानिर्मितीसमोर खरंच संकोच वाटतो आणि मी सतत खजील होत राहतो. तेव्हा मी निसर्गशक्तीपुढे शरणागती पत्करतो कारण ज्ञानेश्वरमहाराज ज्ञानेश्वरीत म्हणतात की, ।। हे मजसीस्तव जाहले परी म्या नाही केले, ऐसे जेणें जाणितले तो सुटला गा ।।

मी जन्म घ्यायच्या कोटी वर्ष अगोदर ही सृष्टी सुजलाम-सुफलाम होती. माझ्या अगोदर माझी आई जन्माला आली आणि कलेचं बीज निसर्गानं माझ्या आईच्या मार्फत माझ्या पदरात टाकलं. मला ते फक्त नीट वाढवता आलं इतकं मात्र माझ्या हातून झालं. मीपणाच्या कितीतरी पुढे कलेची व्याप्ती आहे याची मला जाणीव झाली.

माझ्या आईचे वडील नीळकंठराव दीक्षित हे अमरावती जिल्ह्यातील विख्यात चित्रकार-सुवर्णकार-मूर्तिकार होते, तिचे काका गंगाधरपंत दीक्षित हे वारकरी-कीर्तनकार होते, तिचे दुसरे काकासुद्धा मूर्तिकार, सुवर्णकार होते, दोन मामासुद्धा मूर्तिकार होते, वडिलांचे वडील विनायकराव बोधनकर म्हणजे माझे आजोबा हेही मूर्तिकार होते, काकासुद्धा मूर्तिकार होते, असा हा आमचा कलेचा पिढीजात व्यवसाय होता. घरात कलेचंच वातावरण होतं, घरातच विठ्ठलाचं मंदिर असल्यामुळे घरातलं वातावरण प्रसन्न होतं. गावावर राष्ट्रसंत तुकडोजी बाबा आणि गाडगेबाबा यांच्या विचारांचा प्रभाव होता, त्यामुळे अंध धार्मिकता लहानपणापासून जवळ येऊ शकली नव्हती. अशा वातावरणात मी वाढत गेलो. पण या कलेला अधिक पुढे नेण्यासाठी शिक्षणाशिवाय मला दुसरा पर्याय दिसत नव्हता, त्यामुळे मुंबई आणि जे जे स्कूल ऑफ आर्ट हे दोनच पर्याय माझ्या पुढ्यात होते. मी १९७९ला गावातून दहावी झालो. गावाचं नाव धनोडी बहाद्दरपूर, वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यात छोटंसं गाव, आईला वाचनाची आवड म्हणून मीसुद्धा वाचायला लागलो, आठवीत असताना 'उष:काल' कादंबरी हाताशी लागली व सहाशे पानांची कादंबरी वाचता वाचता बहिर्जी नाईक या महान सीआयडी ऑफिसची भेट वाचनातून झाली, त्यांनतर शिवाजीमहाराज यांचे बाबासाहेब पुरंदरे लिखित तीन खंड वाचून काढले, त्यामुळे डोकं ऊर्जेनं भरलं. गावाबाहेर पडण्याची स्वप्नं पडू लागली. छोट्याशा गावात राहून कलेची प्रगती होणार कशी हा प्रश्न सतत पडू लागला आणि १९८२ साली बॅग भरून एकटाच स्वकमाईचे १३५ रुपये घेऊन मुंबईकडे रवाना झालो. मुंबईत मावशीकडे बस्तान बसवलं, आणि शून्याच्या प्रयोगशाळेत कुणाचाही आधार नसताना या अनोळखी अवाढव्य शहरात पाय पसरायला सुरुवात केली ते प्रयोग म्हणूनच. कष्ट घेतल्याशिवाय पदरात काहीही पडत नाही, स्वतः च्या प्रगतीसाठी आलेले कठीण दिवस आपण निभावून नेत असतो, ते निभावून नेताना मला विलक्षण अनुभव आले. ग्रामीण भागातून मुंबईत आलेल्या केवळ १८ वर्षाच्या माझ्यासारख्या तरुणाला मोठं आव्हान पेलावं लागलं, वडिलांचा एकही पैसा न घेता आपल्याला स्वतःच्या पायावर उभं राहताना काय काय करावं लागतं त्याचा उत्तम आणि काटेरी असे दोन्ही अनुभव खूप काही शिकवत होते, खरं तर ते स्वशिक्षणच होते.

हाच अनुभव मला खूप काही देत गेला. साकीनाक्याला हमाली केली, भिंती रंगवून त्यावर लिप्टन चहाच्या जाहिराती रंगवल्या, दुकानांचे साइन बोर्ड रंगवले. वाटेल ती कामं करून



पैसा नावाचा ऑक्सिजन गरजेपुरता मिळवत राहिलो आणि जे. जे. स्कुल ऑफ आर्टला १९८५ साली प्रवेश घेतला. जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे शिक्षण खर्चीक होतं पण कंबर कसून वाटेल ते प्रयत्न करून माझं शिक्षण पूर्ण केलं. बऱ्याचदा उसवलो, रडलो, भूक सहन केली, अपमान गिळले, फाटके कपडे शिवून घातले, पण कुणासाठी? हा प्रश्न स्वताला विचारला तेव्हा उत्तर याचचं, स्वतः साठी आणि कलेसाठी! म्हणून एकट्याचा संघर्ष हा तेव्हापासून मला एकलव्याचं महाविद्यालय वाटत आलं. एकटे चालण्यात मोठी ताकद असते याची सुंदर जाणीव मला झाली. याच जाणिवेतून मी लिहिता झालो ते मनातल्या धष्टपुष्ट अडचणीमुळे, न सुटणाऱ्या अनेक प्रश्नांमुळे. मी सतत स्वतःशी बोलू लागलो आणि त्याच बोलण्यातून कागदावर लिहीत गेलो आणि त्याची कधी कविता होत गेली कळलंच नाही. कळत-नकळत कवितेच्या प्रेमात पडत गेलो ते मला कळलंच नाही, जगण्याच्या अनेक क्लिष्ट क्षणांतून कविता जन्म घेऊ शकते, चित्रं जन्म घेऊ शकतं याची जाणीव बाळसं धरू लागली. त्यातून खऱ्या अर्थानं जीवनकला विकसित होत गेली. कला म्हणजे नेमकं काय हे हळूहळू समजण्याची प्रक्रिया आहे याचीही जाणीव झाल्यामुळे मला मनातल्या माझ्या चित्रांची वाट वयाच्या पंचेचाळीसपर्यंत पाहावी लागली.

मला माझ्या मनातल्या चित्राची सोबत हवी होती, तेच ते चित्र काढणं मला नको होते. मी कुठून आलो, मी काय अनुभवलं, लहानपणी माझ्या अवतीभवतीचे माझ्यावर नकळत काय काय संस्कार झालेत, मी माझा काय विचार करतो, मला माझं काही सापडतं का, अशा अनेक मनोभूमिकांतून चित्राकडे बघत राहिलो. लोकसता, लोकमतमध्ये काही वर्षं चित्रकारिता करण्याची संधी मिळाली, आकर्षण म्हणून अर्कचित्रं, इलस्ट्रेशन, व्यंगचित्रं, व्यक्तिचित्रं, निसर्गचित्रं सारी माध्यमं सात वर्षं हाताळून बघितली. लेखावर चित्रं काढायची म्हणून सतत वाचन करण्याची सवय लागली, जी लहानपणी आईमुळे मला लागली होती. ती वाढीला लागली. २००४ व २००५ साली 'रे मना' नावाचा दिवाळी अंक काढला, संपादन करून पाहिला, आणि अंकाला तब्बल तेरा पुरस्कार प्राप्त झाले. पण, आर्थिक प्रश्नचिन्हामुळे अंक बंद करावा लागला. त्यानंतर मात्र उत्साहानं लिहायला लागलो आणि तिथून माझ्या लेखनाला सुरुवात झाली, महाराष्ट्र टाइम्स, (सगुण-निर्गुण) लोकमत (आनंद रंग) (पाश्चिमात्य चित्रकार आणि प्रवास), पुढारी (जागर वयाचा), नवशक्ती (क-कलेचा), सामना (कलेची चित्रभाषा), पुण्यनगरी (त्या भेटीनंतर), ठाणे वैभव (जिल्ह्यायले चित्रकार) अशा विविध विषयांवर मी लिहीत राहिलो त्यामुळे वृत्तपत्रातून स्तंभलेखक म्हणून आमंत्रणे येऊ लागली. सतत कुणीतरी आपल्याकडून लिहवून घ्यावं, म्हणजे आपल्याकडून लेखन होईल या भावनेतून लिहीत गेलो. दिवाळी अंकामुळे चार लोकं ओळखायला लागले. त्यामुळे दिपलक्ष्मी, हंस, गंधाली, पद्मगंधा अशासारख्या अनेक दिवाळी अंकांतून लिहिता झालो.

त्यातून चारपाच पुस्तके आकाराला आली. चित्रकला, सामाजिक विषय, चित्रपट विषय, जे जे मला आवडतात ते लिहू लागलो, वाचू लागलो. धार्मिकतेबद्दल आणि देवचित्रांबद्दल मला अनेक प्रश्न पडू लागले. देवांची चित्रं रंगवताना देवांनी चित्रकार आणि शिल्पकार यांच्यासमोर मॉडेलिंग केलं होतं का, असं प्रश्न मी स्वत:ला, समाजाला विचारू लागलो तेव्हा समाजाकडून 'नाही' असं उत्तर येऊ लागलं. मग देवांची निर्मिती झाली तरी कशी? या देवचित्रांचा उद्देश तरी काय? देव देतो म्हणजे नेमक काय देतो? भक्ती म्हणजे नेमकं काय? देव आणि ईश्वर यातलं नेमकं गमक तरी काय? देव हे कशाचं प्रतीक आहे, त्याचा माझ्या व्यवहारी आयुष्यावर काही परिणाम होणार आहे का? यावर बरीच वर्षं चिंतन केलं. उत्तरे सापडत गेली आणि त्यावर 'प्रतीकांमागचे रहस्य' हे व्याख्यान देत राहिलो. संघर्षाच्या काळानं मला घडवलं होतं, विचाराधीन केलं होतं. वाचनाचा नाद लागला होता, त्यातून अनेक दिग्गज साहित्यिकांची ओळख पुस्तकरूपानं झाली होती. पण इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांमुळे समाजाचं वाचन मागे पडत चाललं याची जाणीव मला सतत टोचत होती, माझ्या घरात पंचवीस-सव्वीस वर्षांपासून टीव्ही नसल्यामुळे मी माझी वाचनाची गळचेपी होऊ दिली नाही, पण माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे समाजाची वाचनाची गळचेपी माझ्या लक्षात येत गेली आणि त्यातूनच युवा पिढीला जुने साहित्यिक कळावे म्हणून साहित्याकांची स्वभावचित्रं, हे ९२ साहित्यकारांच्या स्वभावचित्रांचं अर्कचित्र प्रदर्शन जन्माला आलं, जे पहिल्यांदा ठाण्यात भरलेल्या कोकण मराठी साहित्य संमेलनातून मांडण्यात आलं. जे २००३ साली भरलं होतं. त्याला माध्यमांचा आणि रसिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे, नागपूर, चंद्रपूर,

चिपळूण, ठाणे अशा ठिकाणी अखिल भारतीय साहित्य संमेलनातून प्रदर्शित झालं आणि मला थोडीतरी साहित्यसेवा करता आली याचं समाधान वाटलं.

या सर्व गोष्टीसोबत माझा चित्रप्रवास मनात आकार घेत होता, आणि त्याच विचारधारेतून २००८साली ‘पॉझिटिव्ह व्हेवज’ नावाचं चित्रप्रदर्शन मी मुंबईच्या नेहरू आर्ट गॅलरीमध्ये प्रदर्शित केलं. मी पाहिलेला, अनुभवलेला, आजोबांचा फेटा मला माझ्या चित्रांचा विषय वाटला. आमच्या गावात ज्ञानेश्वर पुण्यतिथी व्हायची तेव्हा आजूबाजूच्या गावातून वारकरी दिंड्या यायच्या. पांढरा फेटा, पांढरे वस्त्र परिधान केलेले वारकरी मला सतत आकर्षित करीत होते. ते तीनचार दिवसांचे चुंबकीय वातावरण आणि तो नामगजर यात मी स्वतःला विरघळून घ्यायचो, स्वताला विसरून जायचो. त्या वातावरणाचे अमूल्य क्षण मनात घर करून बसले होते तेच कॅनव्हासवर उतरले. जे माझं स्वतःच अनुभवविश्व आणि स्वतःच्या संवेदना होत्या त्या माझ्या चित्रातून माझ्याशी बोलत होत्या. आमच्या घरात चित्र आणि पोथ्यांमधल्या अक्षरलेखनाची परंपरा मी माझ्या चित्रातून व्यक्त केली. माझ्याजवळ आमच्या पिढीजात अडीचशे वर्षं जुन्या पोथ्या आणि त्यातली चित्रं आणि बोरूनं लिहिलेली हस्तलिखित ग्रंथपरंपरा ही घरातल्या कलावारशाबद्दल सतत माझ्याशी बोलत होती.



मला स्पष्ट आठवतं की मी पहिलीत असताना शाळेतून घरी आलो की पाटीवर काढलेली चित्रं आईला दाखवायचो तेव्हा आई हसत म्हणायची, की अरे वेड्या, ती चित्रं नव्हे तू पाटीवर अक्षरं गिरवलीस; पण मला अक्षरं अगदी लहानपणापासून चित्रंच वाटत आली, ते पक्के डोक्यात बसलं. अक्षर म्हणजे काय असा मी स्वतःला जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा उत्तर आलं की अक्षरं ही ध्वनीचित्रं आहेत. मानवी गळ्यात ईश्वरी शक्तीनं सव्वीसच्या आसपास स्वर बहाल केलेत म्हणून मानव बोलू शकतो. ही गोष्ट मला मोठी वाटली आणि फेट्याबरोबर अक्षरांची छबी माझ्या चित्रातून उलटू लागली. कॅलिग्राफी ही सजवून कागदावर जन्म घेते, पण शब्द हे फक्त रेषेतून जन्म घेतात. जसा स्वभाव तशी अक्षरं. स्वभावाचा आणि अक्षरांचा मानवी मनाशी मोठा संबंध आहे, हे मला जाणवू लागलं आणि वारकरी फेटा आणि अक्षरं असा प्रवास सुरू झाला. त्यातून पॉझिटिव्ह ॲटमॉस्फियर, व्हेन आय कनेक्ट विथ नेचर, ह्युमन इज अ सीड, डिव्हाईन वननेस, अनमॅच पोयटेस, समथिंग आऊट ऑफ नथिंग, अशा शीर्षकांची एकल प्रदर्शनं झाली. मुंबई, बेंगलोर, चेन्नई, कोलकाता, दिल्ली लंडन, शिकागो इथे प्रदर्शनं झाली, या बारा-तेरा वर्षाच्या काळात सततच्या चित्रप्रवासात हळूहळू फेटा जरी लुप्त होत गेला तरी अक्षरस्वर मात्र माझ्या कॅनव्हासवर प्रयोगशील बनत गेले आणि याच स्वरअक्षरावर पुढे आयुष्यभर शोधयात्रा सुरू राहील असं आता तरी वाटतं. आता कुठे वयाच्या पन्नाशीनंतर अमूर्ताचा अर्थ किंचित समजायला लागला आहे, ईश्वर जसा समजून घ्यायला सोपं नाही तशी अमूर्तभावकला समजून घ्यायला आयुष्याचा प्रवास अपुरा पडेल असं वाटणं चुकीचं नाही. असं मला वाटतं. अमूर्त हा भावनिक संघर्ष आहे तो ज्या दिवशी संपेल त्या दिवशी चित्र थांबेल. आता मला तरी कुठे थांबायचं आहे? कितीतरी लेखन करायचं आहे, अनेक रेंगाळणारी मनातली अनंत चित्रं जन्माला घालायची आहेत, खऱ्या अर्थानं आता कलाप्रवास सुरू झाला. कलेसाठी कला अशा प्रवासात पत्नी स्मिता आणि मुलगी राजलक्ष्मी यांचा मोठा आधार मिळाला. चित्रकाराला बऱ्याचदा आर्थिक पोकळ्या भरून काढताना कुटुंबाची सोबत हवीच असते. मुलगी सुद्धा चित्रकारच असल्यामुळे मला मोठा आधार वाटतो. मुलगी चित्रकार होईल तेव्हा ती आठव्या पिढीचं कलेचं नेतृत्व करेल. ही घरातली चित्रपरंपरा न थांबता गतिमान राहिली याचा मला आनंद होत राहतो. चाळीस वर्षांच्या माझ्या कलाप्रवासाला मागे वळून पाहतो तेव्हा एकच जाणवत राहतं, ते म्हणजे कुठलीही गोष्ट मिळवण्यासाठी संघर्षाला दुसरा पर्याय नसतो, कठीण परीक्षा द्याव्या लागतात. बऱ्याचदा नापास होतो, तेव्हा निराश व्हायचं नाही आणि पास होतो तेव्हा अती उत्साहितही व्हायचं नाही. यश-अपयश हे जरी भ्रम असलं तरी, शेवटी स्वतःचं गाळीव समाधान किती होतं यावर माझा कलेचा प्रवास अवलंबून राहील.

**– विजयराज बोधनकर**
भ्रमणध्वनी : ८८५०५२१८३२
vijayrajbodhankar1964@gmail.com

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आस**

**अपर्णा महाजन**




**जगण्यातली कसोशी उलगडून दाखवणारा कथासंग्रह**

''धरणाचे दरवाजे उघडावेत आणि त्यातून खळाळ पाणी वाहावं, तसा मनातल्या आठवणींना पूर आला होता. किती आठवणी आठवता हळूच हसू येत होते. किती आठवणी आठवायला नको वाटत होते. पुसाव्या वाटल्या तरी पुसता न येणाऱ्या आठवणी. जपून ठेवाव्या वाटल्या तरी समुद्रातल्या वाळूसारख्या निसटून जाणाऱ्या आठवणी.''

आठवणींचा पूर म्हणजे कथा. हातातून निसटलेल्या वाळूच्या कणाकणात विसावलेली कथा. वाऱ्यासारखी झुळूक होऊन बिलगलेली कथा तर वादळ होऊन उस्कटून टाकणारी कथा अनेक रूपांत भेटत राहते. फुलांच्या गंधाने ती कधी पुलकीत करते तर कोमेजलेल्या पाकळीतली मन गुंतून ठेवते. ती उंच झोपाळ्यावर झुलवते तर कधी झोपाळाच भिरकावून देते. मनाच्या सर्व भावभावनांना व्यापून टाकणारा हा साहित्यप्रकार तो कधी दीर्घ स्वरूपात समोर येतो तर कधी लघु. तरी त्याची व्यापकता, परिणामकारकता तितकीच भिडणारी, आपलीशी करणारी असते. अशा भिडणाऱ्या, आपलीशी करणाऱ्या कथांचा संग्रह म्हणजे 'आस'!

'आस' या कथासंग्रहात अठरा कथांचा समावेश आहे. या लघुकथा आहेत. यातील प्रत्येक कथा ही स्वत:चा स्वतंत्र बाज असलेली कथा आहे. 'कॉफी डेट'सारखी कथा हलकाफुलका चकवा देते तरी कॉफीसारखा तिचा स्वाद सोबत राहील इतका गोड अनुभव देते. 'निर्णय' कथेतील सोशिक कोंडमारा हा मनातील हेलकाव्यांचे वर्णन करण्याइतका मर्यादित राहत नाही, तर 'कोड' या ठिणगीपायी केवढा आगडोंब पसरू शकतो, त्यात होरपळणाऱ्या समस्त निष्पाप जिवांची मानसिक राख कशी होते, याचे वर्णन करते. 'रानवारा' या कथेचा पट खूप मोठा आहे. उगमापासून खळाळत समुद्राच्या दिशेने अवखळपणे झेपावू पाहणाऱ्या परंतु धरणाच्या भिंतीआड कोंडल्या गेलेल्या नदीसारखा.

मुलगी देखणी, चुणचुणीत आहे म्हणून ती लग्नाच्या बाजारात सहज खपून जाते. परंतु त्याच मुलीत चिमणीच्या अंड्याएवढे न्यून असेल तर तिची परवड डायनासॉरच्या अंड्यालाही मागे टाकते. पुष्पा ही त्या न्यूनाची प्रतिनिधी. तिची परवड आणि तिने जपून ठेवलेली 'गुलाबी पावडर' अशा दोन टोकांच्या दोन खांबांवर पुष्पाने बांधलेला पूल क्रूर वास्तव आणि मोरपंखी स्वप्नांचा प्रतिनिधी ठरतो.

'कोरोना'चा काळ सगळ्यांसाठीच 'ना करोना' ठरला. यात सर्वच स्तरांवरील कमावत्या हातांना जखडून टाकले गेले. त्यात विशेष दैना झाली ती परराज्यातून आलेल्या हातमजुरांची. त्यांना पुन्हा परतीची वाट धरावी लागली. ती नाइलाजाने या परतीची आणि दैना झाल्याची वर्णने सर्वत्र वाचायला, पाहायला मिळाली. परंतु त्यांच्यात स्वत:च्या चिकाटीने उभी राहणारे माणसेही निघाली. जी केवळ स्वत: उभी राहिली नाही, गावातल्या महिलांची मार्गदर्शक ठरली. त्यांचा प्रवास म्हणजे 'बेनिपट्टी' ही कथा.

स्वत:च स्वत:च्या आदराला पारखी होणे आणि ती भावना धूसर होऊन स्वत:च्या विचारांबद्दल विश्वास वाटू लागणे, अमूर्त पोकळीला अर्थगर्भ प्राप्त होणे, यांच्या शोधांचा माग काढणारी कथाा म्हणजे 'आस'.

या सगळ्या कथा वास्तवाच्या निखाऱ्यात हात घालतात. भावभावनांच्या हिंदोळ्याचा ताल अलगद पकडतात, त्यांच्यातला प्रत्येक स्वर सतारीच्या सुरासारखा हळुवारपणे उलगडून दाखवतात. माणसा-माणसांमधील नाती, व्यवहारीपण यांची गुंफण घट्ट तरी तुटणार नाही, इतकी अलवारपणे गुंफतात. या कथा वाचकाला सोबत घेत आपलेपणाचा अनुभव देतात. त्यांचा प्रवाह गतिमान असून खूप मोठा पल्ला त्यांच्या आवाक्यात साठवलेला आहे. मनोव्यापाराला मानसशास्त्रीय वर्खाची किनार आहे. निवेदनपद्धती प्रसन्न, सहज असून कधी प्रथमपुरुषी तर कधी तृतीयपुरुषी आहे. 'मनातल्या अर्ध्या कप्प्यात प्रेम आणि अर्ध्या कप्प्यात भीती' यासारखी सुंदर वाक्ये कथांमधून वाचायला मिळतात. ही समृद्धता निरीक्षण, अभ्यास, चिंतन आणि जीवनानुभवातून येते. ती लेखिकेकडे आहे. त्यामुळेच पहिलाच कथासंग्रह असूनही नवोदितपणाच्या खुणा पुसलेला संग्रह आहे. यात तीन अनुवादित कथांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या सर्व कथा नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत.

प्रा. डॉ. अपर्णा महाजन या इंग्रजी साहित्याच्या प्राध्यापक असून, त्यांचा मराठी व संस्कृतचा व्यासंगही दांडगा आहे. अनेक नियतकालिकांतून त्यांचे लेखन प्रकाशित झालेले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये त्यांच्या शोधनिबंधाचा समावेश आहे. अशा व्यासंगी लेखिकेचा 'आस' हा कथासंग्रह म्हणजे जगण्यातली असोशी उलगडून दाखवणारा संग्रह आहे असे ठामपणे म्हणता येते.

सदानंद मोरे यांची सुंदर प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली असून आशयगर्भ मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांचे आहे.

**मूल्य २०० रुपये  सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथपान




**नितळ आणि निखळ भाषेतील टपाल**

''मी तसा कायमस्वरूपी विरोधी पक्षाचा माणूस आहे. सतत कुणाचेही सरकार असो मला माझ्या लिखाणातून त्यांच्या कारभारातील वैगुण्यावर बोट ठेवायला आवडतं. आज भारतीय समाजमनाची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. भावनेला गळू झालेलं असल्यामुळे भावना दुखावते, अस्मिता दूरवर पाहत ताठ मानेनं चालत असल्यानं अस्मितेला ठेच लागते आणि संस्कृतीला पोहता येत नसल्यानं ती वीतभर पाण्यातही बुडण्याचा धोका संपवतो...''

प्रकाशन समारंभाच्या वेळी सॅबी परेरा बोलत होते आणि सभागृहातील श्रोते त्यांना मनापासून टाळ्या वाजवून दाद देत होते. तेव्हाच लक्षात आले, हे पाणी वेगळे आहे. पुस्तक वाचण्याची उत्सुकता वाढीला लागली. त्यातच अभिनेता, कवी किशोर कदम (सौमित्र) यांनी त्या उत्सुकतेचा शिरपेचात कौतुकाचे मोरपीस खोचले तेव्हा खात्रीच झाली. मराठीत आजवर अनेक लेखकांनी विनोद हाताळला आहे, पण सॅबीने हाताळलेला विनोद इतरांपेक्षा वेगळा आहे.

प्रसंग होता ग्रंथालीचा वाचकदिन. यावेळी सहा पुस्तके प्रकाशित झाली त्यापैकी सॅबी परेरा यांचे एक पुस्तक होते 'टपालकी'! 'टपालकी' हे पुस्तक लेखांच्या संग्रहाचे. लोकसत्ताच्या 'लोकरंग'मध्ये प्रकाशित झालेले हे लेख आहेत. खरे तर पूर्वप्रसिद्धीनंतरचे लेखन पुनर्प्रसिद्धी म्हणजे वृत्तपत्रीय भाषेत शिळेपण, परंतु प्रस्तुतचा लेखसंग्रह याला अपवाद म्हणावा लागेल. तसे हेही लक्षात घेण्यासारखे आहे की काही लेखन हे एका वाचनात कधीच शिळे होत नाही. पुन्हा पुन्हा वाचण्यातून त्यातला आनंद अर्थासह प्रत्येक वेळी नव्याने उलगडत जातो. 'टपालकी'मधील लेखन हे या प्रकारात मोडणारे आहे.

सॅबी परेरा यांचा हा पहिलाच लेखसंग्रह आहे, परंतु त्यांच्या नियतकालिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याची यादी मोठी आहे. विविध क्षेत्रांत असलेला त्यांचा वावर आणि त्यात उमटलेले त्यांच्या बहुआयामी व्यक्तित्वाचे प्रतिबिंब चतुरस्रपणाचे दर्शन घडवणारे आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनातला चौफेरपणा दाद द्यावी इतका दमदार आणि तितकाच सुंदर आहे. वृत्तपत्रातून सातत्यपूर्ण लेखन करणे, त्यासाठी वेळेची मर्यादा राखणे म्हणजे लेखकाची कसोटी पाहण्यातला प्रकार. यामुळे कदाचित लपविण्याचा, तेवढेच संदर्भ पुन्हा पुन्हा येण्याचा, प्रसन्न ??? हरवण्याचा धोका अधिक असतो. परंतु टपालकीत असे विसंवादी असे काहीच आढळत नाही. प्रत्येक लेख स्वतंत्रपणे आपला बंध जपतो. प्रत्येकाचा विषय, आशय स्वतंत्र आहे तसा त्यांच्यातला नितळ निखळपणाही स्वतंत्र आहे. त्यामुळे वाचनाचा म्हणून जो आनंद असतो, तो कुठेही विरळ होत नाही.

लेखक म्हणून अनुभवातून पाहताना जे दिसते तेच लेखनाचा विषय म्हणून निवडलेले आहेत. प्रत्येकाकडे पाहताना लेखकाची नजर ही त्या विषयाच्या आरपार जाणारी असावी लागते. तरच जिच्यातले वैगुण्य, उणीव, वर्म सापडू शकते. अशा नेमक्या जागा सॅबी यांनी टिपलेल्या आहेत, परंतु त्यांना टराटरा न फाडता अलगदपणे एकेक धागा उसवलेला आहे.

'पाऊस तसा मनानं साधाभोळा आहे. एक आपलं भारतीय हवामान खातं सोडलं तर बाकी कुणाशी त्याची खुन्नस असल्याचं माझ्या ऐकिवात नाही.'

'गटारांची, नाल्यांची स्वच्छता म्हणजे तरी काय असते? एका ठिकाणाची घाण आणि कचरा उचलून दुसरीकडे टाकणं.'

'दोन सीटच्या मध्ये उभे असताना येणाऱ्या–जाणाऱ्या प्रत्येकाच्या बॅगा रॅकवर ठेवण्याचं व काढण्याचं काम हसतमुखानं करण्याची सवय झाल्यानं सासुरवाडीच्या नातेवाईकांची मर्जी कुरकुर न करता सांभाळण्याचं कसब सहजसाध्य होतं.'

'एकदा पत गमावली की आपण वाटेल तसं वागायला मोकळे होतो.'

'झुंडीतल्या आणि नशेतल्या लोकांना बोलण्यात काही अर्थ नसतो.'

'मुंबईचा नवरात्रोत्सव खरोखर प्रेक्षणीय असतो. आता महाराष्ट्रात निवडणूक नावाचा एक मोठा गरबा होऊ घातलाय.'

अशा कितीतरी वाक्यांतून लेखकाने निरीक्षण, चौफेरपणाचा प्रत्यय दिलेला आहे. आगाऊ, वाट, गण यांसारखे अनेक अर्थांनी आलेले शब्द श्लेष साधतातच, शिवाय लेखकाच्या भाषेवरील हुकुमतीचाही परिचय देतात.

लेखासाठी पत्रलेखनाची पद्धत स्वीकारलेली आहे. पण लेखक हा मुंबईसारख्या शहरी भागातला आहे. त्यामुळे बहुतेक विषय शहरी भागातील आहेत. हा लेखक 'सदू' या नावाने वावरतो. परंतु प्रत्येक पत्राच्या शेवटी असणारा 'आपला सदू' 'तुझा स्वातंत्र्यप्रेमी मित्र, 'अप्पर सर्किट मित्र', 'चु–गली बॉय', 'सफरींग मित्र', 'लंबोदर मित्र' अशा अनेक विशेषणे असलेला, तरी आशयाशी नाते सांगणारा मित्र आहे. तर ज्याला पत्रे लिहिली तो दादू हा ग्रामीण भागातला आहे. या दोघांतला पत्रसंवाद हा शहरी–ग्रामीण असा आहे. हा संवाद सुसंवादी असून तो तिरकस, बोचरा, उपरोधी वाटत असला तरी त्याला सकारात्मकतेची किनार आहे. विनोदाची झालर आहे. त्याची भाषा प्रवाही आणि भरभरून नाते सांगणारी आहे. त्यामुळे हे लेख पुन्हा पुन्हा वाचण्याचा मोह होतो.

किशोर कदम (सौमित्र) यांची छानशी प्रस्तावना या संग्रहात लाभलेली आहे. त्यांनी केलेले कौतुक आणि टिपलेली निरीक्षणे लेखकासाठी शाबासकीची दाद म्हणता येईल.


लेखकाने मनोगतात आपल्या लेखनप्रवासाविषयी लिहिले आहे. त्यातून त्यांचा लेखनदृष्टिकोन लक्षात येतो.

नीलेश जाधव यांनी आशयाशी नाते सांगणारी चित्रे प्रत्येक लेखासाठी सुंदरपणे साकारलेली आहेत. मुखपृष्ठाची कल्पनाही उत्तमच!

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**स्वरमंजूषा**
**योजना शिवानंद**




**संगीताचा खजिना**

''१९७६ साली योजना सप्रे ही महाविद्यालयात जाणारी एक झपाटलेली नाट्यवेडी मुलगी होती. अभिनयासोबत तिला अभिजात गाणंही येत होतं. ज्येष्ठ नाट्यकर्मी अमोल पालेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'इंडिया कल्चर लीग'च्या 'द्रौपदी' या नाटकात दहावीत असतानाच तिनं काम केलं होतं. आत्मा आणि धर्म कलाकाराचा होता. तेव्हा जसा होता तसा आजही टिकून आहे.''

'स्वरमंजूषा' हे योजना शिवानंद यांचे चौथे पुस्तक 'आषाढी', 'अम्लान' आणि 'आषाढी – संतकाव्याचा अनोखा रंग' ही त्यांची तीन पुस्तके यापूर्वी प्रकाशित झालेली आहे. गायन आणि अभिनय अशा दोन्ही कलांवर प्रेम आणि आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवलेल्या योजना शिवानंद यांनी लेखन या कलेवरही आपली नाममुद्रा ठळकपणे कोरून ठेवली आहे असे विधान त्यांच्या लेखनप्रवासाकडे पाहून निश्चितपणे करता येते.

स्वरमंजूषा या शब्दाचा अर्थ त्यांनीच त्यांच्या मनोगतात स्पष्ट केलेला आहे. मंजूषा म्हणजे पेटी, संदूक, तिजोरी किंवा खजिना. त्या अर्थाने संगीत क्षेत्रात असलेल्या दिग्गज नामवंत मान्यवरांच्या परिचय असलेला हा खजिना आहे. त्याचे शीर्षक आहे स्वरमंजूषा. सवाईगंधर्व, डॉ. गंगुबाई हानगल, भारतरत्न पं. भीमसेन जोशी, पं. शिवकुमार शर्मा, पं. काणेबुवा, पं. यशवंत देव, श्रीनिवास खळे, नटवर्य भालचंद्र पेंढारकर, उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान, पं. चंद्रकांत कामत, पं. प्रभाकर जोग, कवी शंकर वैद्य, मनुकाका पंडित आणि शिवानंद पाटील या मान्यवरांचा यात समावेश आहे. या सगळ्याच दिग्गजांची संगीतकारकीर्द यशाच्या शिखरावर पोहोचलेली. त्यांची कीर्ती सर्वदूर पसरलेली. अशा मातब्बरांविषयी लिहायचे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे, असेच म्हणावे लागेल. हे लेखन लेख स्वरूपातील असून ते यापूर्वी 'नवशक्ति' या दैनिकातून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचे संकलन या 'स्वरमंजूषा'त आहे. परंतु या संकलनाला दोन पैलू आहेत. एक म्हणजे मूळ लेख जसेच्या तसे संग्रहित केलेले आहेत. आणि दुसरा भाग म्हणजे '...आणि आता...' या शीर्षकाखाली त्यात नव्याने सुधारित भर स्वतंत्रपणे घातलेली आहे.

मान्यवर कलावंताविषयी प्रत्येकाचा मनात आदर असतो तसे कुतूहलही असते. या क्षेत्रात त्यांचा प्रवास कसा सुरू झाला, त्याचे गुरू कोण, त्यांनी कला आत्मसात कशी केली, कलेतील बारकावे कोणते, यशापर्यंत त्यांचे हात कसे पोहोचले? या आणि अशा अनेक प्रश्नांची मालिका या कुतूहलात दडलेली असते. ती समजून घेण्याची उत्सुकताही मोठीच असते. विशेष म्हणजे व्यक्तिचित्रण केले जाते तेव्हा याच प्रश्नांची उत्तरे त्यात अपेक्षित असतात. त्या दृष्टिकोनातून या लेखसंग्रहाकडे पाहता येईल आणि अपेक्षापूर्तीचा आनंद पदरात पडेल. पं. कुमारगंधर्व यांची मुलाखत त्या दृष्टीने महत्त्वाची म्हणता येईल. कुठल्या गायकासाठी, गायनक्षेत्रात पदार्पण करण्यासाठी आणि संगीताची जाण असणाऱ्या प्रत्येकासाठी ही मुलाखत म्हणजे संगीताविषयीचा एक पाठ म्हणता येईल. ही मुलाखत म्हणजे संगीतमैफलच म्हणावी लागेल. पं. यशवंत देव संगीताविषयी कसा विचार करतात. शब्द, श्वास, बीट, हळुवारपणा आणि जागरूकता, तल्लीनता याविषयी कसे मार्गदर्शन करतात, हे वाचल्यानंतर कळते ते या पदापर्यंत पोहोचण्याचे रहस्य काय आहे.

मुखड्याचा षड्ज आणि अंतऱ्याचा षड्ज यांच्यातील गमक सांगताना त्या श्रीनिवास खळे यांचे वैशिष्ट्ये कसे इतरांपासून वेगळे आहे ते उलगडून दाखवतात. म्हणूनच त्या त्यांना 'रसऋषी' असा किताब बहाल करतात.

पं. शिवानंद यांचा परिचय, त्यांच्यासोबतचे सहजीवन हा कालखंड म्हणजे लेखिकेच्या काळजातले कस्तुरी अत्तर. शिवानंद हे पती आणि गुरू अशा दुहेरी भूमिकेत होते. खूप खडतर असा प्रवास आणि त्यांची तितकीच खडतर तपश्चर्या. एकाहून अधिक गुरूंचा त्यांना लाभलेला स्वरदानाचा हात, त्यांची संगीतावरील अढळ निष्ठा आणि प्रेम यांचा ओघवता आणि तितकाच समर्पक संगीतमय आलेख वाचकांसमोर ठेवलेला आहे. याच ओघात लेखिकेचाही संगीत आणि अभिनयाचा प्रवास उलगडत जातो. संगीताविषयीची ओढ, नाटकात अभिनय करण्याची सहजता, रेल्वे ते एचएमव्ही – सारेगामापर्यंतची दौड, योजना प्रतिष्ठान, आषाढीवारी महोत्सव, अनेक दिग्गजांसोबत काम करण्याची मिळालेली संधी, 'अबू हसन' नाटकातला अभिनय प्रवेश, त्याचवेळी एक गृहदक्ष गृहिणी अशा अनेक भूमिका यशस्वीपणे साकारणाऱ्या अनेक रूपांत योजना शिवानंद या पुस्तकातून वाचकांच्या भेटीला येतात, तेही अगदी सहजपणे ओघवत्या प्रवाहात वाळूने प्रवाहासोबत यावे अशा पद्धतीने.


संगीताची उत्तम जाणच नव्हे तर संगीत रोमरोमी भिनलेल्या योजना शिवानंद संगीतातल्या अनेक छटा उलगडून दाखवतात. स्वरमंजूषेवर कसलेली बोटे जितक्या सफाईदारपणे नर्तन करतात तितकीच त्यांची लेखणी चौफेर मुशाफिरी करत आपल्याला संगीतक्षेत्रातल्या दिग्गजांची भेट घडवून आणते. त्यांच्या पूर्वाश्रमीच्या सप्रे नावावरून उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान यांनी सुंदर कोटी केली आहे. 'सप्रे याने सापरे, सा प रे का मतलब हे षड्ज, पंचम और रिषभ... ये तीन सूर तेरे नाममें ही मौजूद है इसलिये तू तो हमेशा गायेगीही...'

या संग्रहात अनेक संदर्भ आहेत, जे दुर्मिळ फोटो आहेत. त्यामुळे हे पुस्तक म्हणजे संगीताचा खजिनाच म्हणावा लागेल. के. सय्यद यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारले आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथपान

**नोबेलनगरी २०२०**
**सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते**




**ज्ञान-विज्ञानाची रंजक ओळख**

''काही रोग अनुवंशाने मिळालेल्या सदोष जनुकांमुळे होतात. जनुकीय कात्री वापरून असा सदोष जनुक काढून त्याच्या जागी निर्दोष जनुक बसवला की ती पेशी त्या रोगापासून मुक्त होऊ शकते. ज्या आई-वडिलांमध्ये एखादा आनुवंशिक रोग असेल, त्यांच्या भावी अपत्याचा आदिमपेशीमध्येच असा जनुकीय बदल केला तर होणारं अपत्य आनुवंशिक रोगांपासून मुक्त होईल.''

जगातला सर्वोत्तम पुरस्कार म्हणजे नोबेल पुरस्कार पुरस्कार. साहित्य, संशोधन, विज्ञान आदि क्षेत्रांतला सर्वोच्च आणि मानाचा पुरस्कार! साऱ्या जगाचे लक्ष लागलेल्या या पुरस्कारांची घोषणा होते तेव्हा मोजकीच मंडळी त्याची मानकरी ठरलेली असतात. परंतु त्यांच्या कर्तृत्वाची मोहोर त्या त्या क्षेत्रात कायमची नोंद करून जाते. अशा पुरस्काराची दखल घेऊन ती आपल्या वाचकांसाठी उपलब्ध करून देण्याचे मोठे कर्तृत्व थत्ते दाम्पत्य निष्ठेने करत आहे. साहित्य, अर्थशास्त्र हे विषय आपल्या आवाक्यातील आहेत, परंतु विज्ञान आणि त्याच्या विविध शाखा आणि त्या शाखांमधील सुक्ष्मातील सूक्ष्म शोध, या गोष्टी आपल्या केवळ आवाक्याबाहेरच्या असतात, असे नाहीतर त्या आकलनाच्या बाहेरच्याही असतात. परंतु हेच आकलन सोपे व्हावे याची काळजी घेत नोबेलनगरीची सोप्या सुटसुटीत भाषेत सफर करून आणण्याची किमया या दाम्पत्याकडून सातत्याने आणि तितक्याच तन्मयतेने होत आहे.

विज्ञान हा विषय सोपा करून सांगणे ही गोष्टी सोपी नाही. त्यासाठी त्यांनी कथानकाचे तंत्र स्वीकारले आहे. एक होते आटपाटनगर असे न म्हणता त्या त्य विषयानुसार नगरीची योजना केलेली आहे. 'जनुकीय' आणि 'वैद्यकशास्त्र' हे विषय शरीरशास्त्राशी निगडित आहेत. म्हणून 'अंगदेश', 'देहदेश', 'यकृतनगरी' भौतिकशास्त्रासाठी 'मंदाकिनी', 'आकाशगंगा' याप्रमाणे यात योजलेल्या पात्रांची नावेही मोठी मजेशीर आहेत. डोळ्स, पितृप्रकोपेश, जीव २४ तास, घणाघातसिंह, डॉ. कल्पक, दिगंतर अशी आशयाशी जोडलेली आहेत.

रसायनशास्त्राचे २०२०चे नोबेल पारितोषिक 'जनुकसमूह संपादन पद्धतीच्या विकासासाठी' इमॅन्युएल शार्पेटीए आणि जेनिफर ए. डौडना या संयुक्तपणे देण्यात आले आहे. 'डीएनएमधला एखादा जनुक कापून त्या जनुकामुळे कोणत्या कार्याचे नियंत्रण होते, हे शोधून काढणे आता शक्य झाले आहे.

शरीरशास्त्र किंवा वैद्यकशास्त्राचा २०२० हा नोबेल पुरस्कार हार्वे जे आयटर, मायकेल हॉटन आणि चार्ल्स एम. राईस यांना 'हेपटायटीस-सी' विषाणूच्या शोधासाठी संयुक्तपणे देण्यात आला आहे. या संशोधनामुळे हेपटायटीस-सी विषाणूची अत्यंत संवेदनशील रक्तचाचणी उपलब्ध झाली आहे. हेपटायटीस-सी हा रक्तसंक्रमणातून पसरत असल्यामुळे कोणत्याही रोग्याला रक्त देण्यापूर्वी त्या रक्तामध्ये हेपटायटीस-सीचे विषाणू नाहीत ना याची चाचणी करून खात्री करून घेता येईल.

भौतिकशास्त्राच्या २०२० च्या नोबेल पारितोषिकाचा अर्धा भाग रॉजर पेनरोझ यांना कृष्णविवर निर्माण होणे हे सापेक्षतेच्या सर्वसाधारण सिद्धांताचे एक साधार भाकीत आहे या शोधासाठी देण्यात आला. तर दुसरा अर्धा भाग संयुक्तपणे रॅनवार्ड जेन्झेल आणि ॲड्रिया गेझ यांना आपल्या आकाशगंगेच्या मध्यभागी असणाऱ्या अतिविराट सघन वस्तूच्या शोधासाठी देण्यात आला.

या शोधांचा सोप्या भाषेत गोष्टीरूप केलेला उलगडा हा केवळ अभ्यासकांनाच नव्हे तर सामान्य वाचकालाही सहजसोपा वाटेल. तो विज्ञान मराठीतून सांगितलेला आहे. तसा इंग्रजीतूनही सांगितलेला आहे. त्यामुळे दोन्ही भाषा अवगत असणाऱ्यांची सोय झाली आहे. 'दोन माणसांच्या हाताचे ठसे जसे काही बाबतीत वेगवेगळे असतात तसे काही बाबतीत ते सारखेही असतात.' 'तुकड्यावरून विषाणूची ओळख पटवण्याचा हा प्रयत्न म्हणजे सुतावरून स्वर्ग गाठण्यासारखा होणार नाही का?' यांसारखी वाक्ये या सोपेपणात भर घालतात.

'भविष्यातही नवनवं संशोधन होण्यासाठी शास्त्रज्ञांच्या नवनव्या पिढ्या येत राहायला हव्या. भावी पिढ्यांच्या मनात संशोधनाची पाळंमुळं रुजावीत. यासाठीच नोबेलनगरीचा उपक्रम आहे.' अशा अपेक्षा लेखकांनी त्यांच्या मनोगतात आपल्या उपक्रमाविषयी व्यक्त केलेल्या आहेत. त्या प्रत्यक्षात उतरण्यात कुठली अडचण असल्याचे कारण नाही. त्या प्रत्यक्षात पाहण्यात या उपक्रमाचा वाटा नक्कीच असेल.

या पुस्तकाची निर्मिती खास वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. त्याच्या सजावटीत चित्रांचा समावेश झाल्याने त्याचे रूप देखणे झालेले आहे. मुखपृष्ठावर संशोधनावर आधारित चित्रांची योजना केल्याने ते ते आकर्षक झाले आहे. चित्रकार सतीश भावसार यांची ही सुंदर कल्पकता म्हणावी लागेल.

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**



अपघात, खून की आत्महत्या ?
सह-प्रस्तुत
काय घडलं त्या रात्री?
Special Partners
OREO
VICKS
गुरु-शनि
रात्री 9.30 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Co-Presenting Sponsor:
Special Partners:
Streaming Partner:

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.